सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३)

# कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्व-विद्यालय (विद्यापीठ) अधिनियम, १९९७

(दिनांक ६ जून २०१६ पर्यंत सुधारित)

**(Maharashtra Act No. XXXIII of 1997)**

# The Kavi Kulguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) Act, 1997

*(As modified upto 6th June 2016)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१६

[किंमत : रु. ३३.००]

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३

कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्व-विद्यालय (विद्यापीठ) अधिनियम, १९९७

अनुक्रमणिका


उद्देशिका पृष्ठे

कलमे

प्रकरण एक

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ. .. .. .. .. १

२. व्याख्या. .. .. .. .. १

प्रकरण दोन

विद्यापीठ

३. विद्यापीठाचे विधिद्वारा संस्थापन. .. .. .. ४

४. विद्यापीठाची अधिकारिता आणि त्याचे विशेषाधिकार बहाल करणे. .. .. ४

५. विद्यापीठ सर्वांना खुले असणे. .. .. .. ५

६. विद्यापीठाची उद्दिष्टे. .. .. .. .. ५

७. विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये. .. .. .. ६

८. राज्य शासनाचे नियंत्रण. .. .. .. .. १०

प्रकरण तीन

विद्यापीठाचे अधिकारी

(अ) कुलाधिपती (कुलपती)

(ब) विद्यापीठाचे इतर अधिकारी

९. कुलाधिपती व त्याचे अधिकार. .. .. .. .. १२

१०. विद्यापीठाचे इतर अधिकारी. .. .. .. .. १२

११. कुलगुरू व सम कुलगुरू. .. .. .. .. १३

१२. कुलगुरूची नियुक्ती. .. .. .. .. १३

१३. सम कुलगुरूच्या नियुक्तीची रीत. .. .. .. १५

१४. कुलगुरूचे अधिकार व कर्तव्ये. .. .. .. १६

१५. अधिष्ठाता. .. .. .. .. १८

१६. नियोजन विकास मंडळाचा संचालक. .. .. .. १८

१७. कुलसचिव, नियुक्ती आणि कर्तव्ये. .. .. .. १९

१८. परीक्षा नियंत्रक. .. .. .. .. २०

१९. ग्रंथपाल, नियुक्ती आणि कर्तव्ये. .. .. .. २०

२०. वित्त-लेखा अधिकारी. .. .. .. .. २१

२१. छात्र कल्याण संचालक. .. .. .. .. २२

२२. संचालक, विस्तार सेवा मंडळ. .. .. .. २२

२३. विद्यापीठाचे अधिकारी त्याच्या प्राधिकरणांचे, संस्थांचे सदस्य आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे. २३



ऊप-२०३६-१.

## अनुक्रमणिका—चालू


| उद्देशिका | | पृष्ठे |
|---|---|---|
| कलमे | | |
| | **प्रकरण चार** | |
| | **विद्यापीठाची प्राधिकरणे** | |
| २४. | विद्यापीठाची प्राधिकरणे. | २३ |
| २४क. | विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा शासनाचा अधिकार. | २३ |
| २५. | व्यवस्थापन परिषद. | २३ |
| २६. | व्यवस्थापन परिषदेचे अधिकार व कर्तव्ये. | २४ |
| २७. | विद्वत् परिषद. | २६ |
| २८. | विद्वत् परिषदेचे अधिकार व कर्तव्ये. | २७ |
| २९. | परीक्षा मंडळ. | २८ |
| ३०. | परीक्षा मंडळाचे अधिकार व कर्तव्ये. | २९ |
| ३१. | संकाय. | ३० |
| ३२. | संकायाचे अधिकार व कर्तव्ये. | ३० |
| ३३. | अध्ययन मंडळ. | ३१ |
| ३४. | अध्ययन मंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये. | ३२ |
| ३५. | विस्तार सेवा मंडळ. | ३२ |
| ३६. | प्राधिकरणांचे अधिकार, कामे व कर्तव्ये. | ३३ |
| ३७. | प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी. | ३३ |
| ३८. | सदस्यत्वाची समाप्ती. | ३३ |
| ३९. | प्राधिकरणाचा सदस्य होण्यासंबंधातील निरर्हता. | ३३ |
| ४०. | प्राधिकरणाच्या निर्णयाची निर्णायकता. | ३३ |
| ४१. | सदस्यत्वाचा राजीनामा. | ३३ |
| ४२. | प्राधिकरणांची बैठक. | ३४ |
| ४३. | प्रासंगिक रिक्त पद भरणे. | ३४ |
| | **प्रकरण पाच** | |
| | **परिनियम, आदेश आणि विनियम** | |
| ४४. | परिनियम. | ३४ |
| ४५. | परिनियम कसे करावयाचे. | ३५ |
| ४६. | आदेश व त्यांचे विषय. | ३६ |
| ४७. | आदेश व ते तयार करणे. | ३७ |
| ४८. | विनियम आणि नियम | ३७ |
| | **प्रकरण सहा** | |
| | **प्रवेश, परीक्षा व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर बाबी** | |
| ४९. | प्रवेश. | ३८ |
| ५०. | परीक्षांचे वेळापत्रक. | ३८ |
| ५१. | निकाल जाहीर करणे. | ३८ |
| ५२. | वेळापत्रकाचे पालन न केल्यामुळे परीक्षा अवैध ठरणार नाही. | ३८ |
| ५३. | क्रीडा व अभ्यासेतर कार्यक्रम. | ३९ |

## अनुक्रमणिका—चालू

उद्देशिका पृष्ठे

कलमे

### प्रकरण सात

### समित्या (कमिट्या)


५४. (१) ग्रंथालय समिती (लायब्ररी कमिटी). .. .. .. ३९
(२) वित्त-लेखा समिती (वित्त व लेखा समिती). .. .. .. ३९
(३) क्रय समिती (खरेदी समिती). .. .. .. ४१
(४) विद्यासेवा अनुभागासाठी समित्या (विद्यासेवा युनिट). .. .. ४१
(५) वास्तुरचना समिती (इमारत बांधकाम समिती). .. .. ४२
(६) विश्व-विद्यालय छात्र कल्याण समिती (विद्यार्थी कल्याण समिती). .. .. ४२
(७) अपक्लेश निवारण समिती (तक्रार निवारण समिती). .. .. ४२


### प्रकरण आठ

### विद्यापीठाचे अध्यापक व कर्मचारी


५५. विद्यापीठाच्या अध्यापकांची निवड व नियुक्ती. .. .. .. ४३
५६. विद्यापीठाच्या अध्यापकांची तात्पुरती रिकामी पदे भरणे. .. .. ४५
५७. संचलित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची नियुक्ती व निवड. .. .. ४५
५८. विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवड समित्या. .. .. ४५
५९. इतर समित्या. .. .. .. .. ४६
६०. न्यायाधिकरण. .. .. .. .. ४६


### प्रकरण नऊ

### परवानगी, संलग्नीकरण व मान्यता


६१. संलग्नीकरण आणि मान्यता यांकरिता शर्ती. .. .. .. ४६
६२. परवानगीसंबंधीची कार्यपद्धती. .. .. .. ४७
६३. संलग्नीकरण कार्यपद्धती. .. .. .. .. ४८
६४. परिसंस्थांना व पाठशालांना मान्यता देण्याची कार्यपद्धती. .. .. ४८
६५. संलग्न महाविद्यालय, परिसंस्था यांची स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समिती. .. ५०
६६. संलग्नीकरण किंवा मान्यता चालू ठेवणे. .. .. .. ५१
६७. संलग्नीकरण किंवा मान्यता यांच्या व्याप्तिमध्ये वाढ करणे. .. .. ५१
६८. स्थायी संलग्नीकरण मान्यता. .. .. .. ५१
६९. संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था व पाठशाला यांची तपासणी. .. ५१
७०. संलग्नीकरण किंवा मान्यता काढून घेणे. .. .. .. ५२
७१. महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला बंद करणे. .. .. ५२


### प्रकरण दहा

### नावनोंदणी, पदव्या व दीक्षांत समारंभ


७२. पदव्युत्तर अध्यापन व संशोधन. .. .. .. ५३
७३. विद्यार्थ्यांची नावनोंदणी. .. .. .. .. ५३
७४. शिस्तविषयक अधिकार आणि विद्यार्थ्यांमधील शिस्त. .. .. ५३
७५. पदव्या, पदविका, प्रमाणपत्र व विशेषोपाधी. .. .. .. ५४
७६. सन्मान्य पदवी. .. .. .. .. ५४
७७. दीक्षांत समारंभ. .. .. .. .. ५५
७८. नोंदणीकृत पदवीधर. .. .. .. .. ५५
७९. नोंदणी केलेल्या पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकणे. .. .. ५५

## अनुक्रमणिका—चालू


उद्देशिका — पृष्ठे

कलमे

### प्रकरण अकरा

### विद्यापीठ निधी, लेखे व लेखापरीक्षा

८०. वार्षिक वित्तीय अंदाज. . . . . . . . . . . . ५६
८१. विद्यापीठ निधी. . . . . . . . . . . ५६
८२. वार्षिक लेखे व लेखापरीक्षा. . . . . . . . . . ५७
८३. वार्षिक अहवाल. . . . . . . . . . . ५८

### प्रकरण बारा

### संकीर्ण

८४. नुकसानीबद्दल प्राधिकरणे आणि अधिकारी जबाबदार असणे. . . . . . ५८
८५. राज्य विधानमंडळाचे आणि संसदेचे सदस्यत्व. . . . . . . ५८
८६. अर्थउकली संबंधातील प्रश्न आणि विद्यापीठ प्राधिकरण किंवा मंडळ इत्यादींच्या रचनेसंबंधातील विवाद. ५८
८७. या अधिनियमाच्या कृती व आदेश यांचे संरक्षण. . . . . . . ५९
८८. अधिकारांचे प्रत्यायोजन. . . . . . . . . ५९
८९. कृती व कार्यवाही ही रचनेतील दोष रिक्त पदे, कार्यपद्धतीतील नियमबाह्यता इत्यादी या केवळ कारणांवरून विधी अग्राह्य नसणे. ५९

### प्रकरण तेरा

### संस्कृत विद्यापीठाची आस्थापना

९०. प्रथम नियुक्त्या. . . . . . . . . . ५९
९१. पहिली प्राधिकरणे स्थापन करणे. . . . . . . . ५९
९२. अडचणी दूर करणे. . . . . . . . . . ५९

## सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३

## कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) अधिनियम, १९९७

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक २८ मे, १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम]

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या.

**सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.**

### महाराष्ट्र राज्य संस्कृत विद्यापीठ स्थापन करणे यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** संस्कृत भाषा व साहित्य हे प्राचीन भारतीय ज्ञानाचे भांडार आहे ही सिद्ध वस्तुस्थिती आहे ;

**आणि ज्याअर्थी,** भारतीय भाषेची वृद्धी व विकास यांच्या दृष्टीने संस्कृतला असलेले विशेष मोल आणि महत्त्व आणि देशाच्या सांस्कृतिक एकात्मतेमधील तिचे अनन्यसाधारण योगदान आता मान्य करण्यात आलेले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** संस्कृत साहित्यातील वैश्विक मुल्यांचा शोध घेणे, ती जोपासणे आणि त्यांचा प्रसार करणे आणि ज्ञानसंपन्न समाजाच्या निर्मितीसाठी प्राचीन भारतीय ज्ञानभांडार व आधुनिक ' विज्ञान संस्कृती ' यांची अधिकाधिक प्रमाणात सांगड घालणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त कारणांसाठी संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्यासाठी अधिनियम करणे आवश्यक आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) अधिनियम, १९९७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(१) " विद्याविषयक सेवा युनिट " म्हणजे, विद्यापीठ विद्याविषयक अधिकारी, महाविद्यालय संगणक केंद्र, विद्यापीठ मुद्रणालय किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही उद्दिष्टाच्या प्रचालनासाठी विशेषीकृत सेवा पुरविणारे इतर कोणतेही युनिट ;

(२) " संलग्न प्राध्यापक ", " संलग्न प्रपाठक " किंवा " संलग्न अधिव्याख्याता " म्हणजे, विद्यापीठाबरोबरच्या सहयोगाच्या किंवा साहचर्याच्या कालावधीत तशी पदनिर्देशित करण्यात आलेली, कोणतेही विद्यापीठ, महाविद्यालय, परिसंस्था किंवा संस्कृत विद्या संशोधन केंद्र यातील किंवा उद्योग, व्यापार, कृषि, वाणिज्य, संरक्षण किंवा इतर कोणत्याही संलग्न क्षेत्रांतील व्यक्ती ;

(३) " संलग्न महाविद्यालय " म्हणजे, विद्यापीठाकडून ज्याला संलग्नीकरणास मंजुरी देण्यात आलेली आहे ते महाविद्यालय ;

(४) " प्राधिकरणे " म्हणजे, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेली विद्यापीठाची प्राधिकरणे ;

(५) " मंडळे " म्हणजे, त्या त्या प्राधिकरणांनी स्थापन केलेली विद्यापीठाची मंडळे ;

(६) " सहयोग " म्हणजे, इतर विद्यापीठे, विद्याविषयक परिसंस्था (स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय), संशोधन परिसंस्था व संघटना (संशोधन, कृषि, उद्योग, व्यापार, वाणिज्य व संरक्षण) यांच्याबरोबर असलेला, विद्यापीठाचा विद्याविषयक सहयोगी कार्यक्रम ;

(७) " महाविद्यालय " म्हणजे, विद्यापीठ संचालित महाविद्यालय किंवा विद्यापीठाला संलग्न करून घेतलेले महाविद्यालय ;

(८) " संचालित महाविद्यालय " म्हणजे, विद्यापीठाकडून चालविण्यात येणारे व व्यवस्था पाहण्यात येणारे महाविद्यालय ;

(९) " विभाग " म्हणजे, परिनियमात विहित करण्यात आल्यानुसार महाविद्यालयामध्ये एखादा विशिष्ट विषय किंवा विषय गट शिकविणारा विभाग ;

(१०) " संचालक " म्हणजे, व्यवस्थापन परिषदेकडून तसे पदनिर्देशित करण्यात आलेला, विद्यापीठाचे केंद्र किंवा प्रशाला यासह त्या विद्यापीठाच्या परिसंस्थेचा प्रमुख ;

(११) " उच्च शिक्षण संचालक ", " संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन ", " आयुर्वेद संचालक ", " संचालक, शारीरिक शिक्षण " आणि " संचालक, तंत्र शिक्षण " म्हणजे, अनुक्रमे, उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, आयुर्वेद संचालक, महाराष्ट्र राज्य, संचालक, शारीरिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य आणि संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य ;

(१२) " विद्यापीठ विभाग प्रमुख " म्हणजे, विभागातील अध्यापन व संशोधन यांसाठी मुख्यतः जबाबदार असलेला व कुलगुरुने तसे पदनिर्देशित केलेला अध्यापक ;

(१३) " उच्च शिक्षण " म्हणजे, शालेय शिक्षणाच्या टप्प्यावरील शिक्षणानंतरचा ज्ञानाचा व्यासंग ;

(१४) " वसतिगृह " म्हणजे, विद्यापीठाकडून तरतूद करण्यात आलेले, चालवण्यात येणारे किंवा त्याने मान्यता दिलेले, विद्यापीठाच्या किंवा संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेले निवासस्थान ;

(१५) " परिसंस्था " म्हणजे, विद्यापीठाशी सहयोगी असलेली आणि विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात आलेली, महाविद्यालय नसणारी उच्च शिक्षणाची विद्याविषयक परिसंस्था ;

(१६) " कुलाधिपती ", " कुलगुरू " आणि " समकुलगुरू " म्हणजे, अनुक्रमे विद्यापीठाचा कुलपती, कुलगुरू व समकुलगुरू ;

(१७) " स्थानिक व्यवस्थापन समिती " म्हणजे, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार महाविद्यालयासाठी स्थापन केलेली समिती ;

(१८) " व्यवस्थापन " म्हणजे, ज्यांच्या व्यवस्थापनाखाली एका किंवा अधिक महाविद्यालयांचे किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांचे किंवा इतर परिसंस्थांचे संचालन करण्यात येते आणि त्यांना विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात येतात असे, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही विश्वस्त निधीचे (किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही संस्थेचे) विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा नियामक मंडळ, मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो : १९५० चा मुंबई २९. १८६० चा २१.

परंतु असे की, केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा जिल्हा परिषद, नगरपरिषद किंवा महानगरपालिका यासारख्या स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या किंवा त्यांच्याकडून चालवण्यात येणाऱ्या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या बाबतीत, ते व्यवस्थापन म्हणजे, अनुक्रमे यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा जिल्हा परिषद किंवा नगरपरिषद किंवा महानगरपालिका ;

(१९) " इतर मागासवर्ग " म्हणजे, राज्य शासनाने इतर मागसवर्ग म्हणून स्वीकृत केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गातील गट यांमधील व्यक्ती आणि त्यामध्ये अशा वर्गामधील किंवा अशा वर्गातील गटांमधील व्यक्तींचा समावेश होतो ;

(२०) " पाठशाला " म्हणजे, महाराष्ट्र शासन, इतर राज्य शासने किंवा केंद्र सरकार यांनी मान्यता दिलेली पाठशाला ;

(२१) " पदव्युत्तर विभाग " म्हणजे, विद्यापीठाकडून पदव्युत्तर विभाग म्हणून मान्यता देण्यात आलेला व पदव्युत्तर शिक्षण देणारा किंवा संशोधनाबाबत मार्गदर्शन करणारा, महाविद्यालयातील किंवा उच्च शिक्षण, संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास यांच्या परिसंस्थेतील विभाग ;

(२२) " विहित " म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेले यशास्थिति, परिनियम किंवा आदेश किंवा विनियम किंवा नियम या अन्वये विहित करण्यात आलेले ;

(२३) " प्राचार्य " म्हणजे, महाविद्यालयाचा, विशेषकृत शैक्षणिक परिसंस्थेचा, पदव्युत्तर केंद्रांचा किंवा विद्यापीठाने रीतसर मान्यता दिलेल्या अन्य मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख ;

(२४) " मान्यताप्राप्त परिसंस्था " म्हणजे, उच्च शिक्षणासाठी, संशोधनासाठी किंवा विशेषीकृत अभ्यासासाठी असलेली परिसंस्था म्हणून विद्यापीठाने मान्यता दिलेली, संलग्न महाविद्यालयांव्यतिरिक्त अन्य परिसंस्था ;

(२५) " नोंदणीकृत पदवीधर " म्हणजे, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विद्यापीठात नोंदणी केलेला किंवा नोंदणी केल्याचे मानण्यात आलेला विद्यापीठाचा पदवीधर ;

(२६) " अनुसूचित जाती " म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येणाऱ्या जाती, वंश किंवा जमाती अथवा अशा जाती, वंश किंवा जमाती यांचे भाग किंवा त्यांच्यातील गट ;

(२७) " अनुसूचित जमाती " म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येणाऱ्या अशा महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या जमाती अथवा जनजाती समूह किंवा अशा जमाती किंवा जनजाति समूह यांचे भाग किंवा त्यांच्यातील गट आणि त्यामध्ये, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी विमुक्त (Denotified) व भटक्या जमातींचा समावेश होतो ;

(२८) " प्रशाला " म्हणजे, विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी अभ्यासक्रम प्रशाला ;

(२९) " परिनियम ", " आदेश " व " विनियम " म्हणजे, या अधिनियमान्वये तयार केलेले विद्यापीठाचे अनुक्रमे परिनियम, आदेश व विनियम ;

(३०) " अध्यापक " म्हणजे, विद्यापीठाच्या कोणत्याही विभागातील किंवा संचालित किंवा संलग्न महाविद्यालयातील, किंवा विद्यापीठातील मान्यताप्राप्त परिसंस्थेतील, प्रशालेतील किंवा पाठशालेतील पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल, संचालक, शारीरिक शिक्षण किंवा शारीरिक शिक्षण निदेशक ;

(३१) " विद्यापीठ " म्हणजे, या कलम ३ अन्वये विधिसंस्थापित केलेले कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) ;

(३२) " विद्यापीठ विभाग " म्हणजे, विद्यापीठाने स्थापन केलेला व विद्यापीठाकडून चालविण्यात येणारा विभाग ;

१९५६ चा ३. (३३) " विद्यापीठ अनुदान आयोग " म्हणजे, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन करण्यात आलेला विद्यापीठ अनुदान आयोग ;

(३४) " विद्यापीठ परिसंस्था " म्हणजे, विद्यापीठाने स्थापन केलेले व विद्यापीठाकडून चालविण्यात येणारे केंद्र, प्रशाला किंवा परिसंस्था ;

(३५) " विद्यापीठ अध्यापक " म्हणजे, विद्यापीठाने नियुक्त केलेला अध्यापक.

प्रकरण दोन

## विद्यापीठ

विद्यापीठाचे विधिद्वारा संस्थापन.

३. (१) त्या त्या वेळी कुलाधिपती (कुलपती), कुलगुरू, व्यवस्थापन परिषद, विद्वत् परिषदेचे सदस्य म्हणून पद धारण करणाऱ्या व्यक्ती आणि त्यानंतर असे अधिकारी म्हणून किंवा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येतील किंवा निवडून देण्यात येतील अशा सर्व व्यक्ती यांना याद्वारे " कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) " या नावाचा निगम निकाय म्हणून स्थापित व घोषित करण्यात येत असून या निगम निकायाची अखंड परंपरा व समाईक मोहोर असेल आणि त्या नावाने त्याला व त्याच्यावर दावा करता येईल.

(२) या विद्यापीठाचे मुख्यालय रामटेक, जिल्हा नागपूर येथे असेल :

(३) हे विद्यापीठ जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करण्यास, विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी त्याच्याकडे निहित करण्यात येईल किंवा ते संपादन करील अशी कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्यास, तिची विक्री करण्यास किंवा अन्य प्रकारे ती हस्तांतरित करण्यास अथवा निकालात काढण्यास आणि करार करण्यास व या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक असतील अशा इतर सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल :

परंतु, विद्यापीठाने नियुक्त केलेल्या मान्यताप्राप्त मूल्यनिर्णेत्याने कोणत्याही स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन केल्याखेरीज आणि राज्य शासनाच्या पूर्व संमतीखेरीज ती मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही, तिची विक्री करण्यात येणार नाही किंवा हस्तांतरण करण्यात येणार नाही.

विद्यापीठाची अधिकारिता आणि त्याचे विशेषाधिकार बहाल करणे.

४. (१) या अधिनियमाद्वारे विद्यापीठाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर ज्या प्रादेशिक मर्यादांमध्ये करण्यात येईल त्या प्रादेशिक मर्यादांमध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश असेल :

परंतु, विद्यापीठ, त्यास आणि राज्य शासनास ज्या शर्ती व निर्बंध लागू करणे इष्ट वाटतील अशा शर्तींच्या आणि निर्बंधांच्या अधीनतेने प्रादेशिक मर्यादांच्या बाहेर भारतात किंवा भारताबाहेर स्थापन करण्यात आलेले कोणतेही महाविद्यालय, परिसंस्था किंवा संशोधन केंद्र यांना राज्य शासनाच्या आणि आवश्यक असेल त्या बाबतीत केंद्र सरकारच्या संमतीने विद्यापीठाचे विशेषाधिकार देण्याचे मान्य करू शकेल :

परंतु आणखी असे की, ज्या विद्यापीठाची अधिकारिता कोणत्याही राज्यापुरती किंवा क्षेत्रापुरती मर्यादित नसेल असे एखादे विद्यापीठ, विद्यापीठ क्षेत्रात संशोधनाचे केंद्र किंवा इतर युनिट प्रस्थापित करू इच्छित असेल तर त्यास विद्यापीठाच्या व राज्य शासनाच्या मंजुरीने तसे करता येईल.

(२) या अधिनियमाद्वारे किंव तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी राज्यातील अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रात कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेद्वारे वापरला जाणारा कोणताही विशेषाधिकार राज्य शासनाच्या परवानगीशिवाय काढून घेण्यात येणार नाही.

(३) विद्यापीठाला, संस्कृतच्या अध्ययनाच्या हिताच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्याबाहेरील कोणत्याही प्रदेशात संबंधित शासनाच्या संमतीने महाविद्यालय, किंवा संशोधन परिसंस्था किंवा पाठशाला सुरु करता येईल किंवा संचालित करता येईल.

(४) विद्यापीठाला संलग्न असलेली किंवा विद्यापीठाने मान्यता दिलेली कोणतीही शैक्षणिक परिसंस्था, विद्यापीठाची आणि राज्य शासनाची परवानगी असल्याखेरीज, कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या अशा अन्य कोणत्याही विद्यापीठाशी कोणत्याही प्रकारे सहयोगी केली जाणार नाही किंवा ती त्याचे कोणतेही विशेषाधिकार मिळण्याची मागणी करणार नाही.

५. (१) भारताच्या कोणत्याही नागरिकास स्त्री-पुरूष, भेद, वंश, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान, धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली याच केवळ कारणावरून, विद्यापीठाचे कोणतेही पद मिळण्यातून किंवा त्याच्या प्राधिकरणांपैकी, मंडळांपैकी किंवा समित्यांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचे, मंडळाचे किंवा समितीचे सदस्यत्व मिळण्यातून किंवा कोणत्याही पदावरील नेमणुकीतून किंवा कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी किंवा अभ्यासक्रम यासाठी प्रवेश मिळण्यातून, वगळण्यात येणार नाही : विद्यापीठ सर्वांना खुले असणे.

परंतु, विद्यापीठास केवळ स्त्रियांसाठी असलेले किंवा स्त्रियांसाठी राखीव असलेले कोणतेही महाविद्यालय किंवा परिसंस्था चालविता येईल किंवा केवळ त्यास अधिस्वीकृती किंवा मान्यता देता येईल.

(२) विद्यापीठ, अध्यापक व अध्यापकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या वेगवेगळ्या पदांवरील नियुक्त्यांच्या बाबतीत व संलग्न किंवा संचालित महाविद्यालयांमध्ये, विद्यापीठ विभागांमध्ये, विद्यापीठ परिसंस्थांमध्ये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये किंवा प्रशालांमध्ये आणि पाठशालांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या प्रयोजनाकरिता अनुसूचित जातींसाठी, अनुसूचित जमातींसाठी व इतर मागासवर्गांसाठी राखीव जागा ठेवण्यासंबंधातील शासनाचे धोरण व वेळोवेळी दिलेले आदेश यांचा अवलंब करील.

(३) विद्यापीठ, राज्य शासनाकडून वेळोवेळी निदेश देण्यात आल्यानुसार, समाजाच्या दुर्बल घटकांच्या विविध प्रवर्गांच्या व अल्पसंख्याकांच्या कल्याणासंबंधात राज्य शासनाच्या सर्वसाधारण धोरणाचा अवलंब करील.

६. **संस्कृत विश्वविद्यालयाची (विद्यापीठ) उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील.—** विद्यापीठाची उद्दिष्टे.

(१) संस्कृत भाषा व साहित्य यांमध्ये दृग्गोचर होणारी वैश्विक मूल्ये, विद्या, ज्ञान व क्रांतदर्शित्व यांचे पुनरूज्जीवन करणे, ते जोपासणे व त्यांचा प्रसार करणे आणि विद्यमान व भावी गरजांशी सुसंगत ठरेल अशाप्रकारे प्राचीन भारतीय ज्ञानभंडार, आणि आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन यांची अधिकाधिक प्रमाणात सांगड घालणे ;

(२) पुढील गोष्टींवर विशेष भर देऊन सामाजिक जाणिवा व समाजमन अधिक प्रगल्भ करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय एकात्मता वैज्ञानिक कृती व मानसिक आणि बौद्धिक स्वातंत्र्य यांच्या बाबतीत सहाय्यकारी ठरेल अशी शिक्षण पद्धती विकसित करणे व तिला चालना देणे :—

(अ) अध्यापक व विद्यार्थी यांच्यातील संबंधाचे उदात्तीकरण करणे (गुरूशिष्य परंपरा-ज्ञानार्जन करणाऱ्या व सत्याचा मागोवा घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मुक्तहस्ते ज्ञानाचा परमोच्च आनंद देणाऱ्या आचार्याच्या प्रती पराकाष्ठेची कृतज्ञताबुद्धी व पूज्यभाव दर्शवणारी उदात्त भारतीय परंपरा);

(ब) जिज्ञासा, ज्ञानलालसा व स्वयंशासन हे ज्यांचे मूलभूत घटक असतील अशा अभ्यासाच्या व प्रयोगाच्या नवीन पद्धती शोधून काढणे ; आणि

(क) केवळ अनुभवाधिष्ठित व तर्कसंगत ज्ञानाच्याच नव्हे तर त्यात दोन्ही मिळून अधिक चिंतनशील ज्ञानाच्या विद्याशाखांचा विकास करणे ;

(३) भूतकाळाची वर्तमानकाळाशी सांगड घालण्याच्या दृष्टीने आणि राष्ट्राला भविष्यकालीन आव्हानांची पूर्तता करता येईल अशा प्रकारे संस्कृत भाषेच्या सर्व क्षेत्रांमध्ये नवनवीन कल्पना, संशोधन व शोध यांच्या संदर्भात प्रोत्साहन देणे व चालना देणे ;

(४) अंतर्गत शिस्तीचा अवलंब करून जीवनासंबंधात एकात्मीकृत दृष्टीकोन ठसविण्यासाठी मार्गदर्शनपर वातावरण तयार करणे आणि भारतात जागृती व नवचैतन्य निर्माण करण्यासाठी तमाम अध्यापकवर्ग व इतर क्षेत्रांमधील कार्यरत प्रमुख व्यक्ती यांचेही यादृष्टीने मतपरिवर्तन करणे ;

(५) जगात भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मार्गदर्शन करण्याकरिता वेदांतर्गत ज्ञान व दृष्टिकोन यांनी संपन्न असलेल्या, तसेच षड्दर्शने, पाश्चिमात्य तत्वज्ञान आणि आधुनिक विज्ञान संस्कृती यांच्याशी सुपरिचित असणाऱ्या आचार्यांची पथके तयार करणे ;

(६) वैदिक, बौद्ध, जैन व अवेस्तन साहित्यातील धर्म, तत्त्वज्ञान व विज्ञान यांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी सुविधा निर्माण करणे व त्या विकसित करणे ;

(७) आयुर्वेद व आधुनिक औषध वैद्यकशास्त्र, वास्तुशास्त्र व आधुनिक वास्तुशास्त्र, अर्थशास्त्र व आधुनिक अर्थशास्त्र व राज्यशास्त्र आणि व्याकरण व आधुनिक ग्रंथचिकित्साशास्त्र व भाषाशास्त्र व इतर यांचे एकात्मीकरण करण्यासाठी विशेष पाठ्यक्रम तयार करणे व ते कार्यान्वित करणे ;

(८) संस्कृत शिकण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी मूलभूत पाठ्यक्रम सुरू करणे व तो कार्यान्वित करणे, आणि संस्कृत भाषा व साहित्य लोकप्रिय करण्यासाठी " संभाषणात्मक संस्कृत ", " संस्कृतातील ज्ञान व ज्ञानभांडार ", " संस्कृतमधील माधुर्य व ज्ञान प्रकाश ", " संस्कृतमधील कला व वास्तुशास्त्र ", " वैदिक दृष्टिकोन ", " आयुर्वेद व आरोग्याची जाणीव ", " संस्कृत संगणकाची भाषा " इत्यादींसारखे विशेष अभ्यासक्रम तयार करणे ;

(९) पाली, प्राकृत, अर्धमागधी व इतर भारतीय अभिजात भाषा, आणि तसेच ग्रीक, लॅटिन, अवेस्तन, जुनी पर्शियन इत्यादींसारख्या इतर अभिजात भाषा आणि इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, चिनी, जपानी, तिबेटी इत्यादींसारख्या विदेशी भाषा यांचा प्रगत अभ्यास व संशोधन यांसाठी सुविधांची तरतूद करणे आणि या भाषा व संस्कृत यांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी प्रोत्साहन देणे ;

(१०) संस्कृत अध्यापन-अध्ययन यांच्या पारंपरिक पद्धतीचा अभ्यास हेतुपूर्ण करण्यासाठी संस्कृत पाठशालांमध्ये परस्पर सामंजस्य व अधिक चांगला समन्वय साधणे आणि संस्कृतच्या शिक्षणाच्या पारंपरिक व आधुनिक पद्धतीचा मिलाफ घडवून आणणे ;

(११) अभ्यासक्रमाशी संबंधित अध्ययन-अध्यापन सामग्री (दृकश्राव्य सामग्रीसह) तयार करणे व ती प्रसिद्ध करणे ;

(१२) विद्यापीठाची सर्व किंवा कोणतीही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असतील असे प्रकल्प हाती घेणे व अशा सर्व योजना व कार्यक्रम आयोजित करणे.

विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये.

**७. विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—**

(१) विद्यापीठ वेळोवेळी निश्चित करील अशा अध्ययन शाखांमध्ये आणि अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण, अध्यापन आणि प्रशिक्षण यांची तरतूद करणे ;

(२) संशोधनासाठी आणि ज्ञानवर्धनासाठी आणि ज्ञानप्रसारासाठी तरतूद करणे आणि सर्वसाधारणतः संस्कृतचे अध्ययन आणि अध्ययनाच्या इतर शाखा व संस्कृती व त्यांच्या आंतरज्ञान शाखांची क्षेत्रे यांचे संवर्धन करणे व त्यांना चालना देणे ;

(३) संचालित आणि संलग्न महाविद्यालयांना व मान्यताप्राप्त परिसंस्थांना विशेषीकृत अभ्यासक्रम सुरू करणे शक्य व्हावे यासाठी तरतूद करणे ;

(४) विद्यापीठ विभाग, प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये आणि अध्यापनासाठी आणि संशोधनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री यांचे आयोजन, परिरक्षण व व्यवस्थापन करणे ;

(५) संशोधन, विशेषीकृत अभ्यासक्रम किंवा विद्याविषयक सेवा युनिट यांचे विभाग व परिसंस्था यांची स्थापना करणे, त्या चालवणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(६) महाविद्यालये, परिसंस्था, वसतिगृहे, आरोग्य केंद्रे, श्रोतृगृहे आणि व्यायामशाळा यांची स्थापना करणे, त्या चालवणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(७) विद्यापीठ क्षेत्रात विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा विद्यापीठांचा गट किंवा महाविद्यालयांचा गट यांच्याद्वारे उपयोगात आणली जातील अशी विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्र शासन किंवा राज्य शासन यांनी स्थापना केलेली, आंतर विद्यापीठ केंद्रे, संशोधन प्रयोगशाळा, आधुनिक उपकरण साधना केंद्रे आणि अध्ययन केंद्रे यासारख्या स्वायत्त संस्था स्थापन करण्यासाठी तरतूद करणे :

परंतु असे की, स्वतःसाठी विद्यापीठांच्या अशा सुविधेचा लाभ घेणारा कोणताही उद्योग आणि कोणत्याही अशासकीय संघटना यांच्याबाबतीत, किंवा अशा संघटना विद्यापीठाला सुविधा उपलब्ध करून देत असतील त्या बाबतीत संबंधित विद्यापीठ राज्य शासनाची पूर्वसंमती घेईल ;

(८) संलग्न महाविद्यालयांच्या गटाला सेवा उपलब्ध करून देणेच्या दृष्टीने विद्यापीठ उप-क्षेत्रे स्थापन करण्यासाठी तरतूद करणे आणि या उप-क्षेत्रांमध्ये ग्रंथालये, प्रयोगशाळा, संगणक केंद्रे यांसारखी सामाईक साधन केंद्रे आणि अशी अन्य तत्सम अध्ययन केंद्रे स्थापन करण्याची तरतूद करणे व ती चालवणे ;

(९) विद्यापीठासाठी आवश्यक असणारी, संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते यांची पदे आणि अन्य अध्यापनविषयक किंवा दीर्घ सुटी नसलेली विद्याविषयक पदे निर्माण करणे आणि त्यांच्या अर्हता विहित करणे व त्या पदावर नियुक्ती करणे ;

(१०) विनिर्दिष्ट कालावधीसाठी विद्यापीठाचे संलग्न प्राध्यापक, संलग्न प्रपाठक, संलग्न अधिव्याख्याते, अभ्यागत प्राध्यापक, अभ्यागत सन्मान्य सदस्य म्हणून व्यक्तींना नियुक्त करणे किंवा मान्यता देणे ;

(११) अध्यापकेत्तर कुशल, प्रशासनिक, संघटनात्मक, लिपिकवर्गीय आणि इतर पदे निर्माण करणे व त्यांच्या अर्हता आणि वेतनमान विहित करणे आणि त्या पदांवर नियुक्ती करणे ;

(१२) संबंधित शिक्षकांच्या संमतीने शिक्षकांना विद्यापीठात इतरत्र व इतर विद्यापीठांमध्ये पाठवणे सुकर करणे ;

(१३) विनिर्दिष्ट पदव्या, पदविका किंवा प्रमाणपत्रे यांसाठी असलेल्या वेगवेगळ्या परीक्षांचे शिक्षणक्रम व अभ्यासक्रम विहित करणे ;

(१४) व्यवहार्य असेल तेथे विद्यापीठ विभागांमध्ये, संलग्न महाविद्यालयांमध्ये, परिसंस्थांमध्ये, मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये आणि प्रशालांमध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन राज्य व राष्ट्रीय योजना, विकासविषयक योजनांचे मूल्यमापन यांसह विविध विकासाविषयक कार्याची पाहणी व त्यांच्याशी संबंधित असलेली आकडेवारी, आधारसामग्री व इतर तपशील यांचे संकलन यासाठी तरतूद करणे ;

(१५) विद्यापीठ विभाग, संचालित आणि संलग्न महाविद्यालये, परिसंस्था, प्रशाला आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील वेगवेगळ्या अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रवेशाच्या संबंधात देखरेख, नियंत्रण व विनियम करणे ;

(१६) विद्यापीठाच्या अध्यापकांच्या संकोषामधून अध्यापकांची प्रतिनियुक्ती करून महाविद्यालयांतील अध्यापनाचे मार्गदर्शन करणे आणि संलग्न महाविद्यालयांचा, प्रशालांचा व पाठशालांचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांतील अध्यापनाची अनुपूर्ती करणे ;

(१७) परिक्षा किंवा इतर कोणत्याही चाचण्या यांच्या आधारे किंवा अन्य रीतीने पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करणे ;

(१८) विहित करण्यात आल्यानुसार व्यक्तींच्या परीक्षा घेणे आणि त्यांना पदव्या व पदव्युत्तर पदव्या देणे व पदविका आणि प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे ;

(१९) वहिःशाल विद्यार्थी आणि पत्रव्यवहार व दुरता पद्धतीद्वारे शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच मुक्त विद्यापीठाचे व निरंतर शिक्षणविषयक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी यांच्या परीक्षा घेणे, पदव्या, त्यांना पदविका आणि प्रमाणपत्रे देणे व त्यांना व्याख्याने, शिक्षण व प्रशिक्षण देण्याची तरतूद करणे ;

(२०) विहित करण्यात आल्याप्रमाणे सन्मान्य पदव्या किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे ;

(२१) व्यवस्थापनांची विश्वसनीयता आणि महाविद्यालये, विद्याशाखा व विषय यांच्या संबंधातील विद्याविषयक कामगिरीची वेळोवेळी ठरवून देण्यात येतील अशी मानके लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या संलग्नीकरणांच्या आणि परिसंस्थांना मान्यता देण्याच्या शर्ती ठरवून देणे आणि या शर्तीचे पालन केले जात असल्याबद्दल नियतकालिक मूल्यमापन करून स्वतःची खात्री करून घेणे ;

(२२) विद्यापीठाकडून चालविण्यात येत नसतील अशा संलग्न महाविद्यालयांना, परिसंस्थांना आणि पाठशालांना विद्यापीठाचे विशेषाधिकार प्रदान करणे आणि हे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही विशेषाधिकार काढून घेणे आणि विद्यापीठांकडून चालवल्या न जाणाऱ्या वसतिगृहांना मान्यता देणे आणि अशी मान्यता तात्पुरती किंवा कायमची काढून घेणे ;

(२३) संलग्नीकरणासाठी आणि नियतकालिक अधिस्वीकृतीसाठी संलग्न महाविद्यालयांच्या मान्यताप्राप्त, परिसंस्थांच्या प्रशालांच्या आणि पाठशालांच्या विद्याविषयक कामगिरीचे संनियंत्रण व मूल्यमापन करणे ;

(२४) आवश्यक असेल तेथे निरीक्षणाच्या प्रयोजनार्थ स्थापन करण्यात आलेल्या समुचित यंत्रणेमार्फत संलग्न महाविद्यालयांची, मान्यताप्राप्त परिसंस्थांची आणि पाठशालांची तपासणी करणे आणि त्यांच्यामध्ये शिक्षण, अध्यापन आणि प्रशिक्षण यांचा उचित दर्जा राखण्यात येत आहे आणि त्यांमध्ये ग्रंथालय, प्रयोगशाळा, कार्यशाळा आणि अन्य विद्याविषयक सोयीची पर्याप्त तरतूद करण्यात आली आहे याची खात्री करून घेण्यासाठी उपाय योजणे ;

(२५) विश्वस्तनिधी आणि दाननिधी धारण करणे त्यांची व्यवस्था पाहणे आणि विद्यापीठाचे, महाविद्यालयांचे, प्रशालांचे आणि पाठशालांचे अध्यापक आणि विद्यार्थी यांच्यासाठी अधिछात्रवृत्त्या, प्रवासी अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्या, पदके आणि पारितोषिके सुरू करणे व ती देणे ;

(२६) विहित करण्यात येईल अशी फी व इतर आकार निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ती प्राप्त करणे किंवा वसूल करणे ;

(२७) विद्यापीठ, संलग्न महाविद्यालये, परिसंस्था, मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रशाला, पाठशाला आणि वसतिगृहे यांमधील विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख ठेवणे, नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे विनियमन करणे ;

(२८) विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षणाकडून अनौपचारिक शिक्षणाकडे आणि अनौपचारिक शिक्षणाकडून औपचारिक शिक्षणाकडे जाता यावे यासाठी तरतूद करणे ;

(२९) विद्यापीठ, महाविद्यालये, प्रशाला, पाठशाला व परिसंस्था यांच्या अध्यापकांसाठी उजळणी किंवा सेवांतर्गत पाठ्यक्रमांच्या सुविधांची तरतूद करणे ;

(३०) विद्यापीठांच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणविषयक कार्यास चालना देण्याची व्यवस्था करणे ;

(३१) संलग्न महाविद्यालयांमध्ये, प्रशालांमध्ये, पाठशालांमध्ये व मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये अध्यापन आणि संशोधन यांचा समन्वय साधणे व नियमन करणे ;

(३२) विहित करण्यात आल्याप्रमाणे महाविद्यालये, प्रशाला, पाठशाला, परिसंस्था व विद्यापीठ यांचे अध्यापक आणि अध्यापकेत्तर कर्मचारी यांच्या कामाच्या नियतकालिक मूल्यमापनासाठी तरतूद करणे ;

(३३) विहित करण्यात आल्याप्रमाणे अध्यापनाच्या वेळेत व अध्यापनाच्या वेळेनंतर विद्यापीठ, महाविद्यालये, परिसंस्था, प्रशाला आणि पाठशाला यांच्या जागेमध्ये असणाऱ्या अध्यापकांच्या उपस्थितीचे नियमन करणे व उपस्थितीसाठी तरतूद करणे आणि खाजगी शिकवणी किंवा खाजगी खास शिकवणीवर्ग घेण्यास किंवा चालविण्यास अध्यापकांना मनाई करणे ;

(३४) अध्यापक व अध्यापकेत्तर कर्मचारीवर्गाकरिता वर्तणूक व शिस्त यासंबंधीच्या नियमांची आणि त्यांच्या अंमलबजावणीची तरतूद करणे ;

(३५) व्यवस्थापनांसाठी आचारसंहिता विहित करणे ;

(३६) आवश्यक असेल त्याबाबतीत,—

(अ) मुद्रण व प्रकाशन विभाग ;

(ब) विद्यापीठ विस्तार मंडळे ;

(क) माहिती केंद्रे ;

(ड) विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असतील असे इतर उपक्रम,

स्थापन करणे, चालविणे व त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(३७) संशोधन व सल्लागार सेवा यांसाठी अन्य कोणतेही विद्यापीठ, परिसंस्था, प्राधिकरण किंवा संघटना यांच्याशी सहकार्य करणे किंवा त्यांना सहयोग देणे आणि अशा प्रयोजनासाठी परिस्थितीनुरूप विवक्षित अभ्यासक्रम चालविण्यासाठी इतर विद्यापीठे, परिसंस्था, प्राधिकरणे किंवा संघटना यांच्याबरोबर योग्य ती व्यवस्था करणे ;

(३८) महाविद्यालयांना मंजूर केलेले संलग्नीकरण रद्द करणे ;

(३९) राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने विद्यापीठाच्या मालमत्तेच्या तारणावर, विद्यापीठाच्या प्रयोजनाकरिता पैसा कर्जाऊ घेणे ;

(४०) संशोधन व विकास, सल्लासेवा, प्रशिक्षण कार्यक्रम यांसारख्या कार्यक्रमांचा अंदाज घेऊन किंवा ते नव्याने सुरू करून आणि उद्योग, व्यापार किंवा अन्य कोणत्याही अशासकीय संघटना या क्षेत्रातील विविध ग्राहकांना सेवा उपलब्ध करून देऊन त्याद्वारे विद्यापीठाच्या साधनसंपत्तीत वाढ करण्याच्या शक्यतेचा शोध घेणे ;

(४१) संलग्न महाविद्यालयाच्या, परिसंस्थेच्या, प्रशालेच्या किंवा पाठशालेच्या व्यवस्थापनाने नियमबाह्य गोष्टी, किंवा दंडनीय स्वरूपाच्या कृती किंवा अकृती केलेल्या आहेत असे विद्यापीठाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीला प्रथमदर्शनी दिसून येईल त्याबाबतीत अशा महाविद्यालयाचे, परिसंस्थेचे, प्रशालेचे किंवा पाठशालेचे व्यवस्थापन सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हाती घेण्याची शिफारस राज्य शासनाला करणे ;

(४२) राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने विदेशातील विद्यापीठांबरोबर व परिसंस्थांबरोबर विद्याविषयक सहयोगी कार्यक्रम हाती घेणे ;

(४३) याबाबतीतील, केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या नियमांच्या व विनियमांच्या अधीन राहून विदेशी अभिकरणांकडून सहयोगी कार्यक्रमासाठी निधी स्वीकारणे ;

(४४) अध्यापक आणि विद्यापीठ अध्यापक यांच्याकरिता, आचारसंहिता, कार्यभार, कामगिरीच्या मूल्यनाची प्रमाणके, आणि विद्यापीठाच्या मते विद्याविषयक बाबींच्या संबंधात आवश्यक असतील अशा इतर सूचना किंवा निदेश यांसह सेवाविषयक शर्ती घालून देणे ;

(४५) साधनसंपत्ती निर्माण करण्याच्या दृष्टीने फी आकारून बाहेरील अभिकरणांकरिता उच्च शिक्षण, संशोधन, सल्लागार, सेवा-आधारित प्रकल्प यासंबंधातील विकास कार्यक्रम आणि प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेणे ;

(४६) पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे व प्रकाशनाचे काम हाती घेणे ;

(४७) साहित्यसंग्रह, संदर्भग्रंथ आणि विद्वताप्रचुर संशोधन कार्य यांच्या निर्मितीचे व प्रकाशनाचे काम हाती घेणे ;

(४८) विद्यापीठाची सर्व किंवा कोणतीही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक, किंवा अनुषंगिक किंवा हितावह असतील अशा इतर सर्व कृती व गोष्टी करणे ;

(४९) विद्यापीठाचे वरील अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्या संबंधात राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या कोणत्याही निदेशांचे पालन करणे व ते अंमलात आणणे.

राज्य शासनाचे नियंत्रण.

८. (१) राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय, विद्यापीठ,—

(अ) अध्यापकांची, अधिकाऱ्यांची किंवा इतर कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्माण करणार नाही ;

(ब) त्याच्या अध्यापकांचे, अधिकाऱ्यांचे व इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवानिवृत्तीनंतरचे लाभ व इतर लाभ यांत सुधारणा करणार नाही ;

(क) त्याच्या कोणत्याही अध्यापकांना, अधिकाऱ्यांना किंवा इतर कर्मचाऱ्यांना कोणतेही विशेष वेतन, भत्ते किंवा कोणत्याही स्वरूपाचे अन्य अतिरिक्त पारिश्रमिक, तसेच सानुग्रह प्रदान किंवा अपेक्षित वित्तीय भार असणारे अन्य लाभ देणार नाही ;

(ड) ठराविक प्रयोजनासाठी राज्य शासनाकडून मिळालेला कोणताही निधी तो ज्या प्रयोजनासाठी मिळालेला आहे, त्या प्रयोजनांव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापरणार नाही ;

(ई) स्थावर मालमत्तेचे विक्री किंवा भाडेपट्टा याद्वारे हस्तांतरण करणार नाही ;

(फ) राज्य शासनाकडून किंवा विद्यापीठ अनुदान आयोग किंवा कोणतीही व्यक्ती किंवा मंडळ याकडून मिळणाऱ्या निधीतून, ज्या प्रयोजनाकरिता निधी मिळाला आहे त्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनाकरिता कोणत्याही विकास कामांसाठी खर्च करणार नाही ;

(ग) संलग्न महाविद्यालयासंबंधात ज्यामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे राज्य शासनाचे वित्तीय दायित्व वाढेल असा कोणताही निर्णय घेणार नाही.

(२) पुढील ठिकाणाहून मिळणाऱ्या निधीतून खर्च करण्यास विद्यापीठ सक्षम असेल,—

(अ) राज्य शासनाकडून मिळणाऱ्या कोणत्याही अंशदानाचा हिस्सा नसणारा निधी देणारी विविध-अभिकरणे ;

(ब) स्वयंआधारित तत्वावर सुरू करण्यात आलेल्या विद्याविषयक कार्यक्रमांची फी ;

(क) विद्यापीठाच्या उद्दिष्टांना चालना देण्यासाठी, व्यक्ती, उद्योग, परिसंस्था, संघटना किंवा कोणतीही व्यक्ती याच्याकडून मिळालेली अंशदाने ;

(ड) विद्यापीठाने पुरवलेल्या अभ्यासविषयक किंवा इतर सेवांकरिता अंशदाने किंवा फी ;

(ई) पुढील प्रयोजनांकरिता विद्यापीठाने कोणताही विकास निधी स्थापन केलेला असेल, तर तो विकास निधी,—

(एक) विनिर्दिष्ट कालावधीकरिता विविध प्रवर्गामध्ये पदे निर्माण करणे ;

(दोन) निर्माण केलेल्या पदांच्या बाबतीत आपल्या स्वतःच्या निधीतून वेतन, भत्ते व इतर लाभ देणे, मात्र ती पदे शासकीय अंशदान मिळत असलेली पदे धारण करणाऱ्या व्यक्तींनी धारण केलेली नसावी ;

(तीन) स्वयंआधारित तत्त्वावर कोणताही विद्याविषयक कार्यक्रम सुरू करणे ;

(चार) बाब मंजुरीसाठी राज्य शासनाकडे न पाठवता कोणत्याही विकासविषयक कामावर खर्च करणे :

परंतु, राज्य शासनावर, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, तात्काळ किंवा भविष्यात कोणतेही वित्तीय दायित्व येत नसले पाहिजे.

(३) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या तरतुदीनुसार राज्य शासन, समान मानके साध्य करण्यासाठी आणि ती कायम राखण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विद्यापीठाचे अधिकारी, अध्यापक व इतर कर्मचारीवर्ग आणि (राज्य शासन, केंद्र सरकार आणि स्थानिक प्राधिकरणे यांच्याकडून व्यवस्थापन करण्यात येत असलेली व चालवण्यात येत असलेली महाविद्यालये व परिसंस्था खेरीजकरून इतर) संलग्न महाविद्यालयांमधील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अध्यापक व इतर कर्मचारीवर्ग यांचे वर्गीकरण, त्यांची निवड व नियुक्ती करण्याची रीत व पद्धती, अतिरिक्त ठरलेले अध्यापक व कर्मचारी सामावून घेणे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांतील व्यक्तींसाठी पदे राखून ठेवणे, पूर्वोक्त अधिकारी, अध्यापक व इतर कर्मचारीवर्ग यांची कर्तव्ये, कार्यभार, वेतन, भत्ते, सेवानिवृत्तीनंतरचे लाभ, इतर लाभ, वर्तणूक व शिस्तविषयक बाबी आणि सेवेच्या इतर शर्ती यासंबंधी प्रमाण संहिता विहित करू शकेल अशी संहिता विहित करण्यात आल्यानंतर संहितेमधील तरतुदी अधिभावी ठरतील आणि संहितेमध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींच्या संबंधात या अधिनियमान्वये करण्यात आलेले परिनियम, आदेश, विनियम आणि नियम यांत करण्यात आलेल्या तरतुदी त्या संहितेमधील तरतुदींशी जेथवर विसंगत असतील तेथवर विधि-अग्राह्य असतील.

(४) कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकार व कर्तव्ये अनुक्रमे वापरण्यात व पार पाडण्यात विद्यापीठाने कसूर केली असेल त्याबाबतीत किंवा विद्यापीठाने असे अधिकार व कर्तव्ये समुचित रीतीने अनुक्रमे वापरलेले किंवा पार पडलेली नसतील किंवा राज्य शासनाने काढलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन केलेले नसेल त्याबाबतीत, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, विद्यापीठास अशा अधिकारांचा योग्य वापर करण्याचा किंवा अशी कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडण्याचा किंवा आदेशांचे पालन करण्याचा निदेश देता येईल ; व अशा निदेशाचे पालन करणे हे विद्यापीठाचे कर्तव्य असेल.

(५) राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशा ठराविक कालांतरांनी विद्यापीठ, महाविद्यालय प्रशाला किंवा परिसंस्था यांच्या लेख्यांची नियमितपणे चाचणी लेखापरीक्षा किंवा संपूर्ण लेखापरीक्षा करता येईल.

प्रकरण तीन

## विद्यापीठाचे अधिकारी

### (अ) कुलाधिपती (कुलपती)

कुलाधिपती व त्याचे अधिकार.

९. (१) त्या त्या वेळी असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल हे विद्यापीठाचे कुलाधिपती असतील व कुलाधिपती त्याच्या पदपरत्वे विद्यापीठाचा प्रमुख असेल.

(२) कुलाधिपती हा उपस्थित असेल तेव्हा, विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षपद स्वीकारेल व तो कुलगुरूस आवश्यक असेल तेव्हा कोणत्याही विशिष्ट प्रयोजनासाठी विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची सभा बोलविण्याचा निदेश देऊ शकेल व कुलगुरू अशा सभेचे कार्यवृत्त कुलाधिपतीस त्याच्या अवलोकनार्थ सादर करील..

(३) कुलाधिपतीस, विद्यापीठाच्या कोणत्याही कारभाराशी संबंधित असे अभिलेख व माहिती मागविता येईल व त्यावर त्यास विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने योग्य वाटतील असे निदेश देता येतील व विद्यापीठाची प्राधिकरणे व अधिकारी अशा निदेशांचे पालन करतील.

(४) कुलाधिपतीस, कुलगुरूकडून लेखी अहवाल घेतल्यानंतर कोणत्याही प्राधिकरणाचा, मंडळाचा, समितीचा किंवा अधिकाऱ्याचा 'ज़ो कोणताही ठराव, आदेश किंवा कामकाज त्याच्या मते या अधिनियमाशी त्याखाली केलेल्या परिनियमांशी, आदेशांशी किंवा विनियमांशी सुसंगत नसेल किंवा विद्यापीठाच्या हिताचा नसेल तो ठराव, आदेश, किंवा कामकाज आदेशाद्वारे स्थगित करता येईल, किंवा त्यात फेरफार करता येईल, आणि विद्यापीठ प्राधिकरण, मंडळ, समिती व अधिकारी त्याचे पालन करतील :

परंतु, कुलाधिपती असा कोणताही आदेश देण्यापूर्वी, विद्यापीठ, प्राधिकरण, मंडळ, समिती किंवा यथास्थिती, अधिकारी याला, असा आदेश का देण्यात येऊ नये याची कारणे दाखविण्यास फर्मावील व कुलाधिपतीने ठरवून दिलेल्या कालावधीत जर कोणतेही कारण दाखविण्यात आले तर तो ते विचारात घेईल आणि ज्याबाबतीत त्यास आवश्यक वाटेल त्या बाबतीत राज्य शासनाशी विचारविनिमय करून तो त्या प्रकरणात कोणती कार्यवाही करायची हे ठरवील व त्याचा निर्णय अंतिम राहील.

(५) ज्या बाबतीत कुलाधिपतीच्या मते, निवडून दिलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या किंवा नियुक्त केलेल्या किंवा स्वीकृत केलेल्या कोणत्याही सदस्याचे वर्तन विद्यापीठाचे किंवा कोणत्याही प्राधिकरणाचे किंवा मंडळाचे किंवा समितीचे कामकाज सुरळीत चालण्यास बाधक ठरत असेल तर तो अशा सदस्यास त्याचे लेखी स्पष्टीकरण देण्याची संधी दिल्यानंतर व अशा प्रकारचे कोणतेही स्पष्टीकरण मिळाल्यास त्यावर विचार करून आणि असे करणे आवश्यक आहे याबद्दल स्वतःची खात्री करून घेतल्यानंतर अशा सदस्यास त्याला योग्य वाटेल तेवढ्या कालावधीकरिता निलंबित करू शकेल किंवा अपात्र ठरवू शकेल.

(६) कुलाधिपती या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यास प्रदान करण्यात येतील किंवा त्याच्याकडे निहित करण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करील व अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.

### (ब) विद्यापीठाचे इतर अधिकारी

विद्यापीठाचे इतर अधिकारी.

१०. विद्यापीठाचे इतर अधिकारी पुढीलप्रमाणे असतील, ते असे :—

(१) कुलगुरू ;

(२) सम कुलगुरू ;

(३) अधिष्ठाता ;

(४) कुलसचिव ;

(५) परीक्षा नियंत्रक ;

(६) संचालक, नियोजन विकास मंडळ ;

(७) ग्रंथपाल ;

(८) वित्त लेखा अधिकारी ;

(९) संचालक, विस्तार सेवा मंडळ ;

(१०) संचालक, छात्र कल्याण ;

(११) परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे विद्यापीठाच्या सेवेतील इतर अधिकारी.

११. (१) कलम १२ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नियुक्त करण्यात आलेला एक कुलगुरू असेल व तो विद्यापीठाचा मुख्य कार्यकारी व विद्याविषयक अधिकारी आणि व्यवस्थापन परिषद, विद्वत् परिषद, परीक्षा मंडळ, वित्त लेखा समिती व विस्तार सेवा मंडळ यांचा पदसिद्ध अध्यक्ष असेल व तो कुलाधिपतीच्या अनुपस्थितीत पदव्या प्रदान करण्यासाठी कोणत्याही दीक्षांत समारंभात अध्यक्ष म्हणून काम पाहील. कुलगुरू व सम कुलगुरू.

(२) सम कुलगुरूची नियुक्ती कलम १३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे करण्यात येईल व सम कुलगुरू, कुलगुरूने त्यास विशेषरीत्या नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यास जबाबदार राहील. तो कुलगुरूच्या अनुपस्थितीत विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारील.

१२. [1][(१) कुलाधिपती हा, कुलगुरूची पुढील पद्धतीने नियुक्ती करील :— कुलगुरूची नियुक्ती.

(क) कुलगुरूच्या नियुक्तीसाठी कुलाधिपतींना योग्य अशा नावांची शिफारस करण्याकरिता पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक समिती असेल :—

(एक) कुलाधिपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश असेल किंवा उच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य न्यायमूर्ती असेल अथवा राष्ट्रीय ख्यातीचा विख्यात संशोधक असेल वा त्याला शिक्षण क्षेत्रातील पद्म पुरस्कार मिळाला असेल ;

(दोन) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव किंवा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला शासनाच्या प्रधान सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी ;

(तीन) राज्य शासनाने, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व्यवस्थापन परिषद व विद्वत परिषद यांनी संयुक्तपणे नामनिर्देशित केलेला एक प्रख्यात संस्कृत विद्याव्यासंगी किंवा भारतीय प्राद्योगिकी संस्था, भारतीय व्यवस्थापन संस्था, भारतीय विज्ञान संस्था, भारतीय अवकाश संशोधन संस्था किंवा राष्ट्रीय संशोधन प्रयोगशाळा यांसारख्या राष्ट्रीय नामांकित संस्था किंवा संघटना यांचा संचालक किंवा प्रमुख असेल ;

(ख) कुलाधिपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य हा समितीचा अध्यक्ष असेल ;

(ग) नामनिर्देशित केलेले सदस्य हे विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या व्यक्ती असतील ;

(घ) समितीचे सर्व तीन सदस्य उपस्थित असल्याखेरीज समितीची कोणतीही बैठक घेतली जाणार नाही.]

(२) नामिका तयार करण्याची प्रक्रिया ही कुलगुरूची जागा रिक्त होण्याच्या संभाव्य तारखेच्या कमीत कमी तीन महिने अगोदर सुरू होईल व ती कुलाधिपतीने ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल. तथापि, कुलाधिपतीला, परिस्थितीच्या निकडीनुसार कालावधी वाढविणे आवश्यक असल्यास तसे करता येईल ; मात्र, असा वाढविण्यात आलेला कालावधी एकूण तीन महिन्यांपेक्षा जास्त असणार नाही.

[2][(३) समिती, कुलाधिपतीच्या विचारार्थ, कमीत कमी पाच योग्य व्यक्तींच्या नामिकेची कुलगुरू म्हणून नियुक्ती केली जाण्यासाठी शिफारस करील. अशा प्रकारे शिफारस करण्यात आलेली नावे, कोणताही पसंतीक्रम् न दर्शविता वर्णक्रमानुसार नमूद केलेली असतील. नामिकेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक व्यक्तींच्या योग्यतेची सविस्तर माहिती अहवालासोबत असेल.

(३क) कुलगुरू म्हणून नियुक्तीसाठी समितीद्वारे शिफारस केलेली व्यक्ती,—

(क) प्रख्यात विद्वान असेल किंवा उच्च दर्जाचा प्रशासक असेल ;

---

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १४ (क) अन्वये पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ख) अन्वये पोट-कलम (३) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(ख) स्वतःच्या उदाहरणाने नेतृत्व करण्यास समर्थ असेल ;

(ग) दूरदृष्टी देण्यास समर्थ असेल आणि ती दृष्टी विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या हितासाठी प्रत्यक्षात आणण्यास सक्षम असेल ; आणि

(घ) राज्य शासनाने कुलाधिपतीशी विचारविनिमय करून, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेली अशी शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारी असेल.

(३ख) सर्वात योग्य उमेदवारांची शिफारस व्हावी याची सुनिश्चिती करण्याकरिता, पात्रतेच्या शर्ती व कुलगुरू म्हणून नियुक्तीसाठी नावांच्या शिफारशींची प्रक्रिया यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात येईल.]

(४) कुलाधिपती नामिकेत समाविष्ट असलेल्या व्यक्तींपैकी एका व्यक्तीची कुलगुरू म्हणून नियुक्ती करील :

परंतु, अशा प्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती कुलाधिपतीला मान्य नसेल तर तो एकतर त्याच समितीकडून किंवा या प्रयोजनासाठी नवीन समिती स्थापन केल्यानंतर अशा नवीन समितीकडून नवीन नामिका मागवू शकेल.

(५) कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती ही तिच्या सेवा कराराच्या अटी व शर्तींना अधीन राहून तिने अधिकारपद ग्रहण केल्याच्या तारखेपासून पाच वर्षांचा अवधी किंवा तिच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंतचा अवधी या दोन्हीपैकी जो कोणताही अवधी अगोदर पूर्ण होईल तोपर्यंत पद धारण करील.

(६) कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती या नियुक्तीपूर्वी ज्या कोणत्या पदावर कायम झाली असेल त्या पदावर तिचा कोणताही धारणाधिकार असल्यास, तिला तो धारणाधिकार असेल.

(७) जी केवळ कुलाधिपतीच अस्तित्वात असल्याबद्दलचा निर्णय करील त्या पुढीलपैकी कोणत्याही परिस्थितीत म्हणजेच,—

(अ) ज्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या समितीला कुलाधिपतीने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत कोणत्याही नावाची शिफारस करता येत नसेल ;

(ब) ज्या बाबतीत मृत्यू, राजीनामा यामुळे किंवा अन्य कारणामुळे कुलगुरूचे पद रिक्त झाले असेल व ते पद पोट-कलमे (१) ते (४) यांच्या तरतुदींनुसार सुकरतेने व शीघ्रतेने भरता येत नसेल ;

(क) ज्या बाबतीत रजा, आजार यामुळे किंवा अन्य कारणामुळे कुलगुरूचे पद तात्पुरते रिक्त झाले असेल ;

(ड) ज्या बाबतीत कुलगुरूचा पदावधी समाप्त झालेला असेल ; किंवा

(ई) ज्या बाबतीत इतर कोणत्याही प्रकारची निकडीची परिस्थिती असेल ;

त्या बाबतीत कुलाधिपतीला त्याच्या आदेशात तो विनिर्दिष्ट करील अशा, एकूण सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरीता कोणत्याही योग्य अशा व्यक्तीची कुलगुरू म्हणून काम करण्यासाठी नियुक्ती करता येईल :

परंतु, अशा प्रकारे नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती ही, ज्या तारखेस पोट-कलमे (१) ते (४) च्या तरतुदींनुसार कुलगुरू म्हणून नियुक्ती केलेली व्यक्ती पद ग्रहण करील किंवा कुलगुरू त्या पदावर पुन्हा रूजू होईल, त्या तारखेपासून पदावर राहणार नाही.

(८) कुलगुरू हा विद्यापीठाचा पूर्णवेळ वेतनी अधिकारी असेल व त्याला राज्य शासन निर्धारित करील असे वेतन व भत्ते मिळतील. याखेरीज त्याला मोफत सुसज्ज निवासस्थान, त्याच्या वापरासाठी मोटारगाडी (तिचे परिरक्षण, दुरूस्ती व त्यासाठी आवश्यक असलेले इंधन यांसह) व शेफरची सेवा मोफत मिळण्याचा हक्क असेल.

(९) राज्य शासन मान्यता देईल असा आतिथ्य भत्ता, कुलगुरूकडे देण्यात येईल.

(१०) जर एखाद्या व्यक्तीस राज्याच्या एकत्रीकृत निधीतून मानधन मिळत असेल किंवा जर संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्राचार्याची किंवा विद्यापीठाच्या अध्यापकाची कुलगुरू म्हणून नियुक्ती झालेली असेल तर कुलगुरू म्हणून असलेल्या त्याच्या पदावधीत त्याच्या सेवेच्या अटी व शर्तीमध्ये त्याचे अहित होईल अशा प्रकारे फेरफार करण्यात येणार नाहीत.

(११) पूर्वग्रामी पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती तिच्या मूळ पदाच्या सेवेच्या अटी व शर्तीनुसार त्या पदावरून निवृत्त होईल.

(१२) कुलगुरूला आपल्या सहीने कुलाधिपतीला संबोधून लिहिलेली एक महिन्याची नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि त्याचा राजीनामा कुलाधिपतीने स्वीकारणे किंवा उक्त नोटीशीचा कालावधी समाप्त होणे यापैकी जे अगोदर घडेल त्या दिवसापासून तो आपल्या पदावर राहणार नाही.

(१३) कुलाधिपतीची जर अशी खात्री पटेल की कुलगुरू हा—

(अ) भ्रमिष्ट झाला आहे आणि सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे जाहीर केले आहे ;

(ब) नैतिक अधःपात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाकरीता न्यायालयाकडून दोषी ठरविण्यात आलेला आहे ;

(क) अमुक्त नादार झाला आहे आणि सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे जाहीर केले आहे ;

(ड) तो शारीरिकदृष्ट्या अपात्र झाला आहे, आणि दीर्घकाळाच्या आजारामुळे किंवा विकलांगतेमुळे त्याची कामे पार पाडण्यास तो असमर्थ झालेला आहे ;

(ई) तो कोणत्याही पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य आहे किंवा त्या पक्षाशी वा संघटनेशी अन्य प्रकारे संबंधित आहे, किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात भाग घेत आहे किंवा त्यासाठी मदतीदाखल वर्गणी देत आहे ;

तर कुलगुरू त्याच्या पदावरून काढून टाकला जाऊ शकेल.

**स्पष्टीकरण.**—या उपखंडाच्या प्रयोजनासाठी, कोणताही पक्ष राजकीय पक्ष आहे किंवा कोणतीही संघटना राजकारणामध्ये भाग घेते किंवा कोणतीही चळवळ किंवा कार्य या उपखंडाच्या व्याप्तीमध्ये येते, किंवा कसे यासंबंधातील कुलाधिपतीचा निर्णय अंतिम राहील.

परंतु, खंड (ड) आणि (ई) अन्वये कुलगुरूला काढून टाकण्यापूर्वी कुलाधिपती कुलगुरूला कारणे दाखविण्याची वाजवी संधी देईल.

**१३.** (१) कुलाधिपतीला कुलगुरूशी विचारविनिमय केल्यानंतर, विद्यापीठासाठी सम कुलगुरूची नियुक्ती करील. सम कुलगुरूच्या नियुक्तीची रीत.

(२) सम कुलगुरू हा, जिला किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल व जिने महाविद्यालयाच्या प्राध्यापकाचे, प्रपाठकाचे किंवा प्राचार्याचे अथवा परिसंस्थेच्या पदनिर्देशित प्रपाठकाचे पद धारण केले असेल अशी व्यक्ती असेल.

(३) सम कुलगुरूचा पदावधी कुलगुरूचा पदावधी समाप्त होणे किंवा त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होणे यांपैकी जी घटना अगोदर घडेल तोपर्यंत असेल.

(४) सम कुलगुरू हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल आणि त्याला अनुज्ञेय असणारे वेतन व भत्ते तसेच त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती या राज्य शासनाने निर्धारित केल्यानुसार असतील.

(५) सम कुलगुरूचे पद रिक्त होईल किंवा आजारपण ; अनुपस्थिती किंवा इतर कोणतेही कारण यामुळे तो आपल्या पदाची कामे पार पाडण्यास असमर्थ झाला असेल तर त्यावेळी कुलाधिपतीला कुलगुरूच्या शिफारशीवरून सम कुलगुरू कामावर परत रूजू होईपर्यंत किंवा यथास्थिती नवीन सम कुलगुरू पद ग्रहण करीपर्यंत सम कुलगुरू म्हणून पदावर स्थानापन्न म्हणून काम करण्याकरिता सम कुलगुरू म्हणून नियुक्ती होण्यास अर्हताप्राप्त अशा योग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

कुलगुरूचे अधिकार व कर्तव्ये.

**१४.** (१) कुलगुरू हा विद्यापीठाचा प्रमुख विद्याविषयक व कार्यकारी अधिकारी असेल आणि तो विद्यापीठाच्या विद्याविषयक कार्यक्रमांच्या विकासासाठी जबाबदार असेल. विद्यापीठाचे कामकाज कार्यक्षमतापूर्वक व सुव्यवस्थितरित्या चालावे यासाठी विद्यापीठाच्या विद्याविषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि सामान्य प्रशासन यांच्यावर तो देखरेख करील व संनियंत्रण ठेवील.

(२) त्याला विद्यापीठाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळांच्या कोणत्याही बैठकींमध्ये हजर राहण्याचा व बोलण्याचा हक्क असेल, परंतु, तो त्या प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा अध्यक्ष किंवा सदस्य नसेल तर त्याला तेथे मत देण्याचा हक्क असणार नाही.

(३) कुलगुरूला कोणत्याही प्राधिकरणांच्या, मंडळांच्या किंवा समित्यांच्या बैठकी बोलावणे आवश्यक वाटेल तेव्हा त्याला त्यांच्या बैठकी बोलावण्याचा अधिकार असेल.

(४) कुलगुरू, कुलाधिपतीने काढलेल्या निदेशाचे काटेकोर अनुपालन किंवा यथास्थिती, अंमलबजावणी करण्यात येत असल्याबद्दल खात्री करून घेईल.

(५) या अधिनियमातील तरतुदी, परिनियम, आदेश व विनियम यांचे काटेकोर पालन करण्यात येत आहे तसेच हा अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्याशी विसंगत नसतील असे, प्राधिकरणांचे, मंडळांचे व समित्यांचे जे निर्णय असतील त्यांची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यात येत आहे, याबाबत खात्री करून घेणे हे कुलगुरूचे कर्तव्य असेल.

(६) विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण, मंडळ किंवा समिती यांनी घेतलेला निर्णय किंवा संमत केलेला ठराव हा, कुलगुरूच्या मते, अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्या तरतुदींशी सुसंगत नसेल किंवा असा ठराव किंवा निर्णय हा विद्यापीठाच्या हिताचा नसेल तर कुलगुरूला त्याची अंमलबजावणी लांबणीवर टाकता येईल आणि संधी मिळाल्यानंतर ताबडतोब संबंधित प्राधिकरण, मंडळ किंवा समिती यांच्याकडे कारणे लेखी नमूद करून पुढील बैठकीमध्ये मांडण्यासाठी फेरविचारार्थ परत पाठविता येईल. मतभेद कायम राहिले तर कुलगुरू एक आठवड्याच्या आत कारणे देऊन कुलाधिपतीकडे निर्णयार्थ तो सादर करील आणि असे केल्याबद्दल संबंधित प्राधिकरण, मंडळ किंवा समिती यांच्या सभासदांना कळवील. कुलाधिपतीचा निर्णय आल्यानंतर कुलगुरू कुलाधिपतीच्या निदेशांनुसार कार्यवाही करील आणि तद्नुसार संबंधित प्राधिकरण, मंडळ किंवा समिती यांना कळवील.

(७) तातडीने कार्यवाही करण्यासारखी निकडीची परिस्थिती आहे असे रास्त कारणांवरून कुलगुरूला वाटले तर तो त्यास आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करील आणि ज्या कारणांमुळे निकडीची परिस्थिती निर्माण झाली असल्याबद्दल त्याला खात्री वाटली ती कारणे आणि त्याने केलेली कार्यवाही एरवी ज्यांनी या बाबींच्या संबंधात कार्यवाही केली असती त्या प्राधिकरणाला किंवा मंडळास शक्य तितक्या लवकर लेखी कळवील. निकडीची परिस्थिती खरोखरच होती किंवा कसे याबद्दल किंवा (ज्या बाबतीत विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा कार्यवाहीमुळे बाधा पोहोचत नसेल त्या बाबतीत) केलेल्या कार्यवाहीबद्दल किंवा दोन्हीबद्दल कुलगुरू आणि प्राधिकारण किंवा मंडळ यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले तर ती बाब कुलाधिपतीकडे निर्णयासाठी पाठविण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.:

परंतु, ज्या बाबतीत कुलगुरूने केलेल्या अशा कोणत्याही कार्यवाहीमुळे विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला बाधा पोहोचत असेल त्याबाबतीत अशा व्यक्तीला, तिला अशा कार्यवाहीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कुलाधिपतीकडे अपील दाखल करण्याचा हक्क असेल.

(८) जी कोणतीही बाब परिनियम, आदेश किंवा विनियम यांद्वारे विनियमित करावयाची असेल परंतु त्यासंबंधात कोणतेही परिनियम, आदेश किंवा विनियम नसतील तर कुलगुरू त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देऊन ती बाब त्या वेळेपुरती विनियमित करू शकेल आणि संधी मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मान्यतेसाठी संबंधित व्यवस्थापन परिषद किंवा प्राधिकरण किंवा मंडळ यांच्यापुढे मांडील. त्याचबरोबर तो यासंबंधात करावयाचे असलेले परिनियम, आदेश किंवा यथास्थिती विनियम यांचा मसुदा विचारार्थ अशा प्राधिकरणापुढे किंवा मंडळापुढे ठेवील.

(९) कुलगुरू हा, नियुक्तीच्या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशींनुसार विद्यापीठ अध्यापकांसाठी नियुक्ती व ज्ञानशाखा प्राधिकारी असेल.

(१०) कुलगुरू हा, विद्यापीठातील सहायक कुलसचिवांच्या दर्जाच्या आणि त्याच्याशी समतुल्य व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी नियुक्ती व शिस्तभंगविषयक प्राधिकारी असेल.

(११) विद्यापीठाची प्राधिकरणे किंवा मंडळे किंवा समित्या यांचा अध्यक्ष या नात्याने, कुलगुरूला प्राधिकरण, मंडळ किंवा समिती यांच्या बैठकीतून एखाद्या सदस्यास, त्याने कामकाजात सतत अडथळे आणण्याचा किंवा ती थांबविण्याचा प्रयत्न केल्यामुळे किंवा सदस्याला न शोभणारी वर्तणूक केल्यामुळे निलंबित करण्याचा अधिकार असेल व तो ती बाब त्यानुसार कुलाधिपतीला कळवील.

(१२) कुलगुरू, अधिनियमाअन्वये तरतूद केल्यानुसार ठराविक कालांतराने विद्यापीठाच्या कामकाजाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवील.

(१३) कुलगुरू, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्याला प्रदान करण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करील व अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.

(१४) (अ) कुलगुरूला, तो निदेश देईल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे मंडळ यांच्याकडून विद्यापीठ, त्याच्या इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये, कार्यशाळा व साधनसामग्री यांची तपासणी तसेच विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी किंवा विद्यापीठाने मान्यता दिलेली कोणतीही परिसंस्था, संलग्न, संचालित महाविद्यालय, प्रशाला, पाठशाला, सभागृह किंवा वसतिगृह यांची तपासणी आणि विद्यापीठाच्या परीक्षांची, विद्यापीठाकडून किंवा त्यांच्या वतीने करण्यात येणारे अध्यापन किंवा इतर कामकाज याची तपासणी करवून घेण्याचा आणि विद्यापीठ संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे प्रशासन किंवा वित्त व्यवस्था यांच्याशी संबंधित कोणत्याही बाबीची त्याच पद्धतीने चौकशी करवून घेण्याचा प्राधिकार असेल :

परंतु, कुलगुरू संलग्न महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या बाबतीत अशा संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या किंवा पाठशालेच्या व्यवस्थापनाला अशा प्रकारे, तपासणी करण्याची किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करण्याच्या त्याच्या उद्देशाबद्दल नोटीस देईल :

परंतु, आणखी असे की, व्यवस्थापनाला अशी तपासणी किंवा चौकशी करण्यात येण्यापूर्वी, त्याला आवश्यक वाटेल असे अभिवेदन कुलगुरूकडे करण्याचा अधिकार असेल :

(ब) असे कोणतेही अभिवेदन करण्यात आले असल्यास ते विचारात घेतल्यानंतर कुलगुरूला अशी तपासणी किंवा चौकशी करवून घेता येईल किंवा ती चौकशी सोडून देता येईल ;

(क) व्यवस्थापनाच्या बाबतीत, तपासणी किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करण्यात आली असेल त्यावेळी, व्यवस्थापनात एक प्रतिनिधी नियुक्त करण्याचा हक्क असेल आणि त्या प्रतिनिधीला अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी हजर राहण्याचा व आपले म्हणणे मांडण्याचा हक्क असेल ;

(ड) ही तपासणी किंवा चौकशी विद्यापीठाचे विशेषाधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही महाविद्यालयासंबंधात किंवा परिसंस्थेच्या संबंधात असेल तर कुलगुरू अशा तपासणीचा किंवा चौकशीचा निष्कर्ष व्यवस्थापनाला कळवू शकेल ;

(ई) व्यवस्थापन, त्याने करण्याचे योजलेली किंवा केलेली अशी कोणतीही कारवाई असेल तर त्याबाबत कुलगुरूला कळवील ;

(फ) व्यवस्थापनाने, कुलगुरूकडून निश्चित करण्यात आलेल्या मुदतीत, त्याचे समाधान होईल अशी कार्यवाही केली नाही तर, कुलगुरू व्यवस्थापनाने सादर केलेला तपासणी किंवा चौकशी अहवाल आणि स्पष्टीकरण, किंवा केलेले अभिवेदन विचारार्थ व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवील.

अधिष्ठाता.

१५. (१) प्रत्येक संकायासाठी एक अधिष्ठाता असेल तो त्याच्या संकायाचा शैक्षणिक विकास, अध्यापनाचा व संशोधनाचा दर्जा राखणे व त्याच्या संकायातील अध्यापकाचे प्रशिक्षण यांच्यासंबंधात विद्वत् परिषदेकडून मान्यता देण्यात आलेल्या विद्याविषयक धोरणांची अंमलबजावणी करण्याशी संबंधित व त्यास जबाबदार असलेला विद्यापीठाचा विद्याविषयक अधिकारी असेल.

(२) कुलगुरू, विहित केल्याप्रमाणे शिक्षकांमधून प्रत्येक संकायाचा अधिष्ठाता नामनिर्देशित करील.

(३) अधिष्ठाता, पाच वर्षाच्या कालावधीकरिता पद धारण करील.

(४) अधिष्ठाता, संकायाच्या शैक्षणिक विकासासाठी जबाबदार असेल आणि तो व्यवस्थापन परिषद, विद्वत परिषद, नियोजन विकास मंडळ, परीक्षा मंडळ यांच्या, त्याच्या संकायाशी संबंधित अशा निर्णयाची आणि त्याच्या कक्षेतील संकायाच्या व अध्ययन मंडळांच्या निर्णयाची उचितरीत्या अंमलबजावणी करण्यात येत असल्याबद्दल खात्री करुन घेईल.

(५) अधिष्ठाता विद्वत परिषदेकडून निदेश देण्यात आल्यानंतर विद्यापीठ विभाग, संलग्न किंवा संचालित महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा प्रशाला किंवा पाठशाला यांनी त्यांच्या विद्याशाखेतील कोणत्याही शैक्षणिक कार्यक्रमासंबंधात केलेल्या कोणत्याही गैरव्यवहाराची चौकशी करील व त्याचे निष्कर्ष विद्वत् परिषदेला कळवील.

नियोजन विकास मंडळाचा संचालक.

१६. (१) संचालक, नियोजन विकास मंडळ हा कुलगुरूकडून विद्यापीठाच्या, परिसंस्थेच्या, विभागांच्या अध्यापकामधून किंवा प्राचार्यांमधून नामनिर्देशित करण्यात येईल.

संचालक,—

(अ) पदव्युत्तर अध्यापन, संशोधन व विस्तार कार्यक्रम आणि विद्यापीठाचे सहभागात्मक कार्यक्रम यांसह विद्याविषयक विकास कार्यक्रमांसाठी मुख्य विद्याविषयक नियोजन व विद्याविषयक लेखापरीक्षा अधिकारी असेल ;

(ब) संचालक, नियोजन विकास मंडळाबरोबर, विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, मान्यताप्राप्त परिसंस्था, पदव्युत्तर केंद्रे व संलग्न महाविद्यालये यांची विद्याविषयक लेखापरीक्षा करण्यास जबाबदार असेल ;

(क) विद्यापीठ व त्याची संलग्न महाविद्यालये यांच्या विद्याविषयक कार्यक्रमांतील दीर्घ मुदतीच्या व अल्प मुदतीच्या विकास योजनांसंबंधात मंडळाने घेतलेल्या निर्णयांची कार्यवाही व अंमलबजावणी संबंधित प्राधिकरणे, मंडळे, समित्या आणि अधिकारी यांच्याकडून केली जात आहे, याची खात्री करून घेण्यास जबाबदार असेल ;

(ड) विद्यापीठाच्या सहभागात्मक व विकासविषयक कार्यक्रमांसाठी निधी उभारण्याच्या संबंधात बाहेरील वित्तव्यवस्था संस्थांशी संपर्क साधणारा मुख्य अधिकारी असेल व तो त्यांच्या उचित वापरावर सनियंत्रण ठेवील ;

(ई) विद्यापीठ, महाविद्यालये, प्रशाला व पाठशाला आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंस्था आणि वैज्ञानिक, औद्योगिक व वाणिज्यि संघटना यांच्यामधील सहयोग वृद्धिंगत करण्यासाठी व त्यास चालना देण्यासाठी संपर्क साधण्यास जबाबदार असेल ;

(फ) विविध विकासविषयक व सहभागात्मक कार्यक्रमांसंबंधात साध्य केलेल्या प्रगतीबाबत कुलगुरुला वार्षिक अहवाल सादर करण्यास जबाबदार असेल आणि कुलगुरू तो अहवाल विद्वत् परिषदेपुढे ठेवील.

कुलसचिव, नियुक्ती आणि कर्तव्ये.

१७. (१) नियुक्तीच्या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरू कुलसचिवाची नियुक्ती करील.

(२) कुलसचिव हा विद्यापीठाचा मुख्य प्रशासनिक अधिकारी असेल. तो पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल व तो थेट कुलगुरूचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण यांखाली काम करील,

(३) कुलसचिवाची नियुक्ती पाच वर्षासाठी करण्यात येईल व तो फेरनियुक्तीस पात्र असेल. कुलसचिवाची निवड करण्याच्या प्रयोजनासाठी असलेल्या अर्हता व लागणारा अनुभव हा विद्यापीठ अनुदान आयोगाने घालून दिल्याप्रमाणे व राज्य शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे असेल ;

परंतु, कोणीही व्यक्ती तिच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर, कुलसचिवाचे पद धारण करणार नाही.

(४) कुलसचिवाचे पद रिकामे होईल त्याबाबतीत किंवा आजाराच्या कारणामुळे, अनुपस्थित असल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे कुलसचिव सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतका काळ आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत कुलगुरू यथास्थिति, नवीन कुलसचिवाची नियुक्ती होऊन तो पद धारण करीतोपर्यंत किंवा कुलसचिव पदावर रजू होईतोपर्यंत कुलसचिव म्हणून काम करण्यासाठी योग्य त्या व्यक्तीची नियुक्ती करील.

(५) कुलसचिव हा, व्यवस्थापन परिषदेचा, विद्वत् परिषदेचा व या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात आलेल्या अशा इतर प्राधिकरणांचा, मंडळांचा व समित्यांचा सचिव म्हणून काम पाहिल.

(६) कुलसचिव, हा अध्यापक, दीर्घ सुटी नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्ग व सहायक कुलसचिव व तत्सम दर्जाची किंवा त्यावरील दर्जाची पदे धारण करणारे इतर अधिकारी या व्यतिरिक्त विद्यापीठाच्या अन्य कर्मचाऱ्यांचा नियुक्ती व शिस्तभंगविषयक प्राधिकारी असेल. कुलसचिवाच्या निर्णयामुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस असा निर्णय त्यास कळल्यापासून तीस दिवसांच्या आत कुलगुरूकडे अपील दाखल करता येईल.

(७) विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या निर्णयांस अधीन राहून कुलसचिवास विद्यापीठाच्या वतीने करार करण्याचा, दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्याचा व अभिलेख अधिप्रमाणित करण्याचा अधिकार असेल.

(८) कुलसचिव हा, विद्यापीठाच्या, अभिलेखांच्या समाईक शिक्क्याच्या आणि व्यवस्थापन परिषद त्याच्याकडे सुपूर्द करील अशा, विद्यापीठाच्या इतर मालमत्तेच्या अभिरक्षेसाठी जबाबदार असेल.

(९) प्राधिकरणे, मंडळे किंवा समित्या यांच्याकडून वेळोवेळी मान्यता देण्यात येईल असे परिनियम, आदेश व विनियम यांची एक पुस्तिका कुलसचिव तयार करील व ती अद्ययावत ठेवील आणि प्राधिकरणाचे सर्व संबंधित सदस्य व विद्यापीठाचे अधिकारी यांना ती उपलब्ध करून देईल.

(१०) प्रशासनात सुधारणा करण्याच्या संबंधातील तक्रारी व सूचना कुलसचिव स्वीकारील व त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासंबंधात त्यांचा विचार करील.

(११) कुलसचिव, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये वेळोवेळी विहित करण्यात येतील किंवा कुलगुरूकडून त्यास नेमून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

परीक्षा नियंत्रक.

१८. (१) (अ) परीक्षा नियंत्रकाची नियुक्ती त्या प्रयोजनासाठी रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून कुलगुरूकडून करण्यात येईल ;

(ब) परीक्षा नियंत्रक हा विद्यापीठाच्या परीक्षा व चाचणी परीक्षा घेणे व त्यांचे निकाल जाहीर करणे या गोष्टीचा मुख्य प्रभारी अधिकारी असेल. तो परीक्षा मंडळाच्या अधीक्षणाखाली, निदेशाखाली व मार्गदर्शनाखाली आपली कामे पार पाडील. तो विद्यापीठाचा पूर्णवेळ वेतनी अधिकारी असेल व थेट कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील ;

(क) त्याची नियुक्ती पाच वर्षाच्या मुदतीसाठी करण्यात येईल व तो फेरनियुक्तीस पात्र असेल. नियंत्रकाची निवड करण्याच्या प्रयोजनासाठी लागणारी अर्हता व अनुभव हा विहित करण्यात आल्याप्रमाणे असेल.

(२) परीक्षा नियंत्रक हा परीक्षा मंडळ व प्राश्निक, परीक्षक व नियामक यांच्या नियुक्तीसाठी कलम ३० (५)(अ) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समित्यांव्यतिरिक्त, मंडळाकडून नियुक्त करण्यात आलेल्या इतर समित्यांचा सदस्य-सचिव असेल. त्यांच्या निर्णयाची त्वरीत व योग्य अंमलबजावणी करण्यास तो जबाबदार असेल.

(३) पोट-कलम (१) (ब) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, विद्यापीठाच्या परीक्षा व चाचणी परीक्षा योग्यरीत्या घेतल्या जाव्यात यासाठी व त्यांचे निकाल जाहीर करण्यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्यासाठी परीक्षा नियंत्रक जबाबदार असेल. पुढील गोष्टी करण्यास तो जबाबदार असेल :—

(अ) परीक्षांचे वेळापत्रक वेळीच तयार करून ते जाहीर करणे ;

(ब) प्रश्नपत्रिका छापून घेण्याची व्यवस्था करणे ;

(क) परीक्षेला बसलेल्या उमेदवारांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन करवून घेण्याची आणि निकालासंबंधातील कार्यवाही करण्याची व्यवस्था करणे ;

(ड) परीक्षांचे व इतर चाचणी परीक्षांचे निकाल वेळेवर घोषित केले जावेत यासाठी व्यवस्था करणे ;

(ई) गैरप्रकारांच्या प्रसंगी किंवा परिस्थितीची तशी गरज असेल तर परीक्षा अंशतः किंवा पूर्णतः रद्द करणे व असे गैरप्रकार केल्याचा ज्यांच्यावर आरोप असेल अशा कोणत्याही व्यक्तीविरूद्ध किंवा व्यक्तींच्या गटाविरूद्ध किंवा महाविद्यालयाविरूद्ध किंवा परिसंस्थेविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे किंवा कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाही सुरू करणे ;

(फ) परीक्षांशी संबंधित असलेले व परीक्षांच्या बाबतीत गैरप्रकारांबद्दल अपराधी असल्याचे आढळून आलेले परीक्षेतील उमेदवार, प्राश्निक, परीक्षक, नियामक किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती यांच्याविरूद्ध शिस्तभंगाविषयक कारवाई करणाऱ्या समितीच्या शिफारशीवरून शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(ग) विद्यापीठाच्या परीक्षांच्या निकालांचे वेळोवेळी पुनर्विलोकन करणे व त्यासंबंधातील अहवाल परीक्षा मंडळाकडे पाठविणे ;

(४) परीक्षा नियंत्रक, परीक्षा मंडळाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील किंवा त्याला नेमून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

ग्रंथपाल, नियुक्ती आणि कर्तव्ये.

१९. (१) ग्रंथपाल हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल, तो थेट कुलगुरूंच्या नियंत्रणाखाली काम करील.

(२) ग्रंथपालाची नियुक्ती त्या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरूकडून करण्यात येईल. त्याच्या अर्हता, वित्तलब्धी व सेवेच्या अटी व शर्ती या विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे व राज्य शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे असतील.

(३) जेव्हा ग्रंथपालाचे पद रिक्त झाले असेल किंवा ग्रंथपाल आजारी असल्यामुळे किंवा गैरहजर असल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत, कुलगुरू या प्रयोजनार्थ नियुक्त करील अशी व्यक्ती सहा महिन्यांहून अधिक होणार नाही एवढ्या कालावधीसाठी किंवा नवीन ग्रंथपालाची रीतसर नेमणूक होईपर्यंत किंवा ग्रंथपाल कामावर परत रूजु होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अशी कर्तव्ये पार पाडील.

(४) ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रंथालयाचा किंवा ग्रंथालयांचा विकास, आधुनिकीकरण, निगा व व्यवस्थापन करण्यासाठी जबाबदार असेल. तसेच हस्तलिखितांचा संग्रह करणे व त्यांचे परिरक्षण करणे यासाठी तो जबाबदार असेल, आणि याबाबतीत तो संलग्न महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या, प्रशाला व पाठशालांच्या ग्रंथपालांना किंवा ग्रंथालयांना आपले सहाय्य आणि सल्ला देऊ करील.

(५) ग्रंथपाल, सर्व पुस्तके, नियतकालिके, हस्तलिखिते, जर्नल्स व ग्रंथालय साधनसामग्री यांचा परिरक्षक असेल आणि कोणत्याही नियमबाह्य गोष्टी घडत नसल्याची आणि कोणतीही पुस्तके, नियतकालिके, हस्तलिखिते, जर्नल्स आणि ग्रंथालय सामग्री गहाळ होत नसल्याची खात्री करून घेईल. तो सर्व संग्रहाची नियतकालिक, पडताळणी करवून घेईल. विद्यापीठ ग्रंथालयाचा किंवा ग्रंथालयांचा विकासविषयक खर्च भागविण्यासाठी जादा साधनसंपत्ती उपलब्ध करून घेण्याच्या बाबीसह सर्व बाबींवर विद्यापीठाला सल्ला देण्याचा त्याला हक्क असेल.

(६) ग्रंथपाल, ग्रंथालय समितीचा सदस्य-सचिव असेल आणि ग्रंथालय समितीने घेतलेल्या निर्णयाची उचितरित्या अंमलबजावणी होत असल्याची खात्री करून घेईल.

२०. (१) (अ) वित्त-लेखी अधिकारी हा, विद्यापीठाचा प्रमुख वित्त-लेखा व लेखापरीक्षा अधिकारी असेल तो पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल व थेट कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील. वित्त-लेखा अधिकारी.

(ब) वित्त-लेखा अधिकाऱ्यांची नियुक्ती व्यवस्थापन परिषदेकडून एकतर नामनिर्देशनाद्वारे किंवा भारत सरकार अथवा राज्य शासन यांच्याकडून एखाद्या योग्य अधिकाऱ्याच्या सेवा प्रतिनियुक्तीवर घेऊन करण्यात येईल.

(२) वित्त-लेखा अधिकारी हा वित्त-लेखा समितीचा सदस्य-सचिव असेल त्याला व्यवस्थापन परिषदेच्या पैशांशी संबंध असणाऱ्या बाबीसंबंधातील कामकाजाला उपस्थित राहण्याचा, त्यावेळी बोलण्याचा व अन्य प्रकारे त्यात भाग घेण्याचा अधिकार असेल, परंतु मतदानाचा अधिकार असणार नाही.

(३) वित्त-लेखा अधिकारी वित्त-लेखा समितीच्या बैठकींची आणि वित्त-लेखा समितीने नियुक्त केलेल्या उप-समित्यांच्या बैठकींची कार्यवृत्ते ठेवील.

(४) वित्त-लेखा अधिकारी वित्त-लेखा समितीला आणि व्यवस्थापन परिषदेला वार्षिक अर्थसंकल्प, लेख्यांचे विवरण व लेखापरीक्षा अहवाल सादर करण्यास जबाबदार असेल.

(५) वित्त-लेखा अधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) विद्यापीठाच्या निधींवर सर्वसाधारण देखरेख ठेवणे व विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीसंबंधात कुलगुरूला सल्ला देणे ;

(ब) विद्यापीठाच्या उद्दिष्टांपैकी कोणत्याही उद्दिष्टांच्या पुष्ट्यर्थ विश्वस्तव्यवस्था व दान करण्यात आलेली मालमत्ता यांसह निधी, मालमत्ता व गुंतवणुका धारण करणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(क) वर्षातील आवर्ती व अनावर्ती खर्च विद्यापीठाने त्याबाबतीत निश्चित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक होत नाही तसेच नेमून दिलेल्या रकमा ज्यासाठी पैसे मंजूर करण्यात किंवा नेमून देण्यात आले असतील त्याच प्रयोजनांसाठी खर्च करण्यात येत आहेत याबद्दल खात्री करून घेणे ;

(ड) रोख रक्कम व बँकेतील शिल्लक रकमा व गुंतवणूका यांच्या स्थितीवर लक्ष ठेवणे ;

(ई) महसुलाच्या वसुलीच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे आणि वसुली करण्यासाठी अनुसरावयाच्या पद्धतींबाबत कुलगुरूला सल्ला देणे ;

(फ) विद्यापीठाच्या लेख्यांची नियमित परीक्षा करून घेणे ;

(ग) इमारती, जमीन, साधनसामग्री व यंत्रसामग्री यांच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवल्या जात आहेत; तसेच विद्यापीठाची सर्व कार्यालये, महाविद्यालये, कार्यशाळा व भांडारे यांमधील साधनसामग्री व इतर वापरले जाणारे साहित्य यांच्या साठ्याची नियमितपणे पडताळणी केली जात आहे, याबद्दल खात्री करून घेणे ;

(ह) विद्यापीठाच्या कोणत्याही अध्यापक सदस्याकडून अनधिकृत खर्च किंवा इतर वित्तीय अनियमितता याबद्दल स्पष्टीकरण मागण्यात यावे असे कुलगुरूला सुचविणे ;

(आय) कोणत्याही अध्यापकेतर सदस्याकडून कोणत्याही विशिष्ट प्रकरणातील अनधिकृत खर्च किंवा नियमबाह्य गोष्टी याबद्दल स्पष्टीकरण मागण्यात यावे असे कुलसचिवाला सुचवणे व कसूरदार व्यक्तीविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करणे ;

(जे) आपल्या वित्तीय जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही माहिती व विवरणे कोणत्याही कार्यालयाकडून, केंद्राकडून, प्रयोगशाळेकडून, महाविद्यालयाकडून, विद्यापीठ विभागाकडून किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थेकडून मागवून घेणे ; आणि

(के) कुलगुरूकडून त्यास नेमून देण्यात आलेल्या किंवा आदेशांद्वारे विहित करण्यात आलेल्या अशा इतर अधिकारांचा वापर करणे व अशी इतर कर्तव्ये तसेच अशी इतर वित्तविषयक कामे पार पाडणे ;

(एल) अंतर्गत लेखापरीक्षा आयोजित करण्याची खातरजमा करणे.

छात्र कल्याण संचालक.

**२१.** (१) छात्र कल्याण संचालकाचे नामनिर्देशन, कुलगुरूकडून, अध्यापकांमधून करण्यात येईल. त्याच्या वित्तलब्धी, सेवेच्या अटी व शर्ती आणि अधिकार व कर्तव्ये आदेशांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. तो थेट कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील.

(२) संचालक दोन वर्षाच्या मुदतीसाठी पद धारण करील व तो फेरनियुक्ती केली जाण्यास पात्र असेल.

संचालक, विस्तार सेवा मंडळ.

**२२.** (१) विस्तार सेवा मंडळ संचालक हा, पूर्णकालिक वेतनी विद्याविषयक अधिकारी असेल व निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरू त्याची नियुक्ती करील या निवड समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(अ) कुलगुरु—अध्यक्ष ;

(ब) व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले, संस्कृतमधील विस्तार सेवेच्या क्षेत्रातील दोन तज्ज्ञ ;

(क) विस्तार सेवा मंडळाची एक नामनिर्देशित व्यक्ती.

(२) संचालकाच्या वित्तलब्धी व सेवेच्या अटी व शर्ती आदेशांद्वारे विहित करण्यात येतील.

(३) संचालक हा विस्तार सेवा मंडळाचा सदस्य-सचिव असेल व मंडळाच्या सर्वकष मार्गदर्शनाखाली व सल्ल्यानुसार, संस्कृत व संलग्न विषयांमधील विविध विस्तार कार्यक्रम याचे संयोजन व समन्वय करण्यास तो जबाबदार असेल. मंडळाच्या मान्यतेसाठी व व्यवस्थापन परिषदेकडे सादर करण्यासाठी तो विद्यापीठाच्या विस्तार सेवेच्या संबंधात वार्षिक अहवाल तयार करील.

(४) संचालक, विस्तार सेवा मंडळ हा थेट कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील.

१८६० चा ४५. **२३.** विद्यापीठाचे सर्व वेतनी अधिकारी, त्याच्या प्राधिकरणांचे, समित्यांचे किंवा संस्थांचे सदस्य ; त्याचे अध्यापक आणि अन्य कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

विद्यापीठाचे अधिकारी, त्याच्या प्राधिकरणांचे, संस्थांचे सदस्य आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे.

प्रकरण चार

## विद्यापीठाची प्राधिकरणे

**२४.** विद्यापीठाची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील :—

विद्यापीठाची प्राधिकरणे.

(१) व्यवस्थापन परिषद ;

(२) विद्वत् परिषद ;

(३) संकाय ;

(४) अध्ययन मंडळ ;

(५) परीक्षा मंडळ ;

(६) नियोजन विकास मंडळ ;

(७) विस्तार सेवा मंडळ ;

(८) परिनियमांद्वारे विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून संबोधण्यात येतील अशा विद्यापीठांच्या इतर संस्था.

[1][**२४अ.** या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कुलाधिपतीशी विचारविनिमय करून, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून नियुक्ती होण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती, **राज्य शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील.]

[1][विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा शासनाचा अधिकार.]

**२५.** (१) व्यवस्थापन परिषद विद्यापीठाचे व्यवस्थापन करणे, धोरण आखणे आणि परिनियम व आदेश तयार करणे, विद्यापीठाच्या व्यवहारांचे प्रशासन करणे यांकरिता प्रमुख कार्यकारी प्राधिकरण असेल आणि ती, अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे विनिर्देशपूर्वक नेमून दिली नसतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

व्यवस्थापन परिषद.

(२) व्यवस्थापन परिषद, पुढील सदस्यांची मिळून बनलेली असलेली असेल :—

(एक) कुलगुरू–सभापती (पदसिद्ध) ;

(दोन) सम-कुलगुरू–सदस्य (पदसिद्ध) ;

---

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १५ अन्वये कलम २४ अ समाविष्ट करण्यात आले.

(तीन) परिनियमांद्वारे विहित केलेला एक अधिष्ठाता ;

(चार) महाराष्ट्र शासनाच्या संस्कृत स्थायी समितीमधील, कुलाधिपतीने अग्रक्रमाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(पाच) महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतीने नामनिर्देशित करावयाचा महाराष्ट्र विधानसभेचा एक सदस्य ;

(सहा) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचा विधानपरिषदेचा एक सदस्य ;

(सात) सचिव, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती (पदसिद्ध) ;

(आठ) संचालक, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, सहसंचालक, उच्च शिक्षण याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती (पदसिद्ध) ;

(नऊ) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे विद्यापीठ विभागाचा प्रमुख ;

(दहा) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे महाविद्यालय, परिसंस्था किंवा पाठशालेचा एक प्रमुख ;

(अकरा) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, विद्यापीठ विभागांमधील एक अध्यापक ;

(बारा) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांमधून दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असलेला, व जो मुख्याध्यापक नाही असा एक अध्यापक ;

(तेरा) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, अध्ययन मंडळाचा एक अध्यक्ष ;

(चौदा) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला, विद्वत् परिषदेचा एक सदस्य ;

(पंधरा) संचालक, नियोजन विकास मंडळ (पदसिद्ध) ;

(३) विद्यापीठाचा कुलसचिव हा व्यवस्थापन परिषदेचा पदसिद्ध सचिव असेल, परंतु त्याला मत देण्याचा अधिकार असणार नाही.

(४) वित्त-लेखा अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक हे परिषदेचे स्थायी निमंत्रित असतील, परंतु त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

(५) व्यवस्थापन परिषदेच्या वर्षातून किमान चार बैठकी होतील व बैठकीच्या कामकाज चालनाबाबत अनुसरावयाच्या कार्यपद्धतीबाबतचे तसेच बैठकीच्या गणपूर्तीबाबतचे नियम व बैठकीच्या संबंधात आवश्यक असतील अशा इतर बाबी या विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असतील.

व्यवस्थापन परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

२६. व्यवस्थापन परिषद पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील :–

(१) ज्यायोगे महाविद्यालयांना, परिसंस्थांना, प्रशाला व पाठशालांना विशेषीकृत अभ्यास कार्यक्रम हाती घेणे शक्य होईल अशा तरतुदी करणे आणि आवश्यक आणि इष्ट असेल त्या बाबतीत अध्यापनासाठी व संशोधनासाठी सामायिक प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये आणि साधनसामग्री यांचे आयोजन करणे व त्यासाठी तरतूद करणे ;

(२) विद्वत् परिषदेच्या शिफारशीवरून विभाग, महाविद्यालये, प्रशाला, उच्च शिक्षण, संशोधन व विशेषीकृत अभ्यास परिसंस्था स्थापन करणे ;

(३) परिनियम व आदेश करणे, त्यात सुधारणा करणे किंवा ते निरसित करणे ;

(४) विद्यापीठाची मत्ता व मालमत्ता धारण करणे, तिचे नियंत्रण करणे व तिच्या प्रशासनाची व्यवस्था करणे ;

(५) वित्त-लेखा समितीने तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजावर आपल्या स्वतःच्या फेरफारांसह कोणत्याही असल्यास, विचार करणे व ते मान्य करणे ;

(६) विद्यापीठाच्या वतीने करार करणे, त्यात फेरबदल करणे, ते पार पाडणे व रद्द करणे ;

(७) विद्यापीठाच्या सामाईक शिक्क्याचा नमुना ठरविणे व त्याची अभिरक्षा आणि उपयोग यासंबंधी तरतूद करणे ;

(८) विद्यापीठाच्या वतीने, विश्वस्त निधी, मृत्यूपत्रित देणग्या आणि विद्यापीठाकडे करण्यात आलेले कोणत्याही जंगम किंवा स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण स्वीकारणे ;

(९) विद्यापीठाच्या वतीने कोणतीही जंगम मालमत्ता, विक्रीद्वारे किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करणे ;

(१०) वित्त-लेखा समितीच्या शिफारशीनुसार विद्यापीठाच्या वतीने कर्ज घेणे, कर्ज देणे किंवा निधी गुंतविणे ;

(११) विशिष्ट प्रयोजनांसाठी विद्यापीठाकडे असलेल्या निधीचा वापर करण्याबाबत धोरण ठरविणे ;

(१२) विद्यापीठाचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती, जागा, फर्निचर, उपकरणे व इतर साधने यांची तरतूद करणे ;

(१३) सन्मान्य पदव्या व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे आणि विद्वत् परिषदेकडून शिफारस करण्यात आल्या असतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, सन्मान्य पदव्या व इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करणे आणि प्रदान करणे व आदेशान्वये विहित केल्याप्रमाणे पदवी व पदविका इत्यादींच्या प्रदानासाठी दिक्षांत समारंभाची व्यवस्था करणे ;

(१४) अधिछात्रवृत्या, प्रवासी अधिछात्रवृत्या, शिष्यवृत्या, छात्रवृत्या, प्रदर्शने, पारितोषिके, पदके व बक्षिसे सुरू करणे आणि त्यासाठी, याबाबतीत केलेल्या विनियमांनुसार नियम विहित करणे ;

(१५) नियोजन विकास मंडळाने शिफारस केल्यावरून परस्पर लाभप्रद विद्याविषयक कार्यक्रमांसाठी इतर विद्यापीठे, परिसंस्था आणि संघटना यांच्याशी सहयोग करण्याकरता विनियम करणे ;

(१६) आवश्यक असेल तेव्हा व त्यानुसार विद्वत् परिषदेच्या शिफारशींवरून विद्यापीठ अध्यापकांची व दीर्घ सुटी नसलेल्या विद्याविषयक कर्मचारीवर्गाची पदे निर्माण करणे ;

(१७) राज्य शासनाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या अर्हता व सेवेच्या अटी व शर्ती आणि इतर मार्गदर्शक तत्त्वे यानुसार विद्यापीठ अध्यापक व दीर्घ सुटी नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती परिनियमांद्वारे विहित करणे व त्यांच्या वित्तलब्धी, कार्यभार आणि वर्तणूक व शिस्त यांची प्रमाणके निश्चित करणे ;

(१८) विद्यापीठाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची पदे निर्माण करणे ;

(१९) विद्यापीठाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती, अर्हता, सेवाप्रवेशांची पद्धती, वेतनमान, वर्तणूक, शिस्त व त्यांची कर्तव्ये यांसह त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती परिनियमांद्वारे विहित करणे ;

(२०) विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व परिसंस्था व महाविद्यालये, प्रशाला व पाठशाला यांमध्ये अध्यापक, अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती, त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांच्या नियुक्तीचे नियम व कार्यपद्धती परिनियमांद्वारे विहित करणे ;

(२१) फी व इतर आकार विहित करणे ;

(२२) प्राश्निक, परीक्षक व परीक्षाविषयक इतर कर्मचारी, विद्याशाखेचे अभ्यागत, यांच्यासाठी आणि विद्यापीठाला देण्यात आलेल्या अशा प्रकारच्या इतर सेवांसाठी मानधन, पारिश्रमिक व फी व प्रवास आणि इतर भत्ते विहित करणे ;

(२३) आदेशांद्वारे तरतूद केल्याप्रमाणे कुलगुरूकडून विद्यापीठाच्या कामकाजाचे नियतकालिक अहवाल स्वीकारणे व त्यावर विचार करणे ;

(२४) चालू विद्यावर्षाच्या समाप्तीपूर्वी पुढील विद्यावर्षासाठी परिनियम आणि विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे यांनुसार विद्यापीठाच्या विद्याविषयक नियामिकेवर विचार करणे व ती मान्य करणे ;

(२५) नियोजन विकास मंडळाने तयार केलेल्या, विद्यापीठाच्या विद्याविषयक विकासाच्या भविष्यलक्षी योजनेचा विचार करणे ;

(२६) विद्वत् परिषदेकडून आलेल्या विद्याविषयक कार्यक्रमांच्या प्रस्तावाची व्यवहार्यता निर्धारित करणे व त्यांना मान्यता देणे ;

(२७) वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांच्यावर विचार करणे व ते स्वीकारणे ;

(२८) महाविद्यालये, परिसंस्था, प्रशाला व पाठशाला किंवा विद्यापीठाचे विभाग योग्य रीत्या चालविणे, त्यांचे कामकाज व त्यांची आर्थिक स्थिती यासंबंधातील कोणत्याही बाबींची चौकशी करण्याची व्यवस्था करणे ;

(२९) आदेश करण्याचा किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचा अथवा त्यांचे निरसन करण्याचा अधिकार वगळता आपल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार कुलगुरूकडे किंवा त्यास योग्य वाटेल अशा विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडे किंवा प्राधिकरणाकडे किंवा त्याने नियुक्त केलेल्या समितीकडे सोपविणे ;

(३०) वित्त लेखा समितीने तयार केलेल्या अर्थसंकल्पाला मान्यता देणे ;

विद्वत् परिषद. **२७.** (१) अध्यापन, संशोधन, विद्याविषयक बाबीसंबंधातील सहयोगी कार्यक्रम यासंबंधातील दर्जा राखणे व सुधारणे व अध्यापकांच्या कार्यभाराचे मूल्यमापन या बाबीसंबंधातील विद्याविषयक धोरणे घालून देण्यास विद्वत् परिषद जबाबदार असेल.

(२) विद्वत् परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :–

(अ) कुलगुरू–अध्यक्ष ;

(ब) सम कुलगुरू ;

(क) संकायांचे अधिष्ठाते ;

(ड) अध्ययन मंडळांचे अध्यक्ष ;

(ई) विस्तार सेवा मंडळाचा संचालक ;

(फ) संचालित, किंवा संलग्न महाविद्यालयांचे, संस्थांचे किंवा पाठशालाचे, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्यानुसार आळीपाळीने नामनिर्देशित करावयाचे प्रत्येकी एक प्राचार्य ;

(ग) विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था यामधील प्राध्यापकांमधून कुलगुरूने नामनिर्देशित केलेला एक प्राध्यापक ;

(ह) प्रत्येक विद्याशाखेमधून एक या प्रमाणात प्रतिनिधीत्व होईल अशाप्रकारे विद्वत् परिषदेने महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठ विभागांचे प्रमुख व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्रमुख नसलेल्या व किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असलेल्या अध्यापकांमधून परिनियमाद्वारे विहित केल्याप्रमाणे स्वीकृत केलेला अध्यापक ;

(आय) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला, विद्यापीठाच्या विद्याविषयक सेवा युनिटाचा एक प्रमुख ;

(जे) कुलाधिपतीने नामनिर्देशित केलेले, राज्यातील संस्कृत परिसंस्थांचे दोन विद्याव्यासंगी ;

(के) कुलगुरूने, नामनिर्देशित केलेले दोन मान्यवर संस्कृत विद्याव्यासंगी ;

(ल) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य किंवा सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला त्यांचा नामनिर्देशिती किंवा त्याचा नामनिर्देशिती ;

(म) महाराष्ट्र शासनाचा मानसेवी संस्कृत संघटक, असल्यास.

(३) कुलसचिव हा विद्वत् परिषदेचा सचिव म्हणून काम करील, परंतु त्याला मतदानाचा अधिकार असणार नाही.

(४) वर्षातून किमान दोनदा विद्वत् परिषदेच्या बैठकी होतील.

विद्वत् परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

२८. (१) विद्वत् परिषद हे विद्यापीठाचे विद्याविषयक प्रमुख प्राधिकरण असेल आणि ती विद्यापीठातील अध्यापन, संशोधन व परीक्षा यांचे नियमन करण्यास व त्यांचा दर्जा कायम राखण्यास जबाबदार असेल.

(२) पूर्ववर्ती तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, विद्वत् परिषद पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील,–

(अ) पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करण्यासंबंधी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(ब) विद्याविषयक बाबींशी संबंधित प्रश्नांवर आदेश काढणे, त्यांत सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे यासंबंधात व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(क) या अधिनियमाच्या कलम ४८ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बाबींसंबंधात विनियमन करणे, त्यांत सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे ;

(ड) विद्याशाखांना विषय वाटून देणे ;

(ई) विद्यापीठामध्ये संचालित महाविद्यालये, प्रशाला, विभाग, उच्च शिक्षण, संशोधन विशेषीकृत अभ्यास परिसंस्था, विद्याविषयक सेवा युनिटे, ग्रंथालये, प्रयोगशाळा व संग्रहालये स्थापन करण्यासंबंधात प्रस्ताव तयार करणे ;

(फ) विद्यापीठास आवश्यक असलेल्या प्राध्यापकांची, सहयोगी प्राध्यापकांची, प्रपाठकांची, अधिव्याख्यात्यांची आणि दीर्घ सुटी नसलेल्या विद्याविषयक कर्मचारीवर्गाची पदे निर्माण करण्यासंबंधातील नवीन प्रस्तावांचा विचार करणे व त्याबद्दल शिफारस करणे ;

(ग) निरनिराळ्या संवर्गामधील अध्यापकांसाठी व दीर्घ सुटी नसलेल्या विद्याविषयक कर्मचारीवर्गासाठी तसेच या संवर्गातील एखाद्या विशिष्ट पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या अर्हतासंबंधात राज्य शासनास शिफारस करणे किंवा न करणे–मग ती पदे विद्यापीठातील असोत, किंवा एखाद्या संलग्न महाविद्यालयातील असोत किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील असोत–व कोणत्याही जादा अर्हता आवश्यक असल्यास त्या विहित करणे ;

(ह) अधिछात्रवृत्या, प्रवास अधिछात्रवृत्या, शिष्यवृत्या, छात्रवृत्या, पत्रके व पारितोषिके सुरू करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेकडे प्रस्ताव करणे व ती देण्यासंबंधात विनियम करणे ;

(आय) प्राश्निक, परीक्षक, नियामक व परीक्षा घेण्याच्या कामाशी संबंधित असलेल्या इतर व्यक्ती यांच्या नियुक्तीसाठी अर्हता व प्रमाणके विहित करणे ;

(जे) विद्यमान अभ्यासक्रमांची उपयुक्तता व व्यवहार्यता तसेच नवीन ज्ञान किंवा बदलत्या सामाजिक गरजा यानुसार त्यांचे पुनर्विलोकन करण्याची किंवा त्यात फेरफार करण्याची इष्टता किंवा आवश्यकता ठराविक, कालांतराने तपासून पाहण्यासाठी समित्या नियुक्त करणे ;

(के) आंतर-विद्याशाखा व क्षेत्रीय किंवा प्रादेशिक अभ्यासक्रम चालविण्यासाठी छंद केंद्रे, संग्रहालये इत्यादीसारख्या सामाजिक सुविधा पुरविण्यासाठी प्रस्ताव करणे ;

(ल) संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या कर्मचारीवर्गामधील कोणत्याही कर्मचाऱ्यास विद्यापीठाचा अध्यापक म्हणून मान्यता देण्यासाठी प्रमाणके विहित करणे ;

(म) महाविद्यालयांच्या संलग्नीकरणास मान्यता देणे, संलग्नीकरण चालू ठेवणे, संलग्नी करण्याची मुदत वाढवणे व संस्कृत शिक्षण व संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास परिसंस्थांना मान्यता देणे, मान्यता चालू ठेवणे, मान्यतेची मुदत वाढवणे यासाठी प्रमाणके विहित करणे ;

(न) परिनियम, आदेश व विनियम यांच्या तरतुदींनुसार महाविद्यालयांना किंवा परिसंस्थांना संलग्न करण्यास मान्यता देणे ;

(ओ) विहित केल्याप्रमाणे संस्कृत शिक्षण, संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास परिसंस्थांना मान्यता देणे ;

(पी) फी व इतर शुल्के विहित करण्याबद्दल व्यवस्थापन परिषदेकडे प्रस्ताव पाठवणे ;

(क्यू) सर्वसाधारणपणे सर्व विद्याविषयक बाबीसंबंधात विद्यापीठाला सल्ला देणे व व्यवस्थापन परिषदेला विद्याविषयक कार्यक्रमांबाबत व्यवहार्यता अहवाल सादर करणे ;

(र) हा अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम याद्वारे किंवा तदन्वये तिला प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे व सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे ;

परीक्षा मंडळ. **२९.** (१) परीक्षा मंडळ हे परीक्षा घेणे व परीक्षांचे आयोजन करणे व त्या घेणे या संबंधात धोरणात्मक निर्णय घेणे, परीक्षा पद्धतीत सुधारणा करणे, प्राश्निक, परीक्षक नियामक यांची नियुक्ती करणे व तसेच परीक्षांच्या सारख्यांचे वेळापत्रक तयार करणे आणि निकाल घोषित करणे यांसाठी असणारे प्राधिकरण असेल परिसंस्था, महाविद्यालये, पाठशाला व विद्यापीठ विभागांमध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षांवर देखील परीक्षा मंडळ देखरेख करील व त्यांचे नियमन करील.

(२) परीक्षा मंडळ परीक्षांच्या संबंधातील सर्व बाबीसंबंधात कार्यवाही करील व परीक्षा घेण्याबाबत उद्भवलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात त्यांच्याकडे आलेल्या तक्रारींची सुनावणी करील व त्यावर निर्णय देईल.

(३) परीक्षा मंडळात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(अ) कुलगुरू, अध्यक्ष ;

(ब) कोणताही सम कुलगुरू असल्यास, तो सम कुलगुरू ;

(क) संकायाचा अधिष्ठाता ;

(ड) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला, प्रपाठकांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला विद्यापीठ विभागाचा एक प्रमुख ;

(ई) विद्वत् परिषदेने नामनिर्देशित केलेला, अधिष्ठात्या व्यतिरिक्त, एक प्राचार्य ;

(फ) विद्वत् परिषदेने नामनिर्देशित केलेला विभाग प्रमुख किंवा प्राचार्य यांच्या व्यतिरिक्त अन्य एक अध्यापक ;

(ग) संचालक, उच्च शिक्षण किंवा त्यांने नामनिर्देशित केलेली सहसंचालकापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती ;

(ह) परीक्षा नियंत्रक ; सदस्य सचिव.

३०. (१) परीक्षा मंडळ, विद्यापीठाच्या परीक्षा आणि चाचण्या यांची तसेच नियमन, कोष्टकीकरण यांची आणि निकाल घोषित करण्याची कार्यवाही योग्यरीतीने करण्यात येत असल्याची खात्री करुन घेईल. परीक्षा मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

(२) प्रत्येक विद्यावर्षात किमान एकदा मंडळाची बैठक घेण्यात येईल.

(३) विशेषतः व पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कर्तव्याच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, मंडळ पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(अ) संबंधित अध्ययन मंडळांनी तयार केलेल्या नामिकेत समाविष्ट असलेल्या व्यक्तींमधून प्राश्निक, परीक्षक व नियामक यांची नेमणूक करणे व आवश्यक असेल त्या बाबतीत समितीने पोट-कलम (६) च्या खंड (ब) अन्वये केलेल्या शिफारशी लक्षात घेऊन त्यांना काढून टाकणे किंवा त्यांना प्रतिरोध करणे ;

(ब) परीक्षाविषयक सुधारणा हाती घेणे, त्या अंमलात आणणे व त्यासंदर्भात प्रयोग करणे ;

(क) अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा परीक्षांशी संबंधित इतर अधिकारांचा वापर करणे.

(४) तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असेल अशी कोणतीही निकडीची परिस्थिती उद्भवल्यास मंडळाचा अध्यक्ष किंवा त्या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अन्य अधिकारी किंवा व्यक्ती, तिला योग्य व आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करील आणि तिने केलेल्या कार्यवाहीसंबंधात मंडळाच्या पुढील बैठकीत अहवाल देईल.

(५) (अ) प्राश्निक, परीक्षक व नियामक यांची नेमणूक करण्याकरिता परीक्षा मंडळ प्रत्येक विषयाकरिता समिती स्थापन करील, त्या समितीत पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(एक) सम कुलगुरू ; कोणताही असल्यास अध्यक्ष ;

(दोन) संबंधित संकायाचा अधिष्ठाता ;

(तीन) संबंधित अध्ययन मंडळाचा अध्यक्ष ;

(चार) अध्ययन मंडळाने त्याच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य.

(ब) परीक्षा नियंत्रक हा अशा समित्यांचे सचिव म्हणून काम करील ;

(क) समिती, अध्ययन मंडळाकडून तयार करण्यात यावयाच्या नामिकेत समाविष्ट करण्यात येणाऱ्या व्यक्तींमधून विविध परीक्षा व चाचण्या यांच्याकरिता व्यक्तींच्या नावांच्या शाखा तयार करील व त्या परीक्षा मंडळास सादर करील व ते मंडळ नंतर प्राश्निक, परीक्षक व नियामक व आवश्यक तेथे निर्देशी यांची नेमणूक करील ;

(ड) समिती संबंधित विषयाच्या प्रश्नपत्रिकांचे तीन संच मोहोरबंद पाकिटातून स्वीकारील. समितीचा अध्यक्ष, प्रश्नपत्रिका असणाऱ्या अशा मोहोरबंद पाकिटांमधून कोणतेही एक पाकीट घेईल. नंतर ते मोहोर शाबूत असलेले मोहोरबंद पाकीट मुद्रणालयाकडे पाठविले जाईल.

(६) (अ) उमेदवारांनी, प्राश्निकांनी, परीक्षकांनी, नियामकांनी, निर्देशींनी, अध्यापकांनी किंवा परीक्षा घेण्याशी संबंधित असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेले गैरव्यवहार व चुका यांच्या संबंधात तपास करण्यासाठी व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठी, परीक्षा मंडळ जास्तीत जास्त पाच व्यक्तींचा समावेश असलेली एक समिती स्थापन करील. त्या व्यक्तींपैकी एक अध्यक्ष असेल.

(ब) अशी समिती तिचा अहवाल व शिफारशी परीक्षा मंडळास सादर करील व मंडळ त्याबाबत त्यास योग्य वाटेल अशी शिस्तभंगाची कार्यवाही करील.

(७) परीक्षा मंडळ, विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्याकरिता वित्तीय अंदाज तयार करील व ते वित्त-लेख अधिकाऱ्यांकडे सादर करील.

(८) विद्यार्थी, अध्यापक, समवेक्षक, पर्यवेक्षक इत्यादींकडून कोणत्याही गैरप्रकाराचा अवलंब केला जाणे टाळण्यासाठी परीक्षा चालू असताना मंडळ काटेकोर दक्षता बाळगील.

संकाय. **३१.** (१) संकाय म्हणजे, विद्याशाखेत समाविष्ट असलेल्या विषयांच्या अभ्यासाच्या आणि संशोधनाच्या संबंधातील तसेच बहुविध विद्याशाखांच्या अभ्यास व संशोधनाच्या संबंधातील विद्यापीठाची विद्याविषयक समन्वय साधणारी प्रमुख प्राधिकरणे असतील.

(२) विद्यापीठामध्ये परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा विद्याशाखा असतील.

(३) केवळ विद्वत् परिषदेच्या संमतीने व परिनियमांद्वारे विहित करण्यात आले असेल त्याप्रमाणे विद्याशाखा स्थापन करण्यात येईल ; विभाजित करण्यात येईल ; एकत्र करण्यात येईल किंवा रद्द करण्यात येईल.

(४) विद्याशाखेत परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा विषयांचा अंतर्भाव असेल.

(५) विद्याशाखेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(अ) विद्याशाखेचा अधिष्ठाता—पदसिद्ध सभापती, दहा वर्षांपेक्षा कमी अध्यापनाचा अनुभव नसेल अशा प्राध्यापक व प्रपाठकांमधून कुलगुरूकडून नामनिर्देशित करण्यात येईल ;

(ब) विद्याशाखेत अंतर्भूत असलेल्या विषयांसाठी प्रत्येक अध्ययन मंडळाचा अध्यक्ष ;

(क) अधिष्ठात्याने नामनिर्देशित करावयाचे, प्रत्येक अध्ययन मंडळाचे तीन सदस्य.

संकायाचे अधिकार व कर्तव्ये. **३२.** संकायाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) व्यवस्थापन परिषद, विद्वत् परिषद किंवा नियोजन विकास मंडळ यांच्याकडून संकायाकडे विचारार्थ पाठवण्यात आलेल्या कोणत्याही बाबींवर विचार करणे व त्याबाबत अहवाल देणे ;

(ब) विद्याशाखेतील अध्ययन मंडळांनी केलेल्या शिफारशी आणि एकाहून अधिक अध्ययन मंडळांशी संबंधित असलेल्या बाबी यावर, त्यांच्यामुळे कोणत्याही अन्य विद्याशाखेवर विपरीत परिणाम होत नसेल तर, विचार करणे आणि त्यांना मान्यता देणे ; आणि त्याला योग्य वाटेल अशी कार्यवाही करण्याची शिफारस विद्वत् परिषदेकडे करणे ;

(क) ज्यामुळे कोणत्याही अन्य विद्याशाखेवर किंवा विद्याशाखांवर विपरित परिणाम होत असेल किंवा ज्यामध्ये प्रशासनिक किंवा वित्तीय भार अंतर्भूत असतील अशा त्याच्या कक्षेतील विद्याविषयक बाबींवर विचार करणे आणि त्याबाबत विद्वत् परिषदेकडे शिफारस करणे ;

(ड) अभ्यास मंडळांनी त्याच्याकडे विचारार्थ पाठविलेले नवीन पाठ्यक्रम, आंतरज्ञानशाखीय पाठ्यक्रम आणि अल्पमुदती प्रशिक्षण कार्यक्रम यावर विचार करणे आणि ते सुरू करण्याबाबत विद्वत् परिषदेकडे शिफारस करणे ;

(ई) विद्यापीठ परिसंस्था किंवा विभाग, संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रशाला व पाठशाला यामध्ये पदव्युत्तर किंवा पदवीपूर्व शिक्षण, अध्यापन, संशोधन आणि प्रशिक्षण चालू करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबीसंबंधी विद्वत् परिषदेकडे शिफारस करणे ;

(फ) विद्वत् परिषदेने पुढील गोष्टींसाठी घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे व केलेले नियम यांचे पालन केले जात आहे यांची खात्री करून घेणे :—

(एक) दीर्घ मुदती अभ्यासक्रमाचा विकास ;

(दोन) विद्याशाखेचा विकास ;

(तीन) अध्यापन किंवा शिक्षणसामग्रीचा विकास ;

(चार) विशेषकरून महाविद्यालयाच्या संदर्भात शैक्षणिक बाबींमध्ये संशोधन करणे ;

(ग) अध्ययन मंडळे, अन्य विद्याशाखा व नियोजन विकास मंडळ यांच्याशी विचारविनिमय करून आंतरविभागीय आणि आंतरविद्याशाखा कार्यक्रमांचे नियोजन व आयोजन करणे ;

(ह) विशेषतः सुधारित किंवा नव्याने सुरू केलेल्या किंवा आंतरज्ञानशास्त्रीय पाठ्यक्रमांसाठी संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठ विभाग यांच्या अध्यापकांकरिता उजळणी व दिशानिदेशन पाठ्यक्रम आयोजित करण्यासंबंधात, अध्यापक कर्मचारी महाविद्यालयाला आणि विद्वत् परिषदेला शिफारस करणे ;

(आय) विद्याशाखेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तयार करणे आणि तो कुलगुरूकडे सादर करणे ;

(जे) त्यांच्याकडे विचारार्थ पाठवलेली अन्य कोणतीही विद्याविषयक बाब विचारात घेणे.

**३३.** (१) विहित करण्यात आल्याप्रमाणे प्रत्येक विषय किंवा विषयांचा गट यासाठी अध्ययन मंडळ असेल. अध्ययन मंडळ.

(२) अध्ययन मंडळामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(अ) संबद्ध विषयामधील विद्यापीठ विभागाचा किंवा परिसंस्थेचा प्रमुख :

परंतु, संबंधित विषयातील विद्यापीठ विभाग नसेल त्याबाबतीत मंडळ पहिल्या बैठकीत संलग्न महाविद्यालयातील त्या विषयातील पदव्युत्तर अध्यापनाचा अनुभव असणाऱ्या विभाग प्रमुखास स्वीकृत करील.

(ब) विहित करण्यात आल्याप्रमाणे संलग्न आणि संचालित महाविद्यालयातील तीन विभाग प्रमुख.

(३) मंडळ आपल्या पहिल्या बैठकीत,—

(अ) विद्यापीठाच्या विभागाच्या अध्यापकांमधून, विभाग प्रमुख नसेल असा, अध्यापनाचा दहा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असणारा एक अध्यापक ;

(ब) संलग्न किंवा संचालित महाविद्यालयांमध्ये असलेल्या आणि अध्यापनाचा अनुभव असलेल्या अध्यापकांमधून त्या विषयातील अध्यापनाचा दहा वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव असणारा एक अध्यापक ;

(क) संलग्न पाठशालांच्या अध्यापकांमधून दहा वर्षांहून कमी नसेल इतकी अध्यापनाचा अनुभव असलेला एक अध्यापक ;

यांची नियुक्ती करील.

(४) कुलगुरू त्याच्या सदस्यांमधून नामनिर्देशनाद्वारे मंडळाच्या अध्यक्षाची (Chairman) नियुक्ती करील.

अध्ययन मंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये.

३४. अध्ययन मंडळाला पुढील अधिकार असतील व त्याची पुढील कर्तव्ये असतील :—

(अ) व्यवस्थापन परिषद किंवा विद्वत् परिषद किंवा संबंधित संकाय यांच्याकडून किंवा अन्य प्रकारे त्याच्याकडे विचारार्थ पाठवण्यात आल्यावर, त्याच्या कक्षेतील विषय किंवा विषयांचे गट यातील अभ्यासक्रमांची शिफारस करणे ;

(ब) अशा अभ्यासक्रमांसाठी पुस्तके तसेच पाठ्यपुस्तके, पूरक पाठ, संदर्भ पुस्तके व इतर सामग्री यांची शिफारस करणे ;

(क) विद्वत् परिषदेने त्यासंबंधात केलेल्या विनियमांनुसार, मंडळाच्या कक्षेतील अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रमामध्ये, लेखक व इतर श्रेष्ठ ग्रंथकार यांच्या लेखनातील किंवा साहित्यातील वेचे किंवा साहित्यसंग्रह व तसेच, विद्यापीठाच्या अध्यापकांकडून अभ्यासक्रमाच्या विकासाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले साहित्य यांचा समावेश करण्यासाठी ते तयार व प्रसिद्ध करण्यास विद्यापरिषदेने मान्यता देण्याची विद्वत् परिषदेला शिफारस करणे ;

(ड) अभ्यासक्रमांमधील सुधारणांबाबत संबंधित विद्याशाखेस किंवा विद्याशाखांना सल्ला देणे ;

(ई) परीक्षा मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या विषयाच्या विद्यापीठ परीक्षांमध्ये प्राश्निक, परीक्षक आणि नियामक यांच्या नेमणुका करण्यासाठी नामिकेमध्ये अंतर्भाव करण्याकरिता योग्य व्यक्तींच्या नावांची शिफारस करणे ;

(फ) पदव्युत्तर पदवी, डॉक्टरेट व उच्च पदव्या देण्याकरिता, प्रबंधांचे आणि निबंधांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि मौखिक परीक्षा घेण्यासाठी, जेथे जेथे विहित करण्यात आले असेल तेथे तेथे निर्देशींची नेमणूक करण्याकरिता परीक्षा मंडळाला योग्य व्यक्तींच्या नावांची शिफारस करणे ;

(ग) विषयातील दिशानिदेशन व उजळणी पाठ्यक्रम आयोजित करण्याची सूचना करणे ;

(ह) विद्यापीठाने महाविद्यालयांना संलग्नीकरणास किंवा संलग्नीकरणाच्या मुदतीत वाढ करण्यास किंवा संलग्नीकरण पुढे चालू ठेवण्यास मान्यता देणे आणि परिसंस्थांना मान्यता देणे किंवा मान्यतेच्या मुदतीत वाढ करणे किंवा मान्यता पुढे चालू ठेवणे यासाठी प्रमाणके आणि आवश्यक गोष्टी निश्चित करण्यासाठी, अध्यापक व त्यांच्या अर्हता, ग्रंथालय, प्रयोगशाळा उपकरणे व सामग्री यांच्या संबंधात विविध पातळीवर विषयाच्या अध्यापनाच्या बाबतीतील आवश्यक गोष्टी निश्चित करणे.

विस्तार सेवा मंडळ.

३५. (१) विद्यापीठाच्या विविध विद्याविषयक व विस्तार कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विस्तार सेवा मंडळ असेल. या मंडळामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल,—

(अ) कुलगुरू—अध्यक्ष ;

(ब) कुलगुरूने नामनिर्देशित केलेल्या आणि विद्यापीठ क्षेत्रातील रहिवासी असलेल्या व विस्तार सेवेत काम करणाऱ्या तीन व्यक्ती ;

(क) उच्च शिक्षण संचालक, किंवा उप संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला त्याचा नामनिर्देशित ;

(ड) कुलगुरूने केंद्र सरकारशी विचारविनिमय करून नामनिर्देशित करावयाचा, विद्यापीठ क्षेत्रातील आकाशवाणीच्या केंद्र संचालकांपैकी एक केंद्र संचालक ;

(ई) संचालक, विस्तार सेवा मंडळ-सदस्य सचिव.

(२) मंडळाची बैठक वर्षातून किमान दोन वेळा होईल.

(३) मंडळ त्याच्या कामाचा एक वार्षिक कार्यक्रम तयार करील व ठराविक कालांतराने त्याचा आढावा घेईल.

३६. विद्यापीठाच्या प्राधिकरणांची रचना व या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींन्वये चालून देण्यात आले नसतील असे त्याचे अधिकार व कामे किंवा कर्तव्ये ही परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे असतील. प्राधिकरणांचे अधिकार, कामे व कर्तव्ये.

३७. या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही प्राधिकरणाच्या नामनिर्देशित केलेल्या, नियुक्त केलेल्या किंवा स्वीकृत केलेल्या सदस्यांचा पदावधी अशा प्राधिकरणाच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून पाच वर्षाचा असेल–मग त्या सदस्याने कोणत्याही दिनांकाला आपले पद धारण केलेले असो. प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी.

३८. या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या परिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बाबतीत विद्यापीठाचा अधिकारी म्हणून किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांचा किंवा मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्त केलेली, नामनिर्देशित केली गेलेली किंवा स्वीकृत केलेली व्यक्ती अशा पदाच्या प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या संबंधातील या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांच्या किंवा सदस्यांच्या कोणत्याही प्रवर्गातील असा अधिकारी किंवा सदस्य म्हणून अशा प्रकारे नियुक्त केली जाण्यास, नामनिर्देशित केली जाण्यास किंवा स्वीकृत केली जाण्यास पात्र असल्यामुळे ती अशा प्रवर्गाची असण्याचे बंद झाल्याबरोबर लगेचच विद्यापीठाचा असा अधिकारी किंवा अशा प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल आणि असा अधिकारी किंवा सदस्य म्हणून तिने आपले पद रिकामे केले असल्याचे समजण्यात येईल. सदस्यत्वाची समाप्ती.

३९. एखादी व्यक्ती, पुढील कारणांवरून विद्यापीठाच्या प्राधिकरणांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य होण्यास निरर्ह ठरेल :— प्राधिकरणाचा सदस्य होण्या-संबंधातील निरर्हता.

(अ) ती व्यक्ती, विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल ;

(ब) अमुक्त नादार असेल ;

(क) ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असेल अशा एखाद्या अपराधाबद्दल जी सिद्धपराध ठरली असेल ;

(ड) खाजगी शिकवण्या घेत असेल किंवा खाजगी शिकवण्याचे खास वर्ग चालवत असेल ;

(ई) कोणत्याही परीक्षा घेताना कोणत्याही प्रकारे व कोठेही अनुचित व्यवहार केल्याबद्दल किंवा त्याला चालना दिल्याबद्दल जिला शिक्षा झालेली असेल.

४०. या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून इतर बाबतीत, विद्यापीठाच्या प्रत्येक प्राधिकरणाला, ते कार्यरत असताना आणि या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये त्याला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत असतांना आणि नेमून दिलेली कामे किंवा कर्तव्ये पार पाडीत असताना, त्यास नेमून दिलेल्या बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची आणि निर्णय घेण्याची अनन्य अधिकारिता असेल. प्राधिकरणाच्या निर्णयाची निर्णायकता.

४१. (१) पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्य आपल्या स्वतःच्या सहीने राजीनामा देऊ शकेल. कुलाधिपतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती कुलाधिपतीच्या नावे पत्र लिहून राजीनामा देऊ शकेल आणि अन्य कोणताही सदस्य कुलगुरूच्या नावे पत्र लिहून राजीनामा देऊ शकेल. यथास्थिती, कुलाधिपतीने किंवा कुलगुरूने राजीनामा स्वीकारल्यानंतर ही व्यक्ती सदस्य असण्याचे बंद होईल. सदस्यत्वाचा राजीनामा.

(२) एखाद्या प्राधिकरणावर किंवा मंडळावर नामनिर्देशित, नियुक्त किंवा स्वीकृत करण्यात आलेली व्यक्ती त्या प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहील तर तिने आपले सदस्यत्व सोडले असल्याचे मानण्यात येईल आणि ती ज्या अशा तिसऱ्या बैठकीला अनुपस्थित राहिली असेल त्या बैठकीच्या दिनांकापासून ती सदस्य असण्याचे बंद होईल.

प्राधिकरणांची बैठक. ४२. (१) या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, प्राधिकरणांच्या मंडळाच्या किंवा विद्यापीठांकडून किंवा कोणत्याही प्राधिकरणांकडून रचना करण्यात आलेल्या समित्यांच्या, कोणत्याही असल्यास, बैठकीच्या कामकाजाच्या संबंधातील सर्व बाबी विहित करण्यात आल्याप्रमाणे असतील.

(२) प्राधिकरणाची किंवा मंडळाची बैठक त्याच्या अध्यक्षाने ठरविलेल्या दिनांकास, त्याच्या सदस्य-सचिवाने दिलेल्या नोटिशीद्वारे बोलाविण्यात येईल.

(३) अन्यथा तरतूद केलेले असेल त्याखेरीज अन्य बाबतीत, बैठकीची गणपूर्ती सर्वसाधारणपणे विद्यमान सदस्यांच्या एक-तृतीयांश इतक्या संख्येने होईल. बैठकीची गणपूर्ती होत नसेल तर अध्यक्ष त्याच दिवशी किंवा नंतरच्या तारखेस विशिष्ट वेळेपर्यंत बैठक स्थगित करील आणि अशा तहकुबीनंतर घेण्यात येणाऱ्या बैठकीसाठी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

(४) ज्याबाबतीत या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विद्यापीठाच्या प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षाने पद स्वीकारण्याची तरतूद नसेल किंवा ज्याबाबतीत अशा प्रकारे तरतूद करण्यात आलेला सभापती किंवा अध्यक्ष अनुपस्थित असेल व कोणत्याही अन्य व्यक्तीने अध्यक्षपद स्वीकारण्याची तरतूद करण्यात आलेली नसेल त्याबाबतीत, उपस्थित असलेले सदस्य त्यांच्यातून एका व्यक्तीची बैठकीचे अध्यक्षपद भूषविण्यासाठी निवड करतील.

(५) अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, कार्यसूचीवरील सर्व बाबी, प्रश्न, विषय किंवा प्रस्ताव यांवर उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल. समसमान मते पडतील त्याबाबतीत अध्यक्षास निर्णायक मत असेल. सचिव हा सदस्य नसेल तर त्यास विचारविमर्शात भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

प्रासंगिक रिक्त पद भरणे. ४३. (१) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा इतर मंडळाच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त एखाद्या सदस्याचे पद त्याचा नेहमीचा पदावधी संपण्यापूर्वी रिकामे होईल तेव्हा, कुलगुरू विहित केल्यानुसार, वरिष्ठतेच्या आधारे एखाद्या सदस्यास नामनिर्देशित करून, शक्य तितक्या लवकर ते रिक्त पद भरील.

(२) अशा प्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती ही अन्यथा त्याच प्रवर्गातून उक्त प्राधिकरणावर निवडून येण्यास पात्र असणारी व्यक्ती असेल. अशाप्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती ही, ज्याच्या पदावर तिचे नामनिर्देशन झाले असेल त्या सदस्याने ते पद रिकामे झाले नसते तर जितक्या कालावधीकरिता ते पद धारण केले असते तितक्या कालावधीकरीता ते पद धारण करील.

प्रकरण पाच

## परिनियम, आदेश आणि विनियम

परिनियम. ४४. या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने परिनियमांमध्ये पुढे दिलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(१) सन्मान्य पदव्या प्रदान करणे आणि दीक्षान्त समारंभ आयोजित करणे ;

(२) विद्यापीठ विभाग, परिसंस्था, संचालित महाविद्यालये, उच्च शिक्षण परिसंस्था, संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास परिसंस्था व वसतिगृहे सुरू करणे व ती चालवणे ;

(३) विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(४) विद्यापीठाच्या प्राधिकरणांचे अधिकार व कर्तव्ये ;

(५) विद्यापीठ कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता व सेवाशर्ती यांचे नियमन करणारी तत्त्वे ;

(६) विद्यापीठाची प्राधिकरणे, मंडळे किंवा समित्या यांच्या सदस्यांना निरर्ह ठरविण्यासाठी तरतुदी ;

(७) विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था आणि संचालित महाविद्यालये बंद करणे ;

(८) राज्य शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे, विद्यापीठाचे आणि संलग्न महाविद्यालयाचे, प्रशालांचे आणि पाठशालांचे (राज्य शासन किंवा केंद्र सरकार आणि स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून चालविली जाणारी महाविद्यालये किंवा परिसंस्था खेरीज करून) अध्यापक, अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या अर्हता, सेवा प्रवेश, कार्यभार, आचारसंहिता, पदावधी, कर्तव्ये आणि सेवाशर्ती व तसेच त्यांचे नियतकालिक मूल्यमापन, निवृत्तिवेतन, उपदान आणि भविष्यनिर्वाह निधी यांची तरतूद आणि त्यांची सेवा समाप्त करण्याची रीत ;

(९) विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यापीठाच्या निधीचा वापर करणे ;

(१०) महाविद्यालयांच्या संलग्नीकरणाची किंवा महाविद्यालयांचे संलग्नीकरण काढून घेण्याची मानके ;

(११) व्यक्ती किंवा संघटना यांच्याकडून मिळणारे विश्वस्त निधी, मृत्युपत्रित देणग्या, देणग्या, दाननिधी व अनुदाने स्वीकारणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(१२) राज्य शासनाच्या धोरणानुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी विद्यापीठातील, संलग्न, महाविद्यालयांमधील मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील, प्रशालांमधील आणि पाठशालांमधील अध्यापकांची, अधिकाऱ्यांची तसेच कर्मचाऱ्यांची पुरेशा संख्येतील पदे राखून ठेवण्याची तरतूद करणे ;

(१३) विद्यावर्षातील कामाचे दिवस, प्रत्यक्ष शिक्षणाचे दिवस, रविवार खेरीज करून इतर सुट्या, मोठी सुटी आणि सत्रे ;

(१४) राज्य शासन किंवा केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी चालविलेली महाविद्यालये किंवा परिसंस्था खेरीज करून विद्यापीठाचे संलग्न महाविद्यालयाचे, मान्यताप्राप्त परिसंस्थांचे, प्रशालांचे आणि पाठशालांचे, कसूरदार अध्यापक, अधिकारी आणि अन्य कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करणे ;

(१५) राज्य शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून, लोकहितास्तव विद्यापीठाने एखाद्या महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे व्यवस्थापन स्वतःकडे घेणे किंवा ते हस्तांतरित करणे आणि अशा प्रकारे व्यवस्थापन स्वतःकडे घेण्याच्या किंवा ते हस्तांतरित करण्याच्या शर्ती ;

(१६) या अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी विहित करण्यात यावयाची किंवा आवश्यक असेल अशी कोणतीही बाब.

परिनियम कसे करावयाचे.

**४५.** (१) व्यवस्थापन परिषदेला यात यानंतर तरतूद केलेल्या रीतीने नियम करता येतील, त्यात सुधारणा करता येतील किंवा त्यांचे निरसन करता येईल.

(२) व्यवस्थापन परिषदेला आवश्यक वाटले तर तिला, तिच्यापुढे विचारार्थ आलेल्या कोणत्याही प्रारूप परिनियमाच्या संबंधात विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांचा, प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा अभिप्राय देखील मिळवता येईल :

परंतु, असा कोणताही प्रारूप मसुदा विद्याविषयक बाबींशी संबंधित असेल त्या बाबतीत, ती त्यावर विचार करण्यापूर्वी विद्वत् परिषदेचा अभिप्राय मिळवील.

(३) व्यवस्थापन परिषदेने संमत केलेला प्रत्येक परिनियम कुलाधिपतीकडे सादर करण्यात येईल. कुलाधिपतीला त्या परिनियमाला त्याची अनुमती देता येईल किंवा तो रोखून ठेवता येईल किंवा फेरविचारासाठी तो व्यवस्थापन परिषदेकडे परत पाठवता येईल.

(४) व्यवस्थापन परिषदेने संमत केलेला कोणत्याही परिनियम कुलाधिपतीकडून अनुमती देण्यात येईपर्यंत विधिग्राह्य ठरणार नाही किंवा अंमलात येणार नाही.

(५) पूर्ववर्ती पोट-कलमांत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कुलाधिपतीस स्वतः होऊन किंवा राज्य शासनाच्या सल्ल्यावरून तो विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात परिनियमांमध्ये तरतुदी करण्याविषयी विद्यापीठाला निदेश देता येईल आणि व्यवस्थापन परिषदेने असे निदेश प्राप्त झाल्यापासून साठ दिवसांच्या आत त्यांची अंमलबजावणी केली नाही तर कुलाधिपतीस व्यवस्थापन परिषदेने अशा निदेशांची अंमलबजावणी करणे तिला शक्य न झाल्याबद्दलची कोणतीही कारणे कळवली असतील तर त्या कारणांचा विचार केल्यानंतर, योग्य असे परिनियम करता येतील किंवा त्या परिनियमांत योग्य अशा सुधारणा करता येतील.

आदेश व त्यांचे विषय. ४६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित केलेल्या शर्तींना अधीन राहून व्यवस्थापन परिषदेला, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करण्याकरिता आदेश तयार करता येतील :—

(१) विद्यार्थ्यांना पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी यांच्या अभ्यासक्रमाला प्रवेश देण्यासंबंधीच्या शर्ती ;

(२) विद्यार्थ्यांना, विद्यापीठातील किंवा महाविद्यालयांमधील अशा अभ्यासक्रमांना उपस्थित राहता येण्यासाठी त्यांची नावनोंदणी करण्याकरिता आकारावयाची फी (शिकवणी फी व वसतिगृहाचा खर्च धरून)–ही फी शक्यतोवर एकाच स्थानिक क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांसाठी समान असेल–पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी यांच्या परीक्षासाठी आकारावयाची प्रवेश फी आणि पदवीधरांसाठी नोंदणी फी ;

(३) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा निवास, त्यांची वर्तणूक व शिस्त या संबंधातील शर्ती आणि शिस्तभंगासाठी व पुढील बाबींसह गैरवर्तणुकीसाठी त्यांच्याविरुद्ध करण्यात येणारी कारवाई :—

(अ) परीक्षेच्या वेळी गैरप्रकार करणे किंवा त्यांना अपप्रेरणा देणे ;

(ब) परीक्षांचा प्रभारी अधिकारी किंवा विद्यापीठाचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी यांनी केलेल्या कोणत्याही अधिकृत चौकशीस हजर राहण्यास किंवा साक्ष देण्यास नकार देणे ;

(क) विद्यापीठात किंवा विद्यापीठाबाहेर गैरशिस्तीची किंवा इतर आक्षेपार्ह वर्तणूक ;

(४) विद्यापीठाचे विभाग, महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था, प्रशाला आणि पाठशाला यांमधील अध्यापकांच्या अर्हता व त्यांचे वर्गीकरण ;

(५) परीक्षकांच्या नेमणुका व कर्तव्ये यांचे नियमन करणाऱ्या शर्ती ;

(६) परीक्षा व इतर चाचण्या घेणे आणि परीक्षकांनी उमेदवारांचे मूल्यमापन करण्याची किंवा त्यांची परीक्षा घेण्याची रीत ;

(७) विद्यापीठाच्या अध्यापकांच्या संबंधातील मान्यता आणि विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था, प्रशाला व पाठशाला, यांमध्ये शिकविण्यासाठी व्यक्तींना ज्या शर्तींच्या अधीन राहून अर्हताप्राप्त म्हणून मान्यता देण्यात येईल त्या शर्ती ;

(८) महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, प्रशाला, पाठशाला, सभागृहे व वसतिगृहे यांची तपासणी

(९) सभागृहे व वसतिगृहे यांची मान्यता ;

(१०) विद्यापीठासाठी किंवा विद्यापीठाच्यावतीने संविदा किंवा करार करण्याची पद्धत ;

(११) महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था यांनी विद्यार्थ्यांच्या बदलीसंबंधात अनुसरावयाचे व अंमलबजावणी करावयाचे नियम ;

(१२) हा अधिनियम किंवा परिनियम यांद्वारे किंवा तद्न्वये ज्यांच्यासाठी आदेशाद्वारे तरतूद करावयाची किंवा तरतूद करता येईल त्या अन्य सर्व बाबी ; आणि

(१३) सामान्यतः हा अधिनियम किंवा परिनियम यांद्वारे किंवा तद्न्वये व्यवस्थापन परिषदेला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करण्यासाठी किंवा तिच्यावर लादलेल्या कर्तव्यांचे पालन करण्यासाठी, व्यवस्थापन परिषदेच्या मते आवश्यक असलेल्या तरतुदी करण्यासंबंधातील सर्व बाबी.

आदेश व ते तयार करणे.

४७. (१) व्यवस्थापन परिषदेला, यात यापुढे दिलेल्या रीतीने आदेश तयार करता येतील, त्यात सुधारणा करता येतील किंवा ते निरसित करता येतील.

(२) व्यवस्थापन परिषद, लगतपूर्व कलमाचे खंड (एक) ते (सात) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबी, किंवा विद्यापीठातील अध्यापन व परीक्षा यांचा दर्जा राखण्याशी संबंधित अन्य कोणतीही बाब यांच्या बाबतच्या कोणत्याही आदेशाचा मसुदा विद्वत् परिषदेकडून प्रस्तावित करण्यात आल्याखेरीज तो आदेश तयार करणार नाही.

(३) व्यवस्थापन परिषदेला, पोट-कलम (२) अन्वये विद्वत् परिषदेने प्रस्तावित केलेला कोणताही मसुदा सुधारण्याचा अधिकार असणार नाही, परंतु ती तो अमान्य करू शकेल किंवा व्यवस्थापन परिषद सूचना करील अशा कोणत्याही सुधारणांसह ती भागशः किंवा पूर्णतः विद्वत् परिषदेकडे पुनर्विचारार्थ परत पाठवू शकेल.

(४) व्यवस्थापन परिषदेने तयार केलेले सर्व आदेश, ती निदेश देईल अशा दिनांकापासून अंमलात येतील, परंतु असा तयार केलेला प्रत्येक आदेश दोन आठवड्यांच्या आत कुलाधिपतीला सादर करण्यात येईल. कुलाधिपती, आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून चार आठवड्यांच्या आत त्याची अंमलबजावणी स्थगित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेला निदेश देऊ शकेल आणि तो शक्य तितक्या लवकर, यासंबंधातील त्याचा आक्षेप व्यवस्थापन परिषदेला कळवील. त्याला, व्यवस्थापन परिषदेचा अभिप्राय मिळाल्यानंतर, आदेश स्थगित करण्यासंबंधातील आदेश मागे घेता येईल किंवा तो आदेश नामंजूर करता येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

विनियम आणि नियम.

४८. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विहित केलेल्या शर्तींना आणि व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून विद्वत् परिषदेला, हा अधिनियम, परिनियम किंवा आदेश यांद्वारे किंवा त्याअन्वये ज्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी विनियमांद्वारे तरतूद करावयाची असेल किंवा करता येईल, अशा सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी आणि पूर्णपणे तिच्याशी संबंधित अशा अन्य सर्व बाबींसाठी तरतूद करण्याकरीता हा अधिनियम, परिनियम व आदेश यांच्याशी सुसंगत असे विनियम करता येतील.

(२) कोणत्याही प्राधिकरणास किंवा संस्थेस व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वमान्यतेस अधीन राहून पुढील बाबीसाठी हा अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम यांच्याशी सुसंगत असे नियम करता येतील :—

(अ) त्यांच्या बैठकीच्या तारखा व वेळा आणि त्यात करावयाचे कामकाज यांची नोटीस देणे ;

(ब) तिच्या बैठकीची कार्यपद्धती व गणपूर्तीसाठी आवश्यक असलेली सदस्यांची संख्या यांचे नियमन करणे, आणि अशा बैठकीच्या कार्यवृत्तांचा अभिलेख ठेवणे ;

(क) केवळ असे प्राधिकरण किंवा संस्था यांच्याशी संबंधित अशा सर्व बाबींसाठी तरतूद करणे ;

(३) असे नियम व्यवस्थापन परिषदेला सादर करण्यात येतील व त्या परिषदेला, ते करणारे प्राधिकरण किंवा संस्था यांचा हेतू लक्षात घेतल्यानंतर तिला योग्य वाटेल अशा पद्धतीने त्यात सुधारणा करता येईल किंवा ते रद्द करता येतील.

## प्रकरण सहा

## प्रवेश, परीक्षा व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर बाबी

प्रवेश

४९. राज्य शासनाच्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्यासाठी असलेल्या आरक्षण धोरणाच्या अधीन राहून विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये यांमधील सर्व शिक्षणक्रमांना, राज्य शासनाने केलेले व **राजपत्रात** प्रसिद्ध केलेले किंवा विद्यापीठाने केलेले व विद्यापीठाच्या विद्यापीठ गॅझेटमध्ये प्रसिद्ध केलेले कोणतेही नियम असल्यास त्यानुसार स्पर्धात्मक आधारावर प्रवेश देण्यात येतील :

परंतु असे की, संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने राज्य शासनाने आदर्श नियम तयार केले असतील त्या बाबतीत, विद्यापीठ ते स्वीकारील आणि असे नियम, दर वर्षी एक ऑगस्टपेक्षा उशीरा सुरू होणार नाही अशा कोणत्याही विद्यासत्राच्या प्रारंभापूर्वी किमान सहा महिने अगोदर विद्यापीठ गॅझेटमध्ये किंवा यथास्थिती, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील :

परंतु आणखी असे की, शिस्तीचे पालन करण्याच्या दृष्टीने संबंधित प्राधिकरणाला, विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्याचा अधिकार असेल.

परीक्षांचे वेळापत्रक.

५०. प्रत्येक विद्यासत्राच्या सुरूवातीस आणि कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या ३० ऑक्टोबरपेक्षा उशीराची नसेल त्यावेळी विद्यापीठ, त्याने स्वतः किंवा त्याच्या अधिकारितेतील कोणतेही संलग्न महाविद्यालय किंवा परिसंस्था यांनी चालविलेल्या प्रत्येक शिक्षणक्रमासाठी परीक्षांचे वेळापत्रक तयार करील व प्रसिद्ध करील आणि त्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करील.

**स्पष्टीकरण**.-परीक्षेचे वेळापत्रक म्हणजे, परीक्षेच्या योजनेचा भाग असलेल्या प्रत्येक प्रश्नपत्रिकेची वेळ, दिवस व दिनांक यांचा तपशील दिलेला तक्ता आणि यामध्ये प्रात्यक्षिक परीक्षांच्या तपशीलांचाही समावेश असेल :

परंतु असे की, विद्यापीठाला, त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे व परिस्थितीमुळे या वेळापत्रकाचे पालन करता आले नाही तर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, ते कुलाधिपती व राज्य शासन यांना एक अहवाल सादर करील. प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकाचे पालन का करता आले नाही, त्याची तपशीलवार कारणे या अहवालात नमूद करण्यात येतील.

निकाल जाहीर करणे.

५१. विद्यापीठ, त्याने घेतलेल्या प्रत्येक परीक्षेचा निकाल त्या विशिष्ट अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत जाहीर करण्याचा आटोकाट प्रयत्न करील आणि कोणत्याही परिस्थितीत त्या अखेरच्या दिनांकापासून उशीरात उशीरा पंचेचाळीस दिवसांच्या आत तो जाहीर करील ;

परंतु असे की, पूर्वोक्त पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत कोणत्याही परीक्षेचा निकाल जाहीर करणे कोणत्याही कारणांमुळे विद्यापीठाला शक्य झाले नाही तर ते अशा विलंबाची तपशीलवार कारणे नमूद करून कुलाधिपती व राज्य शासन यांना एक अहवाल सादर करील.

वेळापत्रकाचे पालन न केल्यामुळे परीक्षा अवैध ठरणार नाही.

५२. विद्यापीठाने यथास्थिती कलम ७१ व ७२ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे पालन केले नाही केवळ याच कारणामुळे कोणतीही परीक्षा किंवा परीक्षेचा निकाल अवैध समजण्यात येणार नाही.

५३. क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर सर्व कार्यक्रम यांसाठी यथास्थिति, आपापल्या वर्गाचे, महाविद्यालयाचे किंवा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल, त्यांची निवड ही, इतर कोणत्याही निकषावर न करता खुल्या प्रावीण्य स्पर्धेमधूनच सर्वस्वी गुणवत्तेच्या आधारावरच निश्चितपणे करण्यात यावी यासाठी विद्यापीठ, योग्य परिनियम, आदेश व विनियम तयार करील. क्रीडा व अभ्यासेतर कार्यक्रम.

## प्रकरण सात

## समित्या (कमिट्या)

५४. (१) (अ) विद्यापीठाची ग्रंथालये व ग्रंथालय सेवा प्रशासित, आयोजित व परिरक्षित करण्यासाठी एक ग्रंथालय समिती असेल. या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :— ग्रंथालय समिती, (लायब्ररी कमिटी).

(एक) कुलगुरू-अध्यक्ष ;

(दोन) कुलगुरूकडून नामनिर्देशित केला जाणारा विद्याशाखेचा अधिष्ठाता ;

(तीन) कुलगुरूकडून नामनिर्देशित केला जाणारा, विद्यापीठ, परिसंस्था किंवा विभाग यांचा प्रमुख ;

(चार) विद्वत् परिषदेकडून तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक अध्यापक ;

(पाच) कुलसचिव ;

(सहा) ग्रंथपाल-सचिव.

(ब) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त ग्रंथालय समितीच्या इतर सर्व सदस्यांचा पदावधी पाच वर्षाचा असेल.

(क) समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(एक) ग्रंथालय प्रलेखन सेवा योग्यप्रकारे आयोजित करण्यासाठी व चालू राहण्यासाठी व पुस्तकसंग्रह अद्यायावत ठेवण्यासाठी तरतूद करणे ;

(दोन) ग्रंथालय आणि प्रलेखन सेवांचे आधुनिकीकरण व त्यात सुधारणा करण्याची तरतूद करणे ;

(तीन) विद्यार्थी आणि इतर व्यक्ती यांच्याकडून उपयोग करून घेतल्या जाणाऱ्या ग्रंथालय सेवांबद्दलची फी आणि इतर आकार याबाबत व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(चार) वित्त-लेखा समितीची मान्यता घेण्यासाठी ग्रंथालयाचा वार्षिक अर्थसंकल्प आणि ग्रंथालय विकासासंबंधीचे प्रस्ताव तयार करणे ;

(पाच) ग्रंथालयाच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल सादर करणे.

(सहा) कुलगुरूच्या मार्गदर्शनाखाली हस्तलिखितांचे आणि ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन करण्यासाठी एक उपसमिती स्थापन करणे ;

(२) (अ) पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक वित्त-लेखा समिती असेल :— वित्त-लेखा समिती (वित्त व लेखा समिती).

(एक) कुलगुरू-अध्यक्ष ;

(दोन) सम कुलगुरू ;

(तीन) उप-सचिवापेक्षा कमी दर्जा नसलेली, राज्य शासनाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती;

(चार) लेखा व कोषागारे संचालक किंवा लेखा व कोषागारे सहसंचालकापेक्षा कमी दर्जा नसलेला त्याचा प्रतिनिधी ;

(पाच) व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती ;

(सहा) विद्वत् परिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती ;

(सात)* वित्त-लेखा अधिकारी-सचिव.

(ब) समितीच्या बैठकीच्या गणपूर्तीची संख्या पाच एवढी असेल ;

(क) पदसिद्ध सदस्य खेरीजकरून समितीच्या इतर सर्व सदस्यांचा पदावधी पाच वर्षाचा असेल ;

(ड) उपलब्ध तरतुदी विचारात घेऊन लेख्यांची, खर्चाच्या प्रगतीची आणि नवीन खर्च अंतर्भूत असलेल्या सर्व नवीन प्रस्तावांची तपासणी करण्याकरिता समिती वर्षातून किमान चार वेळा बैठक बोलावील ;

(ई) वित्त-लेखा अधिकाऱ्याने तयार केलेले विद्यापीठाचे वार्षिक लेखा विवरण व वित्तीय अंदाज (अर्थसंकल्प) विचारार्थ व शिफारशींसाठी आणि त्यानंतर व्यवस्थापन परिषदेस योग्य वाटेल अशी कार्यवाही करण्याकरिता व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यासाठी वित्त-लेखा समितीपुढे ठेवण्यात येतील ;

(फ) अर्थसंकल्प पुढील तीन वेगवेगळ्या भागांमध्ये तयार करण्यात येईल :—

(एक) परिरक्षण ;

(दोन) विकास ; आणि

(तीन) स्वतंत्र प्रकल्प किंवा योजना किंवा सहयोग कार्यक्रम अनुदाने.

(ग) समिती पुढील अतिरिक्त कामे व कर्तव्ये पार पाडील :—

(एक) उत्पादक कामांसाठी असलेल्या कर्जातून मिळणाऱ्या उत्पन्नासह विद्यापीठाचे उत्पन्न आणि साधनसंपत्ती यावर आधारित अशा संपूर्ण वर्षाच्या आवर्ती व अनावर्ती खर्चाच्या मर्यादांची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(दोन) विद्यापीठ भत्ता व साधनसंपत्तीची उत्पादक गुंतवणूक व त्यांचे व्यवस्थापन याबाबत व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(तीन) विद्यापीठ विकासासाठी संभाव्य साधनसंपत्ती वाढवण्याच्या शक्यतांचा शोध घेणे व त्यांचा अवलंब करणे ;

(चार) व्यवस्थापन परिषदेने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून विद्यापीठाच्या लेख्यांची परीक्षा करून घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे ;

(पाच) विद्यापीठाच्या मालमत्तेच्या व निधीच्या प्रशासनाशी संबंधित बाबींवर व्यवस्थापन परिषदेला सल्ला देणे ;

(सहा) वित्तीय बाबींच्या संबंधात वेळोवेळी काढण्यात आलेल्या राज्य शासनाच्या आदेशांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत असल्याबद्दल सुनिश्चिती करणे ;

(सात) व्यवस्थापन परिषद, विद्वत् परिषद किंवा विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण, मंडळ किंवा समिती अथवा कोणताही अधिकारी, यांच्याकडून तिच्याकडे निर्दिष्ट केलेल्या वित्तीय बाबींसंबंधात सल्ला देणे ;

(आठ) तिच्या निदर्शनास येईल अशी, वित्तीय बाबींसंबंधातील कोणतीही चूक किंवा अनियमितता कुलगुरूला कळविणे. त्यानंतर कुलगुरूला त्या बाबीच्या गंभीरतेचे निर्धारण केल्यानंतर सत्वर योग्य ती कारवाई करता येईल किंवा ती व्यवस्थापन परिषदेकडे पाठवता येईल';

(ह) समितीचे इतर अधिकार व कर्तव्ये आणि तिच्या बैठकींची कार्यपद्धती, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल ;

(आय) विद्यापीठाचे, महाविद्यालयांचे व परिसंस्थांचे वार्षिक लेखे, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांद्वारे, परीक्षा करण्यासाठी उपलब्ध असतील.

(३) (अ) ज्यांमध्ये प्रत्येक बाबीचे स्वतंत्र मूल्य एकावेळी एक लाख रूपयांपेक्षा अधिक असेल अशा, विद्यापीठाच्या खरेदीच्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक क्रय समिती असेल ; क्रय समिती (खरेदी समिती).

(ब) या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) कुलगुरूने नामनिर्देशित केलेले विद्यापीठांचे, परिसंस्थांचे किंवा विभागांचे तीन प्रमुख ;

(तीन) व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले दोन सदस्य ;

(चार) कुलसचिव ;

(पाच) वित्त—लेखा अधिकारी.

(क) वित्त-लेखा अधिकारी साधारणपणे क्रय समितीचा सचिव म्हणून काम करील. वित्त लेखा अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत कुलसचिव हा समितीचा सचिव म्हणून काम करील ;

(ड) क्रय समिती, ज्यांच्यासाठी खरेदी करावयाची आहे त्या विद्यापीठाच्या, परिसंस्थांच्या किंवा विभागांच्या प्रमुखांना आमंत्रित करील ;

(ई) पदसिद्ध सदस्य खेरीजकरून समितीने सर्व सदस्य दोन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करतील ;

(फ) समितीचे अधिकार व कर्तव्ये विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) (अ) विद्यापीठाच्या प्रत्येक विद्यासेवा अनुभागाची एक समिती असेल या समितीची मुख्य जबाबदारी तिच्या प्रभाराखालील सेवा आयोजित करणे, त्यावर देखरेख करणे आणि त्या चालू ठेवणे ही असेल ; विद्यासेवा अनुभागासाठी समित्या (विद्यासेवा युनिट).

(ब) अशा अनुभागाच्या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) अधिष्ठात्यांनी त्यांच्यामधून नामनिर्देशित केलेला एक अधिष्ठाता ;

(तीन) अनुभागाच्या सेवांचा वापर करणाऱ्या विद्यापीठ परिसंस्थांचे किंवा विभागांचे तीनहून अधिक नसतील इतके, विद्वत्परिषदेने नामनिर्देशित केलेले प्रमुख ;

(चार) अनुभागाला वित्तपुरवठा करणारी कोणतीही एजेंन्सी असल्यास, तिचा एक नामनिर्देशिती ;

(पाच) विद्यापीठ कर्मचारी खेरीज करुन, संबंधित विद्याविषयक सेवांचे विशेष ज्ञान असलेला, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला एक तज्ज्ञ ;

(सहा) संबंधित विद्यासेवा अनुभागाचा प्रमुख—अध्यक्ष सचिव ;

(क) नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी पाच वर्षांचा असेल ;

(ड) समितीचे अधिकार व कर्तव्ये विहित केल्याप्रमाणे असतील ;

(ई) समिती वर्षातून किमान दोनदा आपल्या बैठका घेईल.

वास्तुरचना समिती (इमारत बांधकाम समिती).

(५) (अ) वास्तूरचना समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा त्याचा नामनिर्देशिती ;

(तीन) व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला एक वास्तुविशारद ;

(चार) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला विद्वत् परिषदेचा एक सदस्य ;

(पाच) कुलसचिव ;

(सहा) वित्त-लेखा अधिकारी ;

(सात) विद्यापीठाचा प्रमुख अभियंता-सदस्य सचिव.

(ब) समितीचे अधिकार आणि कर्तव्ये विहित केल्याप्रमाणे असतील.

विश्वविद्यालय छात्र कल्याण समिती (विद्यार्थी कल्याण समिती).

(६) छात्र कल्याण समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल.—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) सम कुलगुरू—उपाध्यक्ष ;

(तीन) मागील पदवी परीक्षेमध्ये विद्याविषयक प्रावीण्य संपादन केलेला आणि विद्यापीठामध्ये पूर्णकालिक अभ्यास करणारा, सम कुलगुरूने नामनिर्देशित केलेला विद्यापीठाच्या प्रत्येक विभागाचा एक विद्यार्थी प्रतिनिधी ;

(चार) कुलगुरूने नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी ;

(पाच) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती व इतर मागसवर्ग यामधून कुलगुरूने आळीपाळीने नामनिर्देशित केलेले दोन विद्यार्थी प्रतिनिधी ;

(सहा) संचालक, छात्र कल्याण—सदस्य सचिव.

कुलगुरू किंवा कुलगुरुच्या अनुपस्थितीत सम कुलगुरू हा छात्र कल्याण समितीच्या प्रत्येक बैठकीचा अध्यक्ष असेल आणि या बैठकीस, आवश्यक असल्याप्रमाणे अधिकारी उपस्थित असतील. समितीची बैठक किमान तीन महिन्यांतून एकदा होईल.

अपक्लेश निवारण समिती (तक्रार निवारण समिती).

(७) (अ) विद्यापीठामध्ये, विद्यापीठाचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी एक अपक्लेश निवारण समिती असेल. अपक्लेश निवारण समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) सम कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले व्यवस्थापन परिषदेचे चार सदस्य ;

(तीन) कुलसचिव, सदस्य—सचिव ;

(ब) कुलसचिवाला मत देण्याचा हक्क असणार नाही.

(क) न्यायाधिकरणाच्या अधिकारितेत नसलेली गाऱ्हाणी किंवा तक्रारी स्वीकारणे व विचारात घेणे अपक्लेश निवारण समितीसाठी कायदेशीर असेल. अपक्लेश निवारण समिती शक्यतोवर सहा महिन्यांच्या आत तक्रारींची सुनावणी करील व त्याबाबतीत निर्णय देईल आणि योग्य वाटेल अशी कारवाई करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेला अहवाल देईल आणि अशा अहवालावरील व्यवस्थापन परिषदेचा निर्णय अंतिम असेल.

## प्रकरण आठ

## विद्यापीठाचे अध्यापक व कर्मचारी

विद्यापीठाच्या अध्यापकांची निवड व नियुक्ती.

**५५.** (१) (अ) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये निर्माण करण्यात आलेल्या अध्यापकीय व अध्यापकेतर पदावरील नियुक्या या गुणवत्तेवर व केवळ गुणवत्तेवरच करण्यात येतील. या नियुक्त्यांपैकी ७० टक्के विभागनिहाय नियुक्त्या या, लेखी कराराअन्वये असतील व त्या, पाच वर्षांहून अधिक असणार नाही अशा नियत अवधीसाठी असतील. अशा प्रत्येक नियुक्तीचे विद्यापीठाच्या मर्जीनुसार नवीकरण करता येईल व नवीकरण केलेली, अशी प्रत्येक नियुक्ती ही नवीन नियुक्ती असल्याचे मानण्यात येईल.

(ब) या अधिनियमाच्या, परिनियमांच्या आणि आदेशांच्या तरतुदींच्या अधीन राहून कुलगुरू विद्यापीठ अनुदान आयोगाची सेवाप्रवेश योजना अंमलात येईपर्यंत गुणवत्ताक्रमानुसार आणि निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे, विद्यापीठ अध्यापकाची नेमणूक करील.

(२) विद्यापीठ अध्यापकांची नेमणूक करण्यासाठी शिफारस करण्याकरिता असलेल्या निवड समितीत पुढील सदस्यांचा समावेश राहील :—

(अ) कुलगुरू किंवा कुलगुरूने निदेश दिल्यावर सम-कुलगुरू—अध्यक्ष ;

(ब) कुलगुरूने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(क) संबंधित संकायाचा अधिष्ठाता ;

(ड) विद्यापीठ विभागाचा प्रमुख किंवा संबंधित परिसंस्थेचा प्रमुख ;

(इ) विद्यापीठाशी ज्या व्यक्ती संबंधित नसतील अशा आणि ज्या विषयासाठी अध्यापकाची निवड करावयाची असेल त्या विषयाचे ज्यांना विशेष ज्ञान आहे, अशा विद्वत् परिषदेने शिफारस केलेल्या सहापेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींच्या नामिकेमधून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल्या किमान तीन तज्ज्ञ व्यक्ती ;

(फ) कुलगुरूने नामनिर्देशित केलेली अनुसूचित जातींमधील किंवा अनुसूचित जमातींमधील किंवा इतर मागासवर्गांमधील एक व्यक्ती :

परंतु, खंड (ड) मध्ये निर्देश केलेला, प्रपाठक असलेला प्रमुख, ज्या पदासाठी नियुक्त्या करण्यात येत असतील त्यापेक्षा वरच्या संवर्गातील असेल :

परंतु, आणखी असे की, प्राध्यापकाच्या पदाच्या बाबतीत खंड (ड) मधील व्यक्ती प्राध्यापक होईल.

(३) कुल सचिव, समितीचा सचिव म्हणून काम करील.

(४) निवडीद्वारे भरावयाच्या विद्यापीठाच्या अध्यापकाच्या प्रत्येक पदाची, कुलगुरूने मान्यता दिलेल्या मसुद्यानुसार व विहित किमान अर्हता आणि अतिरिक्त अर्हतांचा तपशील, वित्तलब्धी आणि भरावयाच्या पदांची संख्या, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी राखीव असतील अशा पदांची संख्या, यांसह यथोचितरीत्या व मोठ्या प्रमाणावर जाहिरात करण्यात येईल आणि या जाहिरातीस अनुसरून, अर्जदारांना ज्या मुदतीत आपले अर्ज सादर करता येतील अशी, कुलगुरूंनी ठरवून द्यावयाची वाजवी मुदत अर्जदारांना देण्यात येईल.

(५) प्रत्येक निवड समितीच्या बैठकीची तारीख प्रत्येक सदस्यास त्यासंबंधी निदान तीस दिवसांची नोटीस देता येईल अशा रीतीने निश्चित करण्यात येईल आणि प्रत्येक उमेदवाराचा तपशील निवड समितीच्या प्रत्येक सदस्यास बैठकीच्या तारखेपूर्वी किमान सात दिवस आधी मिळू शकेल अशा रीतीने त्याच्याकडे पाठविण्यात येईल.

(६) प्रत्येक निवड समितीच्या बैठकीची चार सदस्यांनी गणपूर्ती होईल ; त्यापैकी किमान दोन सदस्य पोट-कलम (२) च्या खंड (इ) अन्वये नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती असतील :

परंतु, निवड समितीस, प्राध्यापकाच्या पदासाठी, ज्यांनी अर्ज केला असेल आणि जे तिच्यापुढे उपस्थित झाले असतील अशा उमेदवारांऐवजी, जिने अर्ज केला नसेल किंवा तिच्यापुढे उपस्थित राहिली नसेल परंतु जी यथोचितरित्या अर्हताप्राप्त असेल आणि तिच्या नावे अपवादात्मकरित्या उच्च अशी विद्याविषयक कामगिरी नमूद असेल किंवा विशेषीकरणामध्ये कार्यनिपुणता असेल किंवा असाधारण प्रकारचे विद्याविषयक अंशदान असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावाची तसे लेखी नमूद करून नेमणुकीसाठी शिफारस करता येईल.

(७) प्रत्यक्ष प्रतिकूल परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीच्या विनंतीअर्जावरून किंवा स्वतः होऊन, आवश्यक असेल किंवा आवश्यक झालेली असेल अशी, चौकशी करून किंवा अशी चौकशी केल्यानंतर किंवा ज्या अध्यापकांच्या नियुक्तीवर परिणाम होण्याची शक्यता असेल अशा व्यक्तींकडून घेतलेल्या स्पष्टीकरणांसहित अशी स्पष्टीकरणे मिळवून किंवा मिळविल्यानंतर कुलाधिपतीची अशी खात्री पटली की, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने केलेली विद्यापीठाच्या अध्यापकाची नियुक्ती त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार नव्हती तर, कुलाधिपती अशा अध्यापकाच्या सेवाशर्तीसंबंधीच्या करारामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आदेशाद्वारे त्या अध्यापकाला एक महिन्याची नोटीस किंवा अशा नोटिशीच्या ऐवजी एक महिन्याचे वेतन दिल्यानंतर त्यांची नियुक्ती समाप्त करण्याचा निदेश कुलगुरूला देऊ शकेल आणि कुलगुरू ताबडतोब निदेशाचे अनुपालन करील व नव्याने निवड करण्यासाठी उपाय योजील. जिची नियुक्ती अशा प्रकारे समाप्त करण्यात आलेली असेल ती व्यक्ती त्याच पदासाठी पुन्हा अर्ज करण्यास पात्र असेल.

(८) लगतपूर्ववर्ती पोट-कलमान्वये कुलाधिपतीने काढलेला कोणताही आदेश अंतिम असेल आणि त्या आदेशाची एक प्रत ती मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत कुलगुरूकडून संबंधित अध्यापकास देण्यात येईल.

(९) कोणत्याही व्यक्तीच्या सेवासमाप्तीनंतरच्या कोणत्याही कालावधीसाठी तिला विद्यापीठ निधीमधून वेतन किंवा भत्त्याच्या रूपाने कोणतेही प्रदान करण्यात येणार नाही याबाबत खात्री करून घेणे हे कुलगुरूचे कर्तव्य असेल आणि असे कोणतेही प्रदान प्राधिकृत करणारा किंवा करणारा कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी, अशा प्रदान केलेल्या रकमेची विद्यापीठाकडे प्रतिपूर्ती करण्यास दायी असेल.

५६. विद्यापीठाच्या अध्यापकाच्या तात्पुरत्या रिकाम्या पदावर नेमणूक करावयाची असेल त्याबाबतीत, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीसाठी पद रिकामे राहणार असेल तर निकटपूर्ववर्ती कलमाच्या तरतुदींस अनुसरून, निवड समितीच्या शिफारशीनुसार नेमणूक करण्यात येईल : विद्यापीठाच्या अध्यापकांची तात्पुरती रिकामी पदे भरणे.

परंतु, अध्यापनाच्या दृष्टीने ते रिकामे पद ताबडतोब भरणे आवश्यक आहे याबद्दल कुलगुरूची खात्री झाल्यास त्यास, पुढीलप्रमाणे रचना केलेल्या स्थानिक निवड समितीच्या शिफारशींवरून प्रथमतः एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि अशा नेमणुकीसंबंधी तो व्यवस्थापन परिषदेस कळवील :—

(एक) कुलगुरू–अध्यक्ष ;

(दोन) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता ;

(तीन) संबंधित विभाग प्रमुख, आणि

(चार) कुलगुरूने नामनिर्देशित केलेली एक तज्ज्ञ व्यक्ती ; मात्र विभाग प्रमुख हा अधिष्ठाताही असेल तर, कुलगुरू एका व्यक्तीऐवजी दोन व्यक्तींची नेमणूक करील.

५७. संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य किंवा विद्यापीठ परिसंस्थांचे किंवा विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी पदव्युत्तर केंद्रे किंवा उप-केंद्रे यांचे संचालक किंवा प्रमुख यांची निवड करण्यासाठी असलेल्या निवड समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :— संचालित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची नियुक्ती व निवड.

(अ) कुलगुरू–अध्यक्ष ;

(ब) कुलगुरूचा एक नामनिर्देशिती ;

(क) विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या, व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल्या दोन तज्ज्ञ व्यक्ती व विद्वत् परिषदेने नामनिर्देशित केलेली एक तज्ज्ञ व्यक्ती.

५८. (१) (अ) खालील पदांच्या नेमणुकीसाठी योग्य उमेदवारांची शिफारस करण्यासाठी निवड समिती असेल :— विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवड समित्या.

(एक) कुलसचिव ;

(दोन) परीक्षा नियंत्रक ;

(तीन) वित्त-लेखा अधिकारी ;

(चार) प्रधान ग्रंथपाल.

(ब) निवड समितीत पुढील सदस्यांचा समावेश असेल,—

(एक) कुलगुरू किंवा कुलगुरूच्या निदेशावरून सम कुलगुरू–अध्यक्ष ;

(दोन) व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले दोन सदस्य ;

(तीन) व्यवस्थापन परिषदेचा सदस्य नसेल अशा, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला अधिष्ठाता ;

(चार) विद्यापीठ, कोणतेही संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्याशी जे संबंधित नाहीत असे, अशा भरावयाच्या रिक्त पदांच्या संबंधात विशेष ज्ञान असणारे कुलगुरूने नामनिर्देशित केलेले दोन तज्ज्ञ ;

(पाच) कुलगुरूने नामनिर्देशित केलेली, अनुसूचित जातींमधील किंवा अनुसूचित जमातींमधील किंवा इतर मागासवर्गांमधील एक व्यक्ती ;

(सहा) कुलसचिव, एखाद्या पदाकरीता स्वतःच उमेदवार असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत तो निवड समितीचा सदस्य-सचिव म्हणून काम पाहील.

(२) विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांसाठी निवड समिती आणि नेमणुकीची पद्धत विहित केल्याप्रमाणे असेल.

(३) संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य, अध्यापक आणि इतर कर्मचारी यांच्यासाठी निवड समिती व त्यांच्या नेमणुकीची पद्धत विहित केल्याप्रमाणे असेल.

(४) कोणत्याही संलग्न महाविद्यालयाचे व्यवस्थापन, विहित पद्धतीनुसार अध्यापकांची व इतर कर्मचाऱ्यांची रिकामी पदे भरण्यापूर्वी, इतर महाविद्यालयांमध्ये सामावून घेण्यासाठी विद्यापीठाने ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तींच्या सूचीमध्ये कोणतीही योग्य व्यक्ती उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत विद्यापीठ व उच्च शिक्षण संचालक यांच्याकडून खात्री करून घेईल आणि अशी व्यक्ती उपलब्ध असेल तर व्यवस्थापन त्या व्यक्तीची नियुक्ती करील.

इतर समित्या. ५९. या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या समित्यांशिवाय, विद्यापीठाच्या प्राधिकरणांना, कोणत्याही विशिष्ट कामाकरिता योग्य शर्ती व निर्देश यांसह समित्या नियुक्त करता येतील व अशा समित्यांमध्ये अशी समिती स्थापन करण्याऱ्या प्राधिकरणाच्या, सदस्यांचा आणि तसेच ते प्राधिकरण नामनिर्देशित करील अशा अन्य व्यक्तींचाही समावेश असेल.

न्यायाधिकरण. ६०. नागपूर विद्यापीठाकरिता रचना केलेले, विद्यापीठ व महाविद्यालये प्राधिकरण हे या विद्यापीठाच्या आणि त्याला संलग्न असलेल्या महाविद्यालयांच्या किंवा विद्यापीठाने मान्यता दिलेल्या परिसंस्थांच्या व पाठशालांच्या प्रयोजनार्थ असलेले न्यायाधिकरण असेल.

## प्रकरण नऊ

## परवानगी, संलग्नीकरण व मान्यता

संलग्नीकरण आणि मान्यता यांकरिता शर्ती. ६१. संलग्नीकरणासाठी किंवा मान्यतेसाठी अर्ज करणारे व्यवस्थापन आणि ज्याच्या महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला किंवा पाठशालेला संलग्नीकरण किंवा मान्यता प्रदान करण्यात आली आहे असे व्यवस्थापन पुढील हमी देईल आणि तिचे अनुपालन करील.—

(अ) अधिनियम आणि त्याखालील परिनियम, आदेश व विनियम यांच्या तरतुदींचे आणि विद्यापीठाच्या स्थायी आदेशांचे आणि निदेशांचे पाल करण्यात येईल ;

(ब) कलम ६५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे संलग्न महाविद्यालयाकरिता तरतूद केलेली एक वेगळी स्थानिक व्यवस्थापन समिती असेल ;

(क) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, विद्यापीठाने आणि राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक नसेल ;

(ड) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, पुस्तके, अध्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यांसारख्या योग्य व पर्याप्त भौतिक सुविधा असतील ;

(ई) महाविद्यालयाची किंवा परिसंस्थेची किंवा पाठशालेची वित्तीय साधने ही त्यांची देखभाल व कामकाज सातत्याने चालविण्यासाठी पुरेशी तरतूद करणारी असतील ;

(फ) संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला यांच्या अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या व अर्हता आणि संलग्न महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि वित्तलब्धी, विद्यापीठाने विहित केल्याप्रमाणे असतील आणि अभ्यासक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन कार्यक्षमतेने चालण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यास पुरेशी असतील ;

(ग) संलग्न करून घेण्यात यावयाच्या महाविद्यालयाच्या सर्व अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आणि त्या महाविद्यालयाच्या सुविधा, परीक्षा घेण्यासाठी आणि विद्यापीठाच्या इतर कार्यक्रमांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील ;

(ह) अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम यांच्या तरतुदींअन्वये कुलाधिपती, कुलगुरू आणि विद्यापीठांचे इतर अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी दिलेले निदेश व आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल ;

(आय) विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल किंवा त्याचे स्थानांतरण करण्यात येणार नाही ;

(ज) विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय महाविद्यालय, परिसंस्था किंवा पाठशाला बंद करण्यात येणार नाही ;

(के) कलम ७१ अन्वये महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा पाठशाला यांचे संलग्नीकरण रद्द करण्यात किंवा मान्यता काढून घेण्यात आल्यास किंवा ती बंद करण्यात आल्यास राज्य शासनाने किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने सहायक अनुदान म्हणून दिलेल्या रकमेमधून बांधण्यात किंवा निर्माण करण्यात आलेल्या, महाविद्यालयाच्या, परिसंस्थेच्या किंवा पाठशालेच्या इमारती व साधनसामग्रीसह सर्व मत्ता राज्य शासनाकडे निहित होतील.

६२. (१) विशेषतः, विद्यापीठाच्या अधिकारितेमधील सेवारहित व न्यूनविकसित क्षेत्रांच्या गरजा योग्य प्रकारे विचारात घेऊन उच्च शिक्षणाच्या सुविधांचे समन्याय वाटप होण्याची सुनिश्चिती होईल अशा रीतीने उच्च शिक्षणाच्या परिसंस्थांची स्थाने निश्चित करण्यासाठी विद्यापीठ, शैक्षणिक विकासाची एक उद्देशनिष्ट योजना तयार करील. अशी योजना नियोजन विकास मंडळाकडून तयार करण्यात येईल आणि विद्वत् परिषदेपुढे ठेवण्यात येईल व दर ५ वर्षांनी ती अद्ययावत करण्यात येईल. परवानगी संबंधीची कार्यपद्धती.

(२) अशा योजनेशी सुसंगत नसेल असे, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासंबंधीचा कोणताही अर्ज विद्यापीठाकडून विचारात घेतला जाणार नाही.

(३) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्याच्या अगोदरच्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(४) पूर्वोक्त विहित कालमर्यादेत मिळालेल्या अशा सर्व अर्जांची नियोजन विकास मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज नियोजन विकास मंडळाला उचित वाटतील अशा शिफारशींसह, संबद्ध कारणांनी यथोचितरीत्या पुष्टी देऊन, त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी राज्य शासनाकडे पाठवण्यात येतील.

(५) राज्य शासन, विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी त्याला त्याच्या निरपवाद स्वेच्छा निर्णयानुसार उचित व योग्य वाटतील अशा महाविद्यालयांना किंवा परिसंस्थांना परवानगी देऊ शकेल व तसे करताना ते राज्य शासनाची अर्थसंकल्पीत साधनसंपत्ती, नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनांची योग्यायोग्यता आणि उच्च शिक्षणाच्या परिसंस्थांच्या स्थाननिश्चयनासंबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम विचारात घेईल :

परंतु असे की, अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून ठेवून राज्य शासन उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी आलेल्या, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या अशा कोणत्याही अर्जाला मान्यता देऊ शकेल.

(६) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याची परवानगी देण्यासाठी राज्य शासन कोणताही अर्ज विचारासाठी थेट दाखल करून घेणार नाही.

संलग्नीकरण कार्यपद्धती.

**६३.** (१) कलम ६२ अन्वये राज्य शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर विद्यापीठाची विद्वत् परिषद पोट-कलम (२) मध्ये दिलेल्या विहित कार्यपद्धतीचे अनुसरण करून आणि नवीन महाविद्यालयाने कराररनिविष्ट शर्तींचे पालन केलेले आहे काय आणि कोणत्या मर्यादेपर्यंत पालन केलेले आहे ते विचारात घेतल्यानंतर त्या महाविद्यालयाला पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास मंजुरी देण्याबाबत विचार करील. या संबंधातील विद्वत् परिषदेचा निर्णय अंतिम असेल.

(२) संलग्नीकरणास मंजुरी मिळण्याबाबतचा अर्ज विचारात घेण्याच्या प्रयोजनासाठी विद्वत् परिषद, तिने या प्रयोजनासाठी रचना केलेल्या समितीकरवी चौकशी करण्याची व्यवस्था करील.

(३) विद्वत् परिषद पुढील बाबतीत निर्णय घेईल :—

(अ) संलग्नीकरणास मंजुरी द्यावयाची किंवा नाकारावयाची ;

(ब) पूर्णतः संलग्नीकरणास मंजुरी द्यावयाची किंवा अंशतः संलग्नीकरणास मंजुरी द्यावयाची ;

(क) विषय, अभ्यासाचे पाठ्यक्रम व प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(ड) संलग्नीकरणास मंजुरी देताना किंवा मंजुरी देण्यासाठी कराररनिविष्ट करता येतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्या शर्ती.

(४) कुलसचिव विद्वत् परिषदेचा निर्णय, संलग्नीकरणाचा अर्ज मंजूर करण्यात आला असेल तर पुढील माहितीसह व्यवस्थापनाला कळवील आणि एक प्रत संचालक, उच्च शिक्षण यांस पाठवील :—

(अ) संलग्नीकरणासाठी मान्यता देण्यात आलेले विषय आणि पाठ्यक्रम ;

(ब) प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(क) ज्या शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून मान्यता देण्यात आलेली असेल अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्या शर्ती.

(५) कलम ६२ मध्ये निर्देशिलेली कार्यपद्धती योग्य त्या फेरफारांसह नवीन पाठ्यक्रम, जादा विद्याशाखा, नवीन विषय आणि जादा उपविभाग सुरू करण्यासंबंधीच्या परवानगीच्या बाबतीत लागू होईल.

(६) विद्यापीठाकडून महाविद्यालयाला प्रथम संलग्नता देण्यात आल्याखेरीज महाविद्यालय कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देणार नाही.

(७) पोट-कलमे (१) ते (४) मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यपद्धती योग्य त्या फेरफारांसह वेळोवेळी संलग्नीकरण चालू ठेवण्याचा विचार करण्याच्या बाबतीत लागू होईल.

परिसंस्थांना व पाठशालांना मान्यता देण्याची कार्यपद्धती.

**६४.** (१) कमीत कमी पाच वर्षे संशोधन किंवा विशेष अभ्यासक्रम यांसाठी सक्रिय असलेल्या व मान्यतेची मागणी करत असलेल्या परिसंस्थेचे व्यवस्थापन खालील बाबींच्या संबंधातील पूर्ण माहितीसह विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे अर्ज करील :—

(अ) व्यवस्थापनाची रचना व त्याचा कर्मचारीवर्ग ;

(ब) ज्या विषयांसाठी व पाठ्यक्रमांसाठी मान्यता हवी आहे ते विषय व पाठ्यक्रम ;

(क) ज्याकरिता तरतूद केली आहे अशी जागा, साधनसामग्री व विद्यार्थ्यांची संख्या ;

(ड) संशोधनासाठी मार्गदर्शन करण्यास मान्यताप्राप्त किंवा या प्रयोजनांसाठी विद्यापीठाकडून मान्यता मिळण्यास योग्य असलेला परिसंस्थेचा कायम, अभ्यागत व मानसेवी कर्मचारीवर्ग ; त्यांचा अनुभव, परिसंस्थेत केलेल्या संशोधनाचा पुरावा, परिसंस्थेद्वारा प्रकाशित केलेली प्रकाशने, अहवाल, प्रबंधिका व पुस्तके ;

(ई) आकारण्यात येणारी फी, किंवा आकारण्याचा प्रस्ताव असलेली फी आणि इमारती, साधनसामग्री यांवरील व परिसंस्था सतत चालू ठेवण्यासाठी व तिच्या कार्यक्षम कामकाजासाठी केलेल्या भांडवली खर्चाच्या तरतुदी.

(२) असा अर्ज विचारात घेण्यापूर्वी नियोजन विकास मंडळ त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही माहिती मागवू शकेल.

(३) जर नियोजन विकास मंडळाने अर्ज विचारात घेण्याचे ठरवले तर ते संबंधित विषयाचे किंवा क्षेत्राचे विशेष ज्ञान असेल अशा सक्षम व्यक्तीद्वारे किंवा व्यक्तींद्वारे स्थानिक चौकशी करवून घेण्याचा निदेश देऊ शकेल. अशा चौकशीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर व त्यास आवश्यक वाटत असेल तर आणखी चौकशी करून, नियोजन विकास मंडळ अर्ज पूर्णतः अथवा अंशतः मंजूर करण्याचा किंवा नाकारण्याचा प्रस्ताव विद्वत् परिषदेस सादर करील.

(४) विद्वत् परिषद, उक्त मंडळाने सादर केलेल्या प्रस्तावावर विचार करून तो मंजूर करील किंवा नाकारील. विद्वत् परिषदेचा याबाबतचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

(५) पाठशालांना मान्यता देण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे असेल :—

किमान दोन वर्षे एवढ्या कालावधीसाठी संस्कृतच्या अध्यापनात सक्रिय कार्यरत असलेल्या आणि मान्यता मागणाऱ्या पाठशालांचे व्यवस्थापन पुढील बाबींच्या संबंधातील संपूर्ण माहितीसह विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे अर्ज करील :—

(अ) व्यवस्थापनाची रचना व त्याचा कर्मचारीवर्ग ;

(ब) ज्या विषयांसाठी व पाठ्यक्रमांसाठी मान्यता मागितली आहे ते विषय व पाठ्यक्रम ;

(क) ज्याकरिता तरतूद केली आहे अशी जागा, साधनसामग्री व विद्यार्थ्यांची संख्या ;

(ड) कायम, अभ्यागत व मानसेवी कर्मचारीवर्ग आणि त्यांच्या अर्हता व प्रकाशने इत्यादींचा इतर संबंधीत तपशील ;

(ई) आकारण्यात येणारी किंवा आकारण्याचे योजलेली फी आणि इमारत, साधनसामग्री यांवरील भांडवली खर्चासाठी व पाठशाला सतत चालू ठेवण्यासाठी केलेल्या तरतुदी ;

(फ) असा अर्ज विचारात घेण्यापूर्वी नियोजन विकास मंडळ त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही माहिती मागवू शकेल ;

(ग) नियोजन विकास मंडळाने अर्ज विचारात घेण्याचे ठरविले तर त्याला, त्या प्रस्तावाची काळजीपूर्वक तपासणी करण्यासाठी स्थानिक समिती नियुक्त करता येईल. नियोजन विकास मंडळ, समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर अर्ज पूर्णतः किंवा अंशतः मंजूर करण्यासंबंधातील किंवा नाकारण्यासंबंधातील त्याच्या शिफारशी विद्वत् परिषदेकडे पाठवील ;

(ह) विद्वत् परिषद, नियोजन विकास मंडळाने सादर केलेल्या प्रस्तावावर विचार करून तो मंजूर करील किंवा नाकारील आणि त्यानुसार व्यवस्थापन परिषदेला कळवील.

संलग्न महाविद्यालय, परिसंस्था यांची स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समिती.

६५. (१) प्रत्येक संलग्न महाविद्यालयासाठी किंवा परिसंस्थेसाठी एक स्वतंत्र स्थानिक व्यवस्थापन समिती असेल व त्यात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(अ) व्यवस्थापनाचा अध्यक्ष किंवा सभापती—अध्यक्ष ;

(ब) व्यवस्थापनाचा सचिव किंवा त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती ;

(क) व्यवस्थापनाने नामनिर्देशित केलेले, त्या भागातील निरनिराळ्या कार्यक्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारे तीन स्थानिक सदस्य ;

(ड) आळीपाळीने वरिष्ठतेनुसार महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे तीन अध्यापक ;

(ई) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अध्यापकेतर कर्मचारीवर्गाने निवडून दिलेल्या कर्मचाऱ्यांमधून आळीपाळीने व वरिष्ठतेनुसार वर्ग चार मधील नसलेला एक अध्यापकेतर कर्मचारी ;

(फ) प्राचार्य, सदस्य—सचिव.

(२) शासनाद्वारे किंवा स्थानिक प्राधिकराणाद्वारे व्यवस्थापन केले जाणाऱ्या आणि चालवण्यात येणाऱ्या महाविद्यालयासाठी किंवा परिसंस्थेसाठी असलेल्या स्थानिक सल्लागार समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) संचालक, उच्च शिक्षण याने नामनिर्देशित केलेला सहसंचालक किंवा उपसंचालक ;

(दोन) संचालक, उच्च शिक्षण याने नामनिर्देशित केलेल्या, वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांचे किंवा कार्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन व्यक्ती ;

(तीन) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अध्यापकांनी नामनिर्देशित केलेले तीन अध्यापक ;

(चार) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या वर्ग चारमधील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर अध्यापकेतर कर्मचाऱ्यांचा एक प्रतिनिधी ;

(पाच) प्राचार्य, सदस्य—सचिव.

(३) स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समितीच्या वर्षातून किमान दोनदा बैठका होतील.

(४) निवडून दिलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षांचा असेल.

(५) स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समितीचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) अंदाजपत्रक व वित्तीय विवरणपत्रे तयार करणे ;

(ब) अध्यापकीय व इतर पदे निर्माण करण्यासाठी व्यवस्थापनाकडे शिफारस करणे ;

(क) शिक्षणाचा व अंतर्गत मूल्यमापनाचा कार्यक्रम ठरवणे आणि महाविद्यालयातील अभ्यासाच्या प्रगतीविषयी चर्चा करणे ;

(ड) महाविद्यालयातील अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी व्यवस्थापनाकडे शिफारस करणे ;

(ई) महाविद्यालयाच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद न केलेल्या नवीन खर्चाचे प्रस्ताव तयार करणे ;

(फ) निरनिराळ्या वर्गाची प्रवेशक्षमता, वेळापत्रके तयार करणे, अध्यापनाच्या उपलब्ध कार्यभाराचे वाटप करणे या संबंधात आणि प्राचार्याकडून समितीकडे वेळोवेळी विचारार्थ पाठवण्यात येतील त्या, महाविद्यालयाचे अंतर्गत व्यवस्थापन व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शिस्त यांच्याशी संबंधित अशा इतर बाबींविषयी प्राचार्याला सल्ला देणे ;

(ग) कोणताही निरीक्षण अहवाल असल्यास, त्यावर विचार करणे आणि त्यावर शिफारशी करणे ;

(ह) स्थानिक चौकशी समितीचा कोणताही अहवाल असल्यास, त्यावर विचार करणे आणि त्यावर शिफारशी करणे ;

(आय) ३० जुन रोजी संपणाऱ्या वर्षासाठी समितीने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल तयार करणे आणि तो व्यवस्थापनास, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस व संचालकास सादर करणे ;

(जे) व्यवस्थापनाकडून व विद्यापीठाकडून सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे व अशा इतर अधिकारांचा वापर करणे.

६६. संलग्न महाविद्यालयास, मान्यताप्राप्त परिसंस्थेस, किंवा पाठशालेस ज्यांच्यासाठी संलग्नीकरणास मंजूरी देण्यात आली होती किंवा मान्यता देण्यात आली होती त्या पाठ्यक्रमांचे संलग्नीकरण किंवा मान्यता पुढे चालू ठेवण्यासाठी अशा संलग्नीकरणाच्या किंवा मान्यतेच्या समाप्तीच्या तारखेपूर्वी सामान्यतः सहा महिने अगोदर अर्ज करता येईल. विद्यापीठ परिनियमांमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे ती जेथवर संलग्नीकरण किंवा मान्यता पुढे चालू ठेवण्यासंबंधात लागू असेल तेथवर पालन करील. संलग्नीकरण किंवा मान्यता चालू ठेवणे.

६७. संलग्न महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस किंवा पाठशालेस जादा पाठ्यक्रमांकरिता संलग्नीकरणासाठी किंवा मान्यतेसाठी अर्ज करता येईल. विद्यापीठ कलमे ६१, ६३ व ६४ यांमध्ये विहित कार्यपद्धतीचे ती जेथवर लागू असेल तेथवर पालन करील. संलग्नीकरण किंवा मान्यता यांच्या व्याप्तिमध्ये वाढ करणे.

६८. कमीत कमी सहा वर्षे संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला असलेल्या संलग्न महाविद्यालयाला किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेला किंवा पाठशालेला, स्थायी संलग्नीकरणासाठी किंवा मान्यतेसाठी अर्ज करता येईल. नियोजन विकास मंडळ अर्जावर विचार करील, त्याची छाननी करील आणि विद्वत् परिषदेकडे त्याबाबतीत शिफारशी करील. संलग्नीकरणाच्या किंवा मान्यतेच्या सर्व शर्ती संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला समाधानकारकपणे पूर्ण करीत आहे. याबद्दल आणि तिने, विद्यापीठाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या उच्च शैक्षणिक व प्रशासकी दर्जा प्राप्त केलेला आहे. याबद्दल विद्वत् परिषदेची खात्री पटली तर विद्वत् परिषद यथास्थिती त्या महाविद्यालयाला, परिसंस्थेला किंवा पाठशालेला कायमचे संलग्नीकरण किंवा मान्यता देईल. स्थायी संलग्नीकरण व मान्यता.

६९. (१) महाविद्यालयाचा किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा याबाबत निर्णय घेणे विद्यापीठाला शक्य व्हावे म्हणून विद्यापीठ निदेश देईल असे अहवाल, विवरणे व इतर तपशील प्रत्येक संलग्न महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला सादर करील. संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था व पाठशाला यांची तपासणी.

(२) कुलगुरू प्रत्येक विद्यापीठ विभागाची किंवा परिसंस्थेची, संलग्न महाविद्यालयाची, मान्यता प्राप्त परिसंस्थेची किंवा पाठशालेची त्याने त्याबाबतीत नियुक्त केलेल्या एका किंवा अधिक समित्यांकडून प्रत्येक तीन वर्षातून किमान एकदा तपासणी करण्याची व्यवस्था करील ; या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :–

(अ) संचालक, नियोजन विकास मंडळ किंवा कुलगुरुने नामनिर्देशित केलेला अधिष्ठाता–अध्यक्ष ;

(ब) विद्वत् परिषदेकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशी, विद्यापीठाशी संबंध नसलेली एक तज्ज्ञ व्यक्ती ;

(क) व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाची एक तज्ञ व्यक्ती :

परंतु, असा कोणताही सदस्य हा संबंधित महाविद्यालयाच्या, परिसंस्थेच्या किंवा पाठशालेच्या व्यवस्थापनाशी संबंधित असणार नाही.

(३) समिती तिचा अहवाल कुलगुरूकडे विचारार्थ आणि कलम १४ च्या पोट-कलम (१४) अन्वये आवश्यक अशी आणखी कार्यवाही करण्यासाठी सादर करील.

संलग्नीकरण किंवा मान्यता काढून घेणे.

७०. (१) जर संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला कलम ६१ मध्ये तरतूद केलेल्या संलग्नीकरणाच्या किंवा मान्यतेच्या शर्तीचे अनुपालन करण्यात किंवा कलम ६५ मध्ये तरतूद केल्यानुसार स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समितीला यथोचितरीत्या कार्य करण्यास मुभा देण्यात किंवा अधिनियमान्वये काढलेल्या निदेशांनुसार कार्यवाही करण्यात कसूर करील किंवा विद्यापीठांच्या हितसंबंधाला किंवा त्याने निर्धारित केलेल्या दर्जास बाधा पोचेल अशा रीतीने महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था चालवीत असेल तर, नियोजन विकास मंडळ, संलग्नीकरण किंवा मान्यता याद्वारे महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस किंवा पाठशालेस प्रदान करण्यात आलेले विशेषाधिकार अंशतः किंवा संपूर्णतः का काढून घेण्यात येऊ नयेत किंवा त्यात का फेरफार करण्यात येऊ नयेत याबाबतची कारणे दाखवा नोटीस व्यवस्थापनाला पाठवू शकेल.

(२) नियोजन विकास मंडळ, उपरोल्लिखित कार्यवाही करण्याचे त्याने का योजले आहे याबद्दलच्या कारणांचा उल्लेख करील व नोटिशीची एक प्रत महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा किंवा पाठशालेचा प्रमुख यांच्याकडे पाठवील. नियोजन विकास मंडळ, नोटिशीच्या उत्तरादाखल व्यवस्थापनाने किती मुदतीत आपले लेखी निवेदन सादर केले पाहिजे ती मुदतही त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करील ; ही मुदत तीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही.

(३) असे लेखी निवेदन मिळाल्यावर, किंवा पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यावर, नियोजन विकास मंडळ, असे विशेषाधिकार काढून घेण्याबाबतच्या किंवा त्यात फेरबदल करण्याबाबतच्या प्रस्तावासह किंवा त्या प्रस्तावाशिवाय नोटीस किंवा कोणतेही लेखी निवेदन असल्यास ते निवेदन विद्वत् परिषदेपुढे मांडील.

(४) विद्वत् परिषद, महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला यांमधील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन, कुलगुरूकडे, याबाबतीत करावयाच्या कार्यवाहीची शिफारस करील आणि त्यानंतर कुलगुरू त्या शिफारशींची अंमलबजावणी करील.

महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला बंद करणे.

७१. (१) राज्य शासनाच्या आणि विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीखेरीज महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या किंवा पाठशालेच्या कोणत्याही व्यवस्थापनाला महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला बंद करण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(२) महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन आधीच्या वर्षाच्या १ ऑगस्टला किंवा त्यापूर्वी, (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला) बंद करण्यासंबंधीची सर्व कारणे नमूद करून आणि इमारती व साधनसामग्री यांच्या रूपात असलेल्या मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजार मुल्य आणि त्यास एकतर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून, राज्य शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्त पुरवठा संस्थाकडून त्यावेळेपर्यंत मिळालेली अनुदाने यांचा निर्देश करून विद्यापीठाकडे अर्ज करील.

(३) असा अर्ज मिळाल्यावर ते महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला बंद करण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे याचे मुल्यमापन करण्यासाठी व ते ठरविण्यासाठी विद्वत् परिषद, तिला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करील आवश्यक ते सहाय्य देऊन किंवा विद्यापीठाने ते महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा पाठशाला ताब्यात घेऊन किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करून महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा पाठशाला बंद करण्याची बाब टाळता येईल किंवा कसे याचीही तपासणी विद्वत् परिषदेस करता येईल.

(४) विद्वत् परिषदेने महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला बंद करण्याची शिफारस करण्याचे ठरविल्यास ती परिषद, व्यवस्थापनांकडून वसूल करावयाच्या नुकसानभरपाईच्या किंवा भरपाईच्या रकमेचे प्रमाण आणि विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन किंवा इतर सार्वजनिक वित्त पुरवठा संस्था यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या पैशांचा वापर करून निर्माण करण्यात आलेल्या मत्ता विद्यापीठाकडे किंवा व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात याव्यात किंवा कसे व कमी करण्यात आलेले अध्यापक व कर्मचारीवर्ग यांना द्यावयाची भरपाई याबाबतीत अहवाल तयार करील व ती व्यवस्थापन परिषदेला सादर करील.

(५) त्यानंतर विद्वत् परिषद, व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वसहमतीने व राज्य शासनाच्या मान्यतेने, संलग्न महाविद्यालयाला किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेला किंवा पाठशालेला ते महाविद्यालय किंवा ती मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला बंद करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे ते ठरवील.

(६) विद्यापीठ ते महाविद्यालय किंवा ती मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला ताब्यात घेण्याचे किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्याचे ठरवील तर त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती ही, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(७) महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत किंवा पाठशालेत आधीच प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने, महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला बंद करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने करण्यात येईल व पहिल्या वर्षाचे वर्ग प्रथम बंद करण्यात येतील आणि कोणालाही नव्याने प्रवेश दिला जाणार नाही. (महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा पाठशाला) टप्प्याटप्प्याने बंद करण्याची पद्धती ही विहित केल्याप्रमाणे असेल.

## प्रकरण दहा

## नावनोंदणी, पदव्या व दीक्षांत समारंभ

**७२.** सर्व पदव्युत्तर शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण आणि संशोधन कार्य विद्यापीठाकडून संलग्न महाविद्यालयांकडून आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून व पाठशालांकडून सामान्यतः विद्यापीठ क्षेत्रात आणि विहित करण्यात आलेल्या रीतीने चालवण्यात येईल. पदव्युत्तर अध्यापन व संशोधन.

**७३.** विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नावनोंदणी होण्यासाठी व्यक्तीकडे, विहित करण्यात येतील अशा अर्हता असतील आणि विहित करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता ती करील. विद्यार्थ्यांची नावनोंदणी.

**७४.** (१) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांशी संबंधित अशी शिस्त व शिस्तभंगाची कार्यवाही यासंबंधातील सर्व अधिकार कुलगुरूकडे निहित असतील. शिस्तविषयक अधिकार आणि विद्यार्थ्यांमधील शिस्त.

(२) कुलगुरूस, आदेशाद्वारे, अधिनियमाखालील त्याचे सर्व किंवा कोणतेही अधिकार, त्यांस योग्य वाटेल त्यानुसार, त्याबाबतीत तो नामनिर्देशित करील अशा इतर अधिकाऱ्यांकडे सोपविता येतील.

(३) कुलगुरूस, आपल्या अधिकारांचा वापर करून, आदेशाद्वारे कोणत्याही विद्यार्थ्याची किंवा विद्यार्थ्यांची हाकलपट्टी करण्यात यावी किंवा विनिर्दिष्ट मुदतीसाठी त्याला किंवा त्यांना काढून टाकण्यात यावे, किंवा महाविद्यालयातील, परिसंस्थेतील किंवा विद्यापीठाच्या विभागातील एका किंवा अनेक अभ्यासक्रमांसाठी विनिर्दिष्ट मुदतीकरिता प्रवेश देऊ नये किंवा तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढ्या दंडाची शिक्षा देण्यात यावी, किंवा विभाग, विद्यापीठाकडून चालवण्यात येणारे महाविद्यालय किंवा परिसंस्था यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षेस किंवा परीक्षांना बसण्यास पाच वर्षाहून अधिक नसेल एवढ्या विनिर्दिष्ट मुदतीसाठी मनाई करण्यात यावी किंवा तो किंवा ते विद्यार्थी ज्या परीक्षेला किंवा परीक्षांना बसला असेल किंवा बसले असतील त्या परीक्षेचा किंवा परीक्षांचा त्या विद्यार्थ्याचा किंवा विद्यार्थ्यांचा निकाल रद्द करण्यात यावा असा निदेश देता येईल ;

परंतु, संबंधित विद्यार्थ्याला एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी काढून टाकण्यात आले असेल तर कुलगुरू त्याला त्याची बाजू मांडण्याची पुरेशी संधी देईल.

(४) कुलगुरूच्या अधिकारांना कोणत्याही प्रकारे बाध न आणता, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख आणि विद्यापीठ विभागप्रमुख यांना त्यांच्या त्यांच्या प्रभाराखालील विद्यार्थ्यांच्या बाबतीत योग्य ती शिस्त राखण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व अधिकारांचा वापर करण्याचा प्राधिकार असेल.

(५) कुलगुरू, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची शिस्त व योग्य वर्तणूक यांच्याबाबतीत नियम करील आणि ते नियम विद्यापीठांची सर्व संचालित महाविद्यालये व विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था यांच्या विद्यार्थ्यांना लागू होतील आणि प्रत्येक विद्यार्थ्याला अशा नियमांची प्रत पुरविण्यात येईल.

(६) विद्यापीठाकडून चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयांचे प्राचार्य आणि परिसंस्थांचे प्रमुख यांना त्यांना आवश्यक वाटतील त्यानुसार, कुलगुरूने केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे, शिस्त व योग्य वर्तणूक यासंबंधीचे पूरक नियम तयार करता येतील आणि प्रत्येक विद्यार्थ्याला अशा पूरक नियमांची माहिती देण्यात येईल.

(७) प्रवेशाच्या वेळी प्रत्येक विद्यार्थी, तो स्वतः कुलगुरूच्या आणि विद्यापीठांच्या इतर अधिकाऱ्याच्या आणि प्राधिकरणे अथवा मंडळे यांच्या आणि संचालित महाविद्यालयांची व परिसंस्थांची प्राधिकरणे किंवा मंडळे यांच्या शिस्तविषयक अधिकारितेच्या अधीन असेल आणि कुलगुरूने त्या बाबतीत केलेल्या नियमांचे आणि संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठाच्या परिसंस्थाचे प्रमुख यांनी केलेले पूरक नियम जेथवर लागू होतील तेथवर त्यांचे पालन करील व ते त्याला बंधनकारक राहतील अशा अर्थाच्या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करील.

(८) विद्यापीठाकडून चालविण्यात येत नसेल अशा संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या किंवा पाठशालेच्या विद्यार्थ्यांविरूद्ध करावयाच्या शिस्तभंगविषयक कारवाईशी संबंधित सर्व अधिकार संलग्न महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा किंवा पाठशालेचा प्रमुख यांच्याकडे निहित असतील आणि पूर्वोक्त पोट-कलमाखाली कोणतेही नियम करण्यात आलेले असल्यास त्या नियमांसह त्या पोट-कलमांच्या तरतुदी योग्य त्या फेरफेरांसह अशा महाविद्यालयांना, परिसंस्थांना किंवा पाठशालांना व त्यातील विद्यार्थ्यांना लागू असतील.

पदव्या, पदविका, प्रमाणपत्र व विशेषोपाधी.

७५. (१) व्यवस्थापन परिषदेस, विद्वत् परिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी सुरू आणि प्रदान करता येतील.

(२) कुलाधिपतीस, नैतिक अधःपाताचा ज्यात अंतर्भाव होतो अशा अपराधाबद्दल न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला दोषी ठरविले असेल तर, व्यवस्थापन परिषद व विद्वत् परिषद यांनी केलेल्या आणि अशा प्रत्येक प्राधिकरणाच्या सभेस हजर असणाऱ्या सदस्यांच दोन तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने–अशा बहुमतामध्ये अशा प्रत्येक प्राधिकरणाच्या निम्म्यापेक्षा कमी नसतील इतके सदस्य असतील–पुष्टी दिलेल्या शिफारशीवरून, पदवी किंवा पदविका किंवा प्रमाणपत्र अथवा कोणतीही विद्याविषयक अन्य विशेषोपाधी कायमची किंवा कुलपतीस योग्य वाटेल अशा मुदतीसाठी काढून घेता येईल. संबंधित व्यक्तीस, स्वतःच्या बचावाची संधी दिल्याखेरीज या कलमान्वये अशी कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

सन्मान्य पदवी.

७६. व्यवस्थापन परिषदेला, कोणत्याही व्यक्तीस कोणतीही चाचणी परीक्षा किंवा परीक्षा देण्यास भाग न पाडता केवळ तिचे श्रेष्ठ स्थान, नैपुण्य व सार्वजनिक सेवा यामुळे सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी मिळण्यास ती पात्र व योग्य आहे याच केवळ कारणांवरून त्या व्यक्तीला अशी पदवी किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी प्रदान करण्याबाबत विचार करता येईल आणि अशा शिफारशीला व्यवस्थापन

परिषदेच्या सभेला हजर असणाऱ्या सदस्यांच्या दोन-तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने–अशा बहुमतात तिच्या निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांचा समावेश असेल–पुष्टी मिळाली तर ती शिफारस यथोचितरीत्या संमत करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल ;

परंतु, कुलगुरूने कुलपतींची पूर्वमान्यता मिळवलेली असल्याखेरीज व्यवस्थापन परिषद त्यासंबंधीचा कोणताही प्रस्ताव विचारार्थ स्वीकारणार नाही किंवा विचारात घेणार नाही.

७७. विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा, जर कोणता विशेष दीक्षांत समारंभ असेल तर त्यासह विहित करण्यात आलेल्या रीतीने, विद्यावर्षातून किमान एकदा आयोजिण्यात येईल. दीक्षांत समारंभ.

७८. (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठाच्या पदवीधर असलेल्या व्यक्तींना विद्यापीठांकडून ठेवण्यात येणाऱ्या नोंदणीकृत पदवीधरांच्या किंवा नोंदणीकृत पदवीधर असल्याचे मानण्यात येणाऱ्या व्यक्तींच्या नोंदवहीत आपली नावे नोंदवावयाचा हक्क असेल. नोंदणीकृत पदवीधर.

(२) जी व्यक्ती,—

(अ) विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल ;

(ब) अमुक्त नादार असेल ;

(क) ज्यात नैतिक अधःपताचा अंतर्भाव असेल अशा एखाद्या अपराधाबद्दल जिल्हा न्यायालयाकडून दोषी ठरविण्यात आले असेल ;

(ड) महाराष्ट्र राज्यात कायद्याद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर असेल ;

ती व्यक्ती पदवीधरांच्या नोंदवहीत आपल्या नावाची नोंद करून घेण्यास किंवा नोंदणीकृत पदवीधर असण्यास अर्ह असणार नाही.

(३) नोंदणीकृत पदवीधर होऊ इच्छिणारी प्रत्येक व्यक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात कुलसचिवांकडे अर्ज करील आणि अशी फी भरील.

(४) कुलगुरू त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नोंदणीकृत पदवीधर असण्याचा हक्क आहे किंवा कसे याबाबत निर्णय येईल. एखाद्या व्यक्तीस नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत आपल्या नावाची नोंद करून घेण्याचा किंवा नोंदणीकृत पदवीधर असण्याचा हक्क आहे किंवा कसे किंवा ती, नोंदणीकृत पदवीधर होण्यास अर्हताप्राप्त नाही किंवा कसे याबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास, त्याचा निर्णय कुलगुरू त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

७९. व्यवस्थापन परिषदेच्या मते ज्यात नैतिक अधःपाताचा अंतर्भाव होतो अशा गंभीर स्वरूपाच्या असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल न्यायालयाने कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविले असेल तर कुलाधिपतीस व्यवस्थापन परिषदेने केलेल्या व तिच्या सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या दोन तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने,—अशा बहुमतात तिच्या निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांचा समावेश असेल–पुष्टी दिलेल्या शिफारशींवरून अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव कुलाधिपतीस योग्य वाटेल अशा मुदतीसाठी, पदवीधरांच्या नोंदवहीतून काढून टाकता येईल. नोंदणी केलेल्या पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकणे.

प्रकरण अकरा

## विद्यापीठ निधी, लेखे व लेखापरीक्षा

वार्षिक वित्तीय अंदाज.

८०. (१) आगामी वर्षाकरिता विद्यापीठाने वार्षिक वित्तीय अंदाज (अर्थसंकल्प) वित्तीय वर्ष सुरू होण्यापूर्वी कमीत कमी दोन महिने आधी वित्त-लेखा समितीच्या निदेशानुसार वित्त-लेखा अधिकाऱ्यांकडून तयार करण्यात येतील.

(२) त्यानंतर वित्त-लेखा अधिकारी, व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या वित्तीय अंदाजाच्या प्रती राज्य शासनाला पाठवील.

(३) राज्य शासनाचे जे वित्तीय वर्ष असेल तेच विद्यापीठाचे वित्तीय वर्ष असेल.

विद्यापीठ निधी.

८१. (१) विद्यापीठ पुढील निधी स्थापन करील :—

(अ) सर्वसाधारण निधी ;

(ब) वेतन निधी ;

(क) विश्वस्त निधी ;

(ड) विकास व कार्यक्रम निधी ;

(ई) आकस्मिकता निधी ;

(फ) विद्यापीठाच्या मते स्थापन करणे आवश्यक असेल असा इतर कोणताही निधी.

(२) पुढील रकमा सर्वसाधारण निधीचा भाग असतील, किंवा त्यामध्ये त्यांचा भरणा करण्यात येईल :—

(अ) राज्य शासन किंवा केंद्र सरकार किंवा विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून मिळालेले वेतनेतर अंशदान किंवा अनुदान ;

(ब) अन्य कोणत्याही मार्गाने विद्यापीठाला मिळणारे, फी व आकार यांच्या उत्पन्नासह सर्व उत्पन्न ;

(क) राज्य शासनाच्या परवानगीने बँकांकडून किंवा अन्य कोणत्याही अधिकरणाकडून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा ;

(ड) अन्य कोणत्याही मार्गाने किंवा अभिकरणाकडून मिळालेल्या रकमा.

(३) वेतन निधीमध्ये, राज्य शासन, केंद्र सरकार किंवा विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून वेतन व भत्ते यांच्या पूर्णतः किंवा अंशतः प्रदानापोटी मिळालेल्या सर्व रकमांचा समावेश होईल. वेतन व भत्ते देण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी या निधीमधील कोणत्याही रकमेचा वापर करण्यात येणार नाही.

(४) विश्वस्तव्यवस्था, मृत्युपत्रित देणग्या, देणग्या, स्थायीदाने, अर्थसहाय्य व तत्सम अनुदाने यांपासून मिळणारे सर्व उत्पन्न किंवा पैसा यांचा मिळून विश्वस्त निधी होईल.

(५) (अ) विद्यापीठाचा विकास व कार्यक्रम निधीमध्ये, राज्य शासनाकडून मिळालेली सर्व पायाभूत सुविधा विकास अनुदाने, विकास व संशोधन यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेली सर्व अंशदाने आणि केंद्र सरकारची निधी पुरविणारी इतर अभिकरणे, संयुक्त राष्ट्रे व त्यांच्या संलग्न संस्था, इतर आंतरराष्ट्रीय अभिकरणे, उद्योग, बँका व वित्त संस्था किंवा कोणतीही व्यक्ती यांच्याकडून मिळालेली अनुदाने यांचा समावेश होईल ;

(ब) विद्यापीठाच्या इतर कोणत्याही निधीमध्ये या निधीमधील कोणत्याही रकमेचे विनियोजन करण्यात येणार नाही किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी ती खर्च करण्यात येणार नाही ;

(क) कार्यक्रमांच्या उद्दिष्टांशी सुसंगत अशा रीतीने विकास व कार्यक्रम निधीचा वापर करण्यात येईल. यासाठी एक उचित संहिता स्वीकृत करण्यात येईल व त्यात, व्यवस्थापन परिषदेने मंजूर करावयाच्या व मान्यता द्यावयाच्या, खर्च व लेखापरीक्षा यासंबंधात वित्तव्यवस्था करणाऱ्या अधिकरणाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात येईल.

(६) विद्यापीठाचा, विद्यापीठाच्या लेख्यांमध्ये एका स्वतंत्र लेखाशीर्षाखाली एक आकस्मिकता निधी असेल व ते निधी ठेवील. कोणताही अकल्पित खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठीच केवळ त्याचा वापर करण्यात येईल.

(७) पूर्वोक्त प्रयोजनांसाठी ज्याचा ताबडतोब किंवा कोणत्याही आधीच दिनांकाला वापर करणे शक्य नसेल असा या निधीच्या जमाखाती असलेला अधिक पैसा वेळोवेळी, व्यवस्थापन परिषदेकडून निदेशित करण्यात येईल त्यानुसार बँकेमध्ये जमा करण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी, बँक या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

१९५५ चा २३. (एक) भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ अन्वये स्थापन करण्यात आलेली भारतीय स्टेट बँक ;

१९५९ चा ३८. (दोन) भारतीय स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९ मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेली दुय्यम बँक ;

१९७० चा ५. १९८० चा ४०. (तीन) बँक व्यवसाय कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० याच्या कलम ३ अन्वये किंवा बँक व्यवसाय कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० याच्या कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेली तत्सम नवीन बँक ;

१९३४ चा २. (चार) भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ याच्या कलम २ च्या खंड (ङ) मध्ये व्याख्या केल्यानुसार असलेली अनुसूचित बँक किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली बँक असलेली तर कोणतीही बँक.

८२. (१) दरवर्षी किमान एकदा आणि कोणत्याही परिस्थितीत वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत, व्यवस्थापन परिषदेने, ज्यांच्या भागीदारांचा विद्यापीठाची कोणतीही प्राधिकरणे किंवा त्यांचे व्यवहार यामध्ये कोणताही हितसंबंध असणार नाही अशा, सनदी लेखापालांच्या भागीदारी संस्थांमधून नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून विद्यापीठाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल. वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

(२) लेखापरीक्षा झालेले लेखे विद्यापीठाद्वारे प्रसिद्ध केले जातील व त्यांची एक प्रत लेखापरीक्षकांच्या अहवालासह कुलाधिपतीस, राज्य शासनास सादर केली जाईल आणि असे लेखापरीक्षा झालेले लेखे मिळाल्यानंतर अधिसभा त्यावर तिला योग्य वाटेल असा ठराव विचारात घेऊन ती संमत करील.

[१][(२क) राज्य शासन, त्याला प्राप्त झालेले विद्यापीठाचे लेखापरीक्षा केलेले वार्षिक लेखे राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.]

(३) राज्य शासनास, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून ठराविक कालांतरांनी विद्यापीठाच्या लेख्यांची चाचणी लेखापरीक्षा किंवा पूर्ण लेखापरीक्षा करवून घेता येईल.

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १६ द्वारे पोट-कलम (२क) समाविष्ट करण्यात आले.

वार्षिक अहवाल. ८३. [1][(१)] विद्यापीठाचा वार्षिक अहवाल विद्यापीठ तयार करील आणि प्रसिद्ध करील व व्यवस्थापन परिषदेद्वारे मान्य करण्यात आलेला असा अहवाल कुलाधिपती व राज्य शासन यांना सादर केला जाईल.

[1][(२) राज्य शासन, त्याला प्राप्त झालेल्या विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.]

प्रकरण बारा

## संकीर्ण

नुकसानीबद्दल प्राधिकरणे आणि अधिकारी जबाबदार असणे. ८४. (१) विद्यापीठाच्या हितसंबंधाचे योग्य प्रकारे रक्षण करण्यात येत आहे याबद्दल खात्री करून घेणे हे विद्यापीठाच्या प्रत्येक प्राधिकरणाचे किंवा मंडळाचे आणि अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.

(२) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा मंडळाने किंवा अधिकाऱ्यांने सद्भावनेने केलेली असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत केलेल्या, हा अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्या तरतुदीशी सुसंगत नसेल अशा एखाद्या कृतीमुळे, अथवा त्याने हेतुपुरस्सर हयगय किंवा कसूर करून, त्या तरतुदींशी सुसंगत अशी कृती न केल्यामुळे विद्यापीठाचे कोणतेही नुकसान किंवा हानी झाल्याचे आढळून आले तर, परिनियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार, असे नुकसान किंवा हानी त्या प्राधिकरणाकडून किंवा मंडळाकडून किंवा त्याच्या संबंधित सदस्यांकडून संयुक्तपणे किंवा पृथकपणे, किंवा यथास्थिती, संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल केली जाण्यास पात्र असेल.

राज्य विधान-मंडळाचे आणि संसदेचे सदस्यत्व. ८५. (१) विद्यापीठाचा किंवा खाजगी महाविद्यालयांचा किंवा पाठशालेचा अध्यापक हा, त्यास राज्य विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा किंवा संसदेचा सदस्य म्हणून निवडून देण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आलेले आहे याच केवळ कारणावरुन असा अध्यापक असण्याचे चालू राहण्यासाठी निरर्ह ठरणार नाही.

(२) राज्य विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा किंवा संसदेचा सदस्य म्हणून निवडून देण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आलेला अध्यापक, त्याचा विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या किंवा संसदेच्या सदस्यत्वाचा कालावधी बिनपगारी आणि बिनभत्ता रजा म्हणून मानला जाण्यास हक्कदार असेल ;

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेला अध्यापक त्याच्या राज्याच्या विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या किंवा संसदेच्या सदस्यत्वाचा कालावधी, निवृत्तीवेतन, ज्येष्ठता व वेतनवाढी यांच्या प्रयोजनासाठी हिशेबात घेतला जाण्यास देखील हक्कदार असेल.

अर्थउकली संबंधातील प्रश्न आणि विद्यापीठ प्राधिकरण किंवा मंडळ इत्यादींच्या रचनेसंबंधातील विवाद. ८६. हा अधिनियम किंवा कोणताही परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम यांच्या कोणत्याही तरतुदीच्या अर्थउकलीसंबंधात किंवा विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ याचा सदस्य म्हणून एखादी व्यक्ती यथोचितरित्या निवडून आली आहे किंवा तिची नेमणूक करण्यात आली आहे किंवा तिला नामनिर्देशित वा स्वीकृत करण्यात आले आहे किंवा विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ यांचा सदस्य असण्याचा तिला हक्क आहे किंवा कसे यासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, प्रतिकूल परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा मंडळाने विनंतीअर्ज केल्यावरुन किंवा स्वाधिकारे कुलगुरू ती बाब कुलाधिपतीकडे विचारार्थ पाठवील आणि कुलाधिपती, त्याला आवश्यक वाटेल असा सल्ला त्यावर घेतल्यानंतर, त्या प्रश्नाचा निर्णय करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

---

[1] वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे कलम ८३ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) म्हणून नव्याने क्रमांक दिला अशा नव्याने क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

८७. विद्यापीठाने किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, प्राधिकरणाने किंवा मंडळाने सद्‌भावनापूर्वक केलेल्या सर्व कृती आणि काढलेले सर्व आदेश, या अधिनियमाच्या इतर तरतुदीस अधीन राहून, अंतिम असतील ; आणि त्यानुसार, सद्‌भावनापूर्वक आणि हा अधिनियम व परिनियम, आदेश, विनियम व नियम यांच्या तरतुदीस अनुसरून केलेल्या किंवा काढलेल्या किंवा केल्याचे किंवा काढल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल विद्यापीठांविरूद्ध किंवा त्याच्या अधिकाऱ्यांविरूद्ध, प्राधिकरणांविरूद्ध, किंवा मंडळांविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही, किंवा ती चालवण्यात येणार नाही किंवा त्यांच्याकडून कोणत्याही नुकसानभरपाईची मागणी करण्यात येणार नाही. या अधिनियमाच्या कृती व आदेश यांचे संरक्षण.

८८. हा अधिनियम आणि परिनियम यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास आदेशाद्वारे, परिनियम, आदेश नियम व विनियम करण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त त्याचे अन्य अधिकार त्यांच्या नियंत्रणाखालील कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे, आणि अशा रीतीने सोपविलेल्या अधिकारांच्या वापराबद्दलची अंतिम जबाबदारी ही, उक्त अधिकार सोपवणाऱ्या अधिकाऱ्यांकडे किंवा प्राधिकरणाकडे निहित असल्याचे चालू राहील या शर्तीस अधीन राहून, सोपविता येईल. अधिकारांचे प्रत्यायोजन.

८९. व्यवस्थापन परिषदेची किंवा विद्वत् परिषदेची किंवा विद्यापीठाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणाची किंवा कोणत्याही मंडळाची किंवा कुलगुरूच्या नियुक्तीसाठी कुलाधिपतीने नियुक्त केलेल्या समितीसह अन्य समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ पुढील कारणावरून विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही :— कृती व कार्यवाही ही रचनेतील दोष रिक्त पदे, कार्य पद्धतीतील नियमबाह्यता इत्यादी या केवळ कारणांवरून विधिअग्राह्य नसणे.

(अ) अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या, मंडळाच्या किंवा समितीच्या सदस्यांपैकी कोणताही सदस्य हा निर्वाचित, नियुक्त, किंवा नामनिर्देशित झाला नाही किंवा स्वीकृत करण्यात आलेला नाही किंवा इतर कोणत्याही कारणामुळे त्याच्या रचनेच्या वेळी पद धारण करण्यात किंवा त्याच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्यास उपलब्ध नाही किंवा कोणतीही व्यक्ती एकापेक्षा अधिक नात्यांनी सदस्य आहे किंवा त्याच्या रचनेमध्ये इतर काही दोष आहे किंवा त्याच्या सदस्यांपैकी एका किंवा अधिक सदस्यांची पदे रिक्त आहेत ;

(ब) अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या, मंडळाच्या किंवा समितीच्या कार्यपद्धतीत विचाराधीन विषयाच्या योग्यायोग्यतेस ज्यामुळे बाधा पोचत नाही अशी कोणतीही नियमबाह्यता आहे आणि अशा कृतीच्या किंवा कार्यवाहीच्या विधिग्राह्यतेस कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे किंवा अधिकाऱ्यापुढे केवळ अशाच कारणावरून हरकत घेण्यात येणार नाही.

## प्रकरण तेरा

## संस्कृत विद्यापीठाची आस्थापना

९०. या अधिनियमाच्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पहिला कुलगुरू, पहिला समकुलुरू, पहिला कुलसचिव, पहिला वित्त-लेखा अधिकारी आणि अन्य अधिकारी यांची नियुक्ती राज्य शासनाकडून करण्यात येईल. आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील. ते पाच वर्षाकरिता किंवा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नियुक्ती करण्यात येईपर्यंत, यापैकी जे अगोदरचे असेल त्याप्रमाणे पद धारण करतील. प्रथम नियुक्त्या.

९१. या अधिनियमाच्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन पहिली व्यवस्थापन परिषद, विद्वत् परिषद आणि नियोजन विकास मंडळ स्थापन करील आणि अशा प्राधिकरणाचा सदस्य या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींनुसार प्राधिकरण स्थापन करण्यात येईपर्यंत पद धारण करील. पहिली प्राधिकरणे स्थापन करणे.

९२. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यात कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासनास, परिस्थितीची गरज असेल त्याप्रमाणे, परंतु या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षापेक्षा उशिराची नसेल अशा मुदतीच्या आत ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी परंतु या अधिनियमाची उद्दिष्टे व प्रयोजने यांच्याशी विसंगत नसेल अशी, कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल. अडचणी दूर करणे.

शासकीय मुद्रणालय, नागपूर